म. ग्रं. सं. ठाणें

विषय चरित्र

संग्रहालय क्रमांक ३१

लेखक ना. वि. आपटे.

सन १८९३

पुस्तकाचें नांव महाराज सखाराम बाबा कवाडकर

६०

(चरित्र)

मराठा ग्रंथ संग्रहालय
नं०

कैवल्यवासी रामकृष्णबोवा आटे यांचें स्मारक !

प्रसिद्ध साधु

# श्रीमत्परमहंस चिद्घन स्वामी महाराज

# ( सखारामबोवा कवाडकर )

# यांचें चरित्र.

सन्तः स्वतः प्रकाशन्ते गुणा न परतो नृणाम् ।
आमोदो नाहि कस्तूर्याः शपथेन विभाव्यते ॥

हें

नारायण विठ्ठल आपटे,

हेडमास्तर, शाळा उतन, ता. साष्टी, जि. ठाणें, यांनीं लिहिलें.

( रजिस्टर करून सर्वप्रकारचे हक्क कर्त्यानें राखिले आहेत.)

मुंबई येथें 'बॉम्बे न्यू प्रेस' मध्यें छापिलें.

शके १८१९. इ. सन १८९१.

किंमत ८ आणे.

# अनुक्रमणिका.


| प्रकरण. | विषय. | पृष्ठें. |
|---|---|---|
| १. | पूर्वजवृत्तांत–जन्म–बाळपण .... .... | १—४ |
| २. | विद्याभ्यास .... .... .... .... | ५—१४ |
| ३. | सगुणभक्ति–मुमुक्षुत्व–सद्गुरुदर्शन–विवाह –पश्चात्ताप–वैराग्य– पत्नीमृत्यु .... | १५—२८ |
| ४. | कवाडास येणें–वर्तनक्रम–योगाभ्यास.... | २९—४६ |
| ५. | सत्पुरुषदर्शनें–तीर्थयात्रा– वगैरे .... | ४७—५६ |
| ६. | अलौकिक चमत्कार–दर्शनेच्छु व पारमार्थिक शिष्य मंडळींची हकीकत .... | ५७–१०८ |
| ७. | समाधि–उत्सवव्यवस्था .... .... | १०९–११३ |

परिशिष्ट.

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीसद्गुरु समर्थ रघुनाथ भटजी मोघे यांचें चरित्र .... .... .... .... | ११४–१२२ |
| २. | सत्पुरुष पांडोबा केतकर यांचें चरित्र. | १२२–१२८ |

# प्रस्तावना.

सत्पुरुषकथा अद्भुत रसदा ह्मणतों इचाच सुरभीमी॥
मोरोपंत.

इहलोकीं मनुष्यमात्राचीं जीं अनेक कर्तव्यें आहेत, त्या सर्वांपैकीं, ज्या सच्चिदानंद परमेश्वरानें हें अखिल जग निर्माण केलें, त्याची ओळख करून घेणें,—आत्मज्ञान संपादणें,—हें मुख्य कर्तव्य होय. तें ज्यांनीं उत्तम रीतीनें बजाविलें, इतकेंच नव्हे, तर शेंकडों—हजारों अज्ञ जनांस सन्मार्गास लावून कर्तव्यरत केलें, अशा आत्मानात्मविचारी ब्रह्मनिष्ठांची योग्यता असाधारण होय, हें निर्विवाद आहे. तेव्हां अशा जीवन्मुक्त नरश्रेष्ठांचीं परम पवित्र जीवनवृत्तें लिहून ठेवणें व तदनुसार ( देशकालवर्तमानाप्रमाणें ) स्ववर्तनास वळण लावण्याचा यथाशक्ति प्रयत्न करणें अवश्य आहे, हें कांहीं निराळें सांगावयास नको.

अलीकडे ‘पुणें वैभव’ पत्रांत अक्कलकोटचे स्वामी महाराजांचें चरित्र येत असतें. तें पाहून प्रस्तुत चरित्र लिहिण्याचें आमचे मनांत आलें, व आह्मी तेव्हांपासून माहिती मिळविण्यास लागलों. पुढें कैवल्यवासी रामकृष्णबोवा माटे यांनीं लिहिलेल्या लहानशा बखरीची एक प्रत आह्मांस

रावसाहेब विष्णु बाळकृष्ण सोहनी,

माजी प्रिन्सिपाल पुणें ट्रेनिंग कॉलेज

यांस, हें पुस्तक शिष्यत्वोचित

कृतज्ञता बुद्धीनें अत्यंत

नम्रतापूर्वक

अर्पण केलें

आहे.

प्रिय शिष्य,

नारायण विठ्ठल आपटे.

# अनुक्रमणिका.


| प्रकरण. | विषय. | पृष्ठें. |
|---|---|---|
| १. | पूर्वजवृत्तांत—जन्म—बाळपण .... .... | १—४ |
| २. | विद्याभ्यास .... .... .... .... | ५—१४ |
| ३. | सगुणभक्ति—मुमुक्षुत्व—सद्गुरुदर्शन—विवाह —पश्चात्ताप-वैराग्य— पत्नीमृत्यु .... | १५—२८ |
| ४. | कवाडास येणें—वर्तनक्रम—योगाभ्यास.... | २९—४६ |
| ५. | सत्पुरुषदर्शनें-तीर्थयात्रा- वगैरे .... | ४७—५६ |
| ६. | अलौकिक चमत्कार—दर्शनेच्छु व पारपार्थिक शिष्य मंडळींची हकीकत .... | ५७--१०८ |
| ७. | समाधि—उत्सवव्यवस्था .... .... | १०९-११३ |

परिशिष्ट.

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीसद्गुरु समर्थ रघुनाथ भटजी मोघे यांचें चरित्र .... .... .... .... | ११४—१२२ |
| २. | सत्पुरुष पांडोबा केतकर यांचें चरित्र. | १२२—१२८ |

# प्रस्तावना.

सत्पुरुषकथा अद्भुत रसदा ह्मणतों इलाच सुरभीमी॥
मोरोपंत.

इहलोकीं मनुष्यमात्राचीं जीं अनेक कर्तव्यें आहेत, त्या सर्वांपैकीं, ज्या सच्चिदानंद परमेश्वरानें हें अखिल जग निर्माण केलें, त्याची ओळख करून घेणें,—आत्मज्ञान संपादणें,— हें मुख्य कर्तव्य होय. तें ज्यांनीं उत्तम रीतीनें बजाविलें, इतकेंच नव्हे, तर शेंकडों—हजारों अज्ञ जनांस सन्मार्गास लावून कर्तव्यरत केलें, अशा आत्मानात्मविचारी ब्रह्मनिष्ठांची योग्यता असाधारण होय, हें निर्विवाद आहे. तेव्हां अशा जीवन्मुक्त नरश्रेष्ठांचीं परम पवित्र जीवनवृत्तें लिहून ठेवणें व तदनुसार ( देशकालवर्तमानाप्रमाणें ) स्ववर्तनास वळण लावण्याचा यथाशक्ति प्रयत्न करणें अवश्य आहे, हें कांहीं निराळें सांगावयास नको.

अलीकडे 'पुणें वैभव' पत्रांत **अक्कलकोटचे स्वामी महाराजांचें** चरित्र येत असतें. तें पाहून प्रस्तुत चरित्र लिहिण्याचें आमचे मनांत आलें, व आह्मी तेव्हांपासून माहिती मिळविण्यास लागलों. पुढें कैवल्यवासी **रामकृष्णबोवा माटे** यांनीं लिहिलेल्या लहानशा बखरीची एक प्रत आह्मांस

मिळाली. ती प्रत मोडींत लिहिलेली, फारच अशुद्ध व लेखक-प्रमादयुक्त असल्यामुळें जरी तिच्यापासून व्हावा तसा उपयोग झाला नाहीं, तरी तिचा मार्गदर्शकाप्रमाणें उपयोग झाला. ह्या प्रतीच्या धोरणानें ठिकठिकाणची माहिती मिळवून एक संक्षिप्त टांचण तयार केल्यावर, पूर्वोक्त बखरीची दुसरी एक प्रत आम्हांस पाहण्यास मिळाली व ती हें चरित्र लिहिते वेळीं आमचेजवळ असल्यामुळें, तिचा आम्हांस बराच उपयोग करून घेतां आला. एकंदरींत शास्त्री-बोवांचे बखरीचा बराच उपयोग घडला म्हणून, व त्यांची महाराजांचे ठायीं असलेली असामान्य श्रद्धा आणि तदर्थ त्यांनीं केलेले अप्रतिम प्रयत्न हीं मनांत आणून, प्रस्तुत चरित्ररूपानें आह्मी हें शास्त्रीबावांचें लहानसें स्मारक केलें आहे! रा. रा. शिवराम श्रीधर साठे (कवाडकर) यांजकडून बखरीची पहिली प्रत मिळाली, व ती रा. त्र्यंबक नारायण गोडबोले अ. मा. कल्याण यांनीं मिळवून दिली, रा. रा. रामचंद्र धोंडदेव पेठे यांजकडून बखरीची दुसरी प्रत मिळाली, व रा. नारायण सदाशिव मराठे (कवाडकर) यांनीं बरीच उपयुक्त माहिती सांगितली, तसेंच आमचे मित्र मि. व्ही. एन्. भाटे (बॉम्बे न्यू प्रेसचे मालक) यांनीं मुदतींत काम पुरें करून दिलें, यास्तव या सर्वांचे आह्मी फार फार आभारी आहों.

चरित्र लिहिण्यास अवश्य लागणारीं साधनें, विद्वत्ता, बहुश्रुतपणा आणि भाषादेवीची कृपा यांचा पूर्ण अभाव

असून ग्रंथलेखनाचा हा प्रथम प्रयत्न असल्यामुळें, प्रस्तुत चरित्र विशेष लोकादरास पात्र होण्याचा मुळींच संभव नाहीं, हें आह्मी समजून आहों. तरी, पोंहावयास शिकणाऱ्यानें बुडेन या धास्तीनें कांठावरच बसून राहतां उपयोगी नाहीं, कारण तसें केल्यानें त्यास कधीं तरी पोंहता येईल काय? नाहीं. हाच विचार मनांत आणून ही "मना आली तैशी केली खटपट", आतां ती "वाईट का नीट देव जाणे."

कसेंही करून कवाडचे यात्रेपावेतों पुस्तक तयार करावें, अशी बरेच लोकांची आग्रहपूर्वक सूचना आल्यामुळें, छपाईचे कामीं फारच घाई होऊन प्रुफें तपासण्यास अवश्य तितका अवकाश मिळाला नाहीं, आणि त्यामुळें बरींच अशुद्धें राहून गेलीं असतील असें वाटतें. वेदांतपर शब्दांचा अर्थ, व दुसऱ्या कांहीं अवश्य अशा टीपा देण्याचा विचार होता, पण तोही बेत अखेर रहीत करावा लागला. यास्तव प्रस्तुत चरित्र वाचितांना वाचकांस जे दोष आढळतील, ते आम्हांस त्यांनीं लिहून कळविल्यास आह्मी त्यांचे फार आभारी होऊं, व सुदैवानें द्वितीयावृत्तीचा प्रसंग आल्यास त्याबद्दल योग्य विचार करूं.

शेवटीं ज्या सच्चिदानंद स्वानंदवासी श्रीमयूरेश्वराचे प्रेरणेनें आम्ही हें चरित्र लिहिण्यास उद्युक्त झालों, व ज्याचे कृपेनें तें निर्विघ्न सिद्धीस गेलें, त्याचे चरणीं साष्टांग प्रणिपात करून; तसेंच ज्या सत्पुरुषाच्या परम पवित्र चरित्राचें लेखन वाचन, आणि मनन, करण्यांत आयुष्याचें दीडवर्ष मोठ्या

आनंदांत गेलें, त्या श्रीमत्परमहंस चिद्घनस्वामी महाराजांचे चरणीं पुनः पुनः नमन करून ही बरीच लांबलेली प्रस्तावना पुरी करितों.

उत्तन, ता. १९ डिसेंबर १८९३.

ना. वि. आपटे.

प्रसिद्ध साधु

# श्रीमत्परमहंस चिद्घन स्वामी महाराज

( सखाराम बोवा कवाडकर )

# यांचें चरित्र.

## प्रकरण पहिलें.

तं भुवनत्रयतिलकं जनयाति जननी सुतं विरलम् ।

पञ्चतन्त्र.

परशुरामक्षेत्रांत दाभोळेजवळ करंबोवणें ह्मणून एक गांव आहे. तेथें हरिपंत केतकर या नांवाचे एक चित्पावन गृहस्थ रहात असत. ह्यांचें गोत्र गार्ग्य. हरिपंत हे उत्तम दशग्रंथी विद्वान्, परम धार्मिक व सदाचरणी होते. हेच आमच्या चरित्रनायकांचे जनक होत.

'यः:* सुंदरस्तद्वनिता कुरूपा या सुंदरी सा पतिरूपहीना' या श्लोकार्धाप्रमाणें बहुतकरून पतिपत्नींचा प्रत्येक गोष्टींत परस्परांशीं विपर्यास असावयाचा, असा जगाचा सामान्य नियमच आहेसा दिसतो. तथापि या नियमास अपवाद आणणारीं अशींही कित्येक पुण्यवान् दंपत्यें नसतात

---

* नवरा सुंदर असल्यास बायको कुरूप; व बायको सुंदर असेल तर नवरा कुरूप !

असें नाहीं. **हरिपंतांचें** दंपत्य हें त्यांपैकींच एक होतें. त्यांच्या पत्नीचें नांव **गोपिकाबाई. गोपिकाबाई** ह्या कुल, शील, सौंदर्य इत्यादि बहुतेक गोष्टींत पत्यनुरूप होत्या. पति, सासू, सासरा, दीर इत्यादिकांची एकनिष्ठपणें सेवा करणें ह्याहून त्यांस दुसरें कांहीं प्रिय नव्हतें. ह्या बाईनीं **श्रीरामचंद्रजीस** पंचवीस लक्ष प्रदक्षिणा घातल्या, असें सांगतात.

**हरिपंतांस** आठ मुलें झालीं, व तीं सर्व त्या उभयतांचे हयातीपर्यंत जीवमान होतीं. ह्यावरून, ह्या दंपत्यास पूर्ण संततिसुख मिळालें, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. ह्या आठ मुलांत चार मुलगे व चार मुली होत्या. प्रथम एकपाठचे तीन मुलगे झाले. त्यांचीं नांवें अनुक्रमें **काशिनाथ, पांडुरंग** व **मोरेश्वर** अशीं होतीं. नंतर चार मुली झाल्या. त्यांचीं नांवें अनुक्रमें **अनुसूया, सई, मनु** व **भिमा** अशीं होतीं. आठव्या खेपेस मुलगा झाला. त्याचें नांव **सखाराम!** हेच आमचे चरित्रनायक **सखारामबोवा**! शके १७२३ (सन १८०१) दुर्मतिनाम संवत्सरे, मिति जेष्ठ शुक्ल अष्टमी रोजीं सायंकाळीं, कन्याराशीस चंद्र असतां, ह्यांचा जन्म झाला. जन्मकालीं उत्तरा नक्षत्र असून व्यतिपात व वर्माण यांचा संधि होता.*

---

* ह्या जन्मकालावरून कोणी फलज्योतिषज्ञ जन्मटिप्पण तयार करून, त्याचा पुढील चरित्राशीं मेळ पाहतील, तर बराच उपयोग होईल, अशी आमची समजूत आहे. तिजबद्दल सुज्ञांनीं विचार करावा.

(पुढें चालू.)

'पोराचे पाय पाळण्यांत ओंळखावे'. अशी एक ह्मण आहे, व ती अगदीं यथार्थ आहे. प्रौढपणांत उदयास येणारे गुणावगुण बालपणांत बीजरूपानें असतात, ह्मणून मनुष्याच्या बालपणच्या स्थितीकडे जर शोधकपणानें लक्ष पुरविलें, तर त्याच्या थोरपणच्या स्थितीचें सहज अनुमान करितां येतें, आणि तें बहुतकरून चुकत नाहीं. सखारामाच्या बाललीला त्याच्या पुढील आयुःक्रमास अनुसरूनच असल्यामुळें, हा कोणीतरी महा भाग्यवान् पुरुष होईल, असें त्याचवेळीं सर्वांनीं भाकित करून ठेविलें होतें, आणि तें पुढें सर्वांशीं खरें झालें.

सखाराम स्वरूपानें चांगला होता. त्याचा वर्ण गोरा असून कपाळ विशाळ आणि डोळे पाणीदार होते, आणि आंगावर बाळसें पुष्कळ असून रडें कसें तें माहीत सुद्धां नव्हतें. असें सुंदर आणि खेळकर मूल असल्यावर, त्यास पाहतांच पटकन उचलून कडेवर घ्यावें, व मटामट मुके घेऊन त्यास हंसवावें, असें कोणाच्या मनांत येत नसेल? शेजारी पाजारी कोणीही आला, कीं गेलाच सखारामास उचलायला! पण हा कोठला क्षणभर तरी स्वस्थ बसायला? कडेवर घेतला न घेतला, तोंच या भारी अचपळ मुलानें कडेखालीं उडी घ्यावी. असें झालें ह्मणजे, त्यास उचलून घेण्याविषयीं

---

हें जन्मटिप्पण मिळविण्याचा आह्मी बराच प्रयत्न केला, परंतु तो आजवर सफल झाला नाहीं. यास्तव, तें जर कोणी मिळवून देईल, तर आम्ही त्यांचे फार आभारी होऊं

त्या मनुष्याची उत्कंठा जास्तच वाढावी, आणि मगतर **सखारामानें** त्याच्या हातींच लागूं नये ! अशा वेळीं **सर्वदमनाच्या** बाललीलांनीं जशी दुष्यंताची स्थिति झाली, तशी **सखारामाच्या** बाललीलांनीं त्या मनुष्याची स्थिति होत असे. मग दुष्यंताप्रमाणें त्याच्याही तोंडून '**धन्यास्तदंगरजसामलिनी भवन्ति**' असे उद्गार निघाल्याशिवाय कसे बरें राहतील?

---

## प्रकरण दुसरें

तस्य विस्तारिता बुद्धितैलबिन्दुरिवांभसि ।

सुभाषित.

सखारामबोवा शके १७२३ ( इ० स० १८०१ ) ह्या वर्षी जन्मले, हें मागें सांगितलेंच आहे. अर्थात् हा काल, ह्मणजे शेवटल्या रावबाजीची कारकीर्द असून, पेशवाईच्या अवनतीचा प्रारंभ होय ! ह्यावरून, हल्लींच्या समाजस्थितीहून तेव्हांची समाजस्थिति पुष्कळांशीं भिन्न होती, हें सांगण्याची मुळींच अवश्यकता नाहीं. तेव्हांच्या शिक्षणपद्धतीस अनुसरून हरिपंतांनीं आपल्या इतर मुलांप्रमाणें सखारामासही लहानपणीं मोडीबालबोध लिहिण्यावाचण्यास आणि हिशेब करण्यास शिकविलें. सखारामाची बुद्धि फार तीव्र असल्यामुळें, जें सांगावें तें त्याला लवकर समजे, आणि त्यामुळें त्याला शिकविण्याविषयीं हरिपंतांस अधिक हुरूप येऊन, त्यांना फार आनंद होई. सखारामाचें मोडी बालबोध अक्षरही फार सुरेख असे. सारांश, सात वर्षांचें वय होईतोंपर्यंत, सखारामाचें सर्व शिक्षण ( ह्मणजे त्या वेळच्या मानानें लिहिणें, वाचणें व हिशेब ) पूर्ण झालें ! असा बुद्धिमान व सुगुणी पुत्र निपजणें, हें तरी एक महाभाग्य होय, असें समजावें. ‘ एकेनापि सुवृक्षेण पुष्पितेन सुगंधिना । वासितं तद्वनं सर्वं सुपुत्रेण कुलं यथा ’ या ह्मणीची

सत्यता व्यवहारांत पदोपदीं आपल्या अनुभवास येत असल्यामुळें येथें विस्तार करण्याचें कारण नाहीं. असो.

सखाराम सात वर्षांचा झाल्यावर, शके १७३० ( सन १८०८ ) ह्या वर्षीं हरिपंतांनीं त्याचें मौंजीबंधन केलें. त्यानंतर त्रिकालसंध्या, देवपूजा, ब्रह्मयज्ञ, वैश्वदेव इत्यादि नित्यकर्में व भगवद्गीता, विष्णुसहस्रनाम हीं शिकण्यांत सखारामाचे कांहीं दिवस गेल्यावर, वेदाध्ययन सुरू झालें. हरिपंत हे उत्तम विद्वान् होते, असें मागें सांगितलेंच आहे. ते स्वतांच सर्व शिकवीत असत. वेदाध्ययनांतही सखारामाची तीव्रबुद्धि व अपूर्वस्मरणशक्ति चांगली नजरेस आली ! उघडच आहे, स्वच्छ आरशापुढें जी वस्तु येईल तिचें प्रतिबिंब त्यांत पडणारच.

त्यावेळीं मराठींत गद्यग्रंथ बहुधा नव्हतेच ह्मटलें तरी चालेल. पद्यग्रंथांचा भरणा मात्र फार मोठा होता. त्यांतही हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप इत्यादि ग्रंथ पौराणिक असून, त्यांत प्रासादिक कवींची रसाळ वाणी स्वेच्छ विहार करीत आहे, आणि ह्मणून धार्मिकता व चित्तवेधकता हे गुण त्यांचे आंगीं विशेष आहेत. तसेंच हे ग्रंथ प्रायः ओंवीबद्ध असून सुबोध आहेत. ह्मणून तेच वाचण्याकडे लोकांची प्रवृत्ति विशेष असे. तथापि त्यावेळीं छापखान्यांची सोय नसल्यामुळें, ते ग्रंथ हातींच लिहावे लागत असत. अशी तेव्हांची स्थिति होती.

कोणी पोथी वाचूं लागला असतां, ती ऐकण्याला त्या-

वेळीं मुलेंही बसत असत. व अजूनही तीं बसलेलीं मुळींच दृष्टीस पडत नाहींत असें नाहीं. सखारामास तरी पोथ्या वाचण्याचा नाद लागण्यास हेंच कारण झालें. सखारामाची निसर्गतःच परमार्थप्रवृत्ति व तीव्रबुद्धि असल्यामुळें, त्याला त्या पोथ्यांचा अर्थ उत्तम कळत असे. भक्तविजयांतील ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम इत्यादि भगवद्भक्तांच्या कथांत तर सखाराम अगदीं तल्लीन होत असे, व आपणही त्यांच्या सारखेंच व्हावें, असे विचार त्याच्या मनांत एकसारखे घोळूं लागत. सारांश, पोथ्या ऐकत बसतां बसतां, त्याला त्यांची फारच अभिरुचि लागली, व त्या नेहमीं वाचावयास मिळा-व्या, ह्मणून त्यानें त्या लिहून घेण्याचा सपाटा लाविला. ज्ञानेश्वरी, विवेकसिंधु इत्यादि वेदांतग्रंथांचें मनन, हा सखारामाचा सर्वांत आवडता विषय होऊन गेला. ह्या ग्रंथांचे नित्यावलोकनापासून सखारामाचे बुद्धीस वेदांताचें उत्कृष्ट वळण लागलें, व त्यांत त्याचा बराच प्रवेश झाला. दुसरें असें झालें कीं, हे ग्रंथ वाचीत असतां, त्यास अनेक शंका येत, आणि त्यांचें समाधान केवळ त्याच ग्रंथांनीं होईना; कारण त्यांत अनेक संस्कृत कठीण शब्द येत, व त्यांचा बरोबर अर्थ सखारामास कळत नसे. ह्मणून, आपण संस्कृत शिकावें, अशी त्यास फार इच्छा झाली. आणखी असें कीं, ज्यांत ब्रह्मस्वरूपाचें प्रतिपादन केलें आहे, असे ग्रंथ संस्कृतांत बहुत आहेत, हें त्यास समजलें होतें, ह्मणून त्यानें लवकरच वडिलांजवळ रूपावली, समासचक्र इत्यादि शिक-

ण्याची सुरुवात केली. इतक्या अल्पवयांत आपण होऊन शिकणारीं मुलें किती बरें आढळतील ! सारांश, अशा असाधारण थोर व्यक्तींचीं सर्वच कृत्यें चमत्कृतींनीं युक्त असावयाचीं ! असें ह्मणतात तें खरें आहे.

**सखारामाचें** वेदाध्ययन बहुतेक संपत आलें. त्याचप्रमाणें रूपावली, समासचक्र, अमरकोश हींही सर्व झालीं. तेव्हां आतां काव्यव्युत्पत्ति वगैरे शिकण्याकरितां त्यास कोठेंतरी जाणें जरूर होतें. त्यावेळीं तारापूर[1] येथें जगन्नाथ[2] शास्त्री आठल्ये ह्या नांवाचे विद्वान् गृहस्थ, बर्वे यांजकडे पुराण सांगण्यास राहिले होते. यास्तव त्यांजवळ अध्ययनाकरितां **सखारामास** पाठवावें, असें **हरिपंतांनीं** योजिलें. कारण कृष्णाजीपंत बर्वे हे **हरिपंतांचे** सख्खे भाचे असून, त्यांचे द्वितीय चिरंजीव **पांडोबा**[3] हे त्यावेळीं तेथेंच राहत होते.

**सखारामानें** तारापुरास जगन्नाथशास्त्र्यांजवळ कांहीं दिवस काव्यव्युत्पत्ति व तर्कसंग्रह ह्यांचें अध्ययन केलें. त्यांत **सखारामाची** उत्तम गति झालेली पाहून, व त्याची तीव्र बुद्धि पाहून, त्यांस फार संतोष होत असे. **सखारामा**च्या अप्रतिम गुणांमुळें त्याजवर शास्त्रीबावांची फारच

---

१ तारापूर, ता० माहीम, जिल्हा ठाणें. तारापुरास बर्व्यांचें घराणें प्रसिद्ध आहे. २ हे शास्त्रीबावा पांगळे होते. ३ पांडोबांचें संक्षिप्त चरित्र पुढें परिशिष्ट दुसरें यांत दिलें आहे. सर्वांत वडील बंधु काशिनाथ तात्या, ह्यांची हकीकत पुढें सांगण्यांत येईलच. तिसरे मोरू काका, ह्यांस चुलत्याचे मांडीवर दत्तक दिलें होतें.

प्रीति जडली होती. बुद्धिमान् व सुगुणी विद्यार्थ्यांवर कों-णत्या शिक्षकाचें प्रेम जडल्यावांचून राहणार आहे ?

रावबाजींनीं पेशवाईची राखरांगोळी केल्यावर, पेशव्यां-च्या पदरचें बहुतेक शास्त्रीमंडळ, अह्लीबागकर आंग्रेसरकार यांणीं आपलेजवळ ठेविलें होतें. यास्तव, अह्लीबागेस जाऊन तेथें न्यायशास्त्राचें संपूर्ण अध्ययन करावें, असें शास्त्रीबा-वांच्या अनुमतानें ठरल्यावर, **सखाराम पांडोबांची** अनुमति घेऊन अह्लीबागेस आला. तेथील शास्त्रीमंडळांत त्र्यंबकशास्त्री शाळिग्राम हे, न्याय, मीमांसा, व्याकरण, धर्म, वेदांत इ-त्यादिकांत अतिनिपुण व श्रौतस्मार्तकर्मनिष्ठ असे होते. त्यां-चा स्वभाव फार शांत असून, अह्लीबागेस त्यांचा लौकिक चांगला होता. **सखारामानें** त्यांजकडे जाऊन आपली सर्व हकीकत आणि येथें येण्याचा उद्देश हीं कळवितांच, त्यांनीं त्यास अध्ययनास येण्याची अनुमति दिली. अह्लीबागेस उ-दरनिर्वाहाची कांहींच सोय नव्हती, ह्मणून **सखारामानें** म-धुकरी वृत्ति स्वीकारिली ! हाच मधुकरीचा पहिला प्रसंग असून येथून पुढें अखेरपर्यंत हीच वृत्ति कायम होती.

अह्लीबागेस आल्यावर कांहीं दिवसपर्यंत **सखारामाचा** अध्ययनक्रम सुरळीत चालला होता. परंतु पुढें त्र्यंबकशास्त्री यांस मस्तकशुळाची व्यथा उत्पन्न होऊन ती दिवसें दिवस वाढतच गेल्यामुळें, त्याचे अध्ययनास व्यत्यय येऊं लागला. कांहीं दिवसांनीं शास्त्रीबावांचें सर्व कुटुंब पुण्यास होतें, ह्म-णून ते पुण्यास जावयास निघाले. तेव्हां तर आतां काय क-

रावें ? ह्या विचारांतच सखारामाचे कांहीं दिवस गेले ! पण मग लवकरच त्याची ती काळजी दूर झाली. तो प्रकार असा.

त्यावेळीं आगगाडी नव्हती. व शास्त्रीबावा आजारी असल्यामुळें गाडींतून किंवा घोड्यावरूनहीं जाण्याची सोय नव्हती. डोलींत बसून जावें तर बरोबर कोणी मनुष्य नेण्याची सोय नाहीं. आणि वाटेनें पाणी वगैरे देण्यास ब्राह्मण मनुष्य जरूर पाहिजे. अशी अडचण आल्यामुळें शास्त्रीबावांस मोठी पंचाईत पडली. पण ही हकीकत सखारामास कळतांच, तो शास्त्रीबावांकडे येऊन ह्मणाला, गुरूजी, आपणांस इतकी अडचण कां पडली ? आपली आज्ञा होईल, तर मी आपणाबरोबर पुण्यास येऊन वाटेनें आपली शुश्रूषा ठेवीन. आपण गेल्यावर मला येथेंच राहून काय करावयाचें आहे ? मीही पुण्यासच येतों, ह्मणजे माझी अध्ययनाचीही सोय होईल.

त्याप्रमाणें सखाराम शास्त्रीबावांबरोबर पुण्यास आला. त्यानें वाटेनें शास्त्रीबावांची फारच उत्तम शुश्रूषा ठेविली, व त्यांचा त्याजवर पूर्वीं पासूनच फार लोभ होता, ह्मणून शास्त्रीबावांनीं त्यास आपलेच घरीं ठेविलें. पुण्यास आल्यावर कांहीं दिवसपर्यंत शास्त्रीबावांची प्रकृति बरी होती, ह्मणून ते स्वतांच सखारामास पाठ सांगत असत. पण पुढें प्रकृति बिघडल्यामुळें त्यांच्यानें पाठ सांगवेना, ह्मणून मग सखाराम विश्रामबाग पाठशाळेंत अध्ययनास जाऊं लागला. त्यावेळीं रघुनाथशास्त्री हे पाठशाळेंत मुख्याध्यापक असत.

सखाराम पुण्यास येण्यापूर्वीच त्याची योगाभ्यासाकडे वृत्ति झालेली होती. (तो प्रकार पुढें सांगण्यांत येईलच.) ह्मणून त्यानें शास्त्रीबावांस सांगितलें कीं, मला निजण्याबसण्यास व अभ्ययनास एकांत स्थळ मिळेल तर बरें. त्यांचे घरीं जिन्याशेजारीं अगदीं एके अंगास एक खोली होती, ती **सखारामास** पसंत पडून तेथें बसण्याविषयीं त्यानें परवानगी विचारिली. पण ती ब्रह्मपुरुषाची खोली आहे! असें समजून घरचीं माणसें कोणीही तेथें जात *नसत! ह्मणून पहिल्यानें परवानगी मिळेना. परंतु **सखाराम** ह्मणाला,

---

* अशा तऱ्हेच्या आख्यायिकांनीं कित्येक ठिकाणीं मोठमोठीं घरें ही ओसाड पडलेलीं आढळतात! फार कशाला! सुधारणाशिखरास पोंचलेल्या **लंडन** शहरांतच अशा प्रकारचीं १००० घरें ओसाड पडलेलीं आहेत!! असें नुकतेंच आमच्या वाचनांत आलें आहे. परंतु बहुतेक ठिकाणीं अज्ञानाव्यतिरिक्त कांहींच नसतें. क्वचित् प्रसंगीं काकतालीय न्यायानें एखाद्यास अनुभव आला असेल, म्हणून तेवढ्यावर कार्यकारणभाव न पाहतां विश्वास ठेवणें, हें विचारी मनुष्यांस योग्य नाहीं. येथें आह्मी आपला स्वतांचा अनुभव लिहिल्यास अप्रासंगिक होणार नाहीं. पिशाच्याचा उपद्रव होतो, अशा समजुतीनें सुमारें ६०।७० वर्षे ओसाड पडलेला असा एक वाडा **कल्याणास** आहे! तेथें राहण्यास जाण्याला कोणीही धजावत नाहीं! तथापि आह्मी व आमचे दोन तीन मित्र कुटुंबांसुद्धां खुशाल त्या वाड्यांत राहण्यास गेलों!! आम्ही तेथें पुष्कळ दिवस राहत होतों, पण आम्हांपैकीं कोणास कधींही पैशाचिक उपद्रव झाला नाहीं!!! सारांश, " रामदास सांगे खूण॥ भितो आपणा आपण "! दुसरें काय?

" ब्रह्मपुरुषाचा व माझा स्नेह आहे, तो मला पीडा देणार नाहीं ! " असा त्याचा विशेष आग्रह व धैर्य पाहून शास्त्रीबावांनीं अखेर अनुमति दिली. त्या दिवशीं सखाराम तेथें निजला असतां, सुमारें मध्यरात्र उलटल्यावर आपणास कोणी तरी दाबून धरिलें आहे असा भास होऊन, सखाराम अगदीं भयाभीत होऊन गेला ! आणि एकदम दचकून जागा झाला, तों तेथें कांहीं नाहीं ! हृदयांत वायु स्तब्ध झाल्यामुळेंच हा प्रकार घडला असावा, असें सखारामानें लागलेंच ताडलें ! नंतर उठून चूळबीळ भरून टाकून तो पुन्हा स्वस्थ निजला. सखाराम शास्त्रीबावांकडे असेपर्यंत त्याचें निवासस्थान तीच खोली होती. परंतु या " ब्रह्मपुरुषास " त्या कल्पित ब्रह्मपुरुषाची, कधींच कांहीं बाधा झाली नाहीं !

सखाराम पाठशालेंत असतां, त्याचें सद्वर्तन आणि तीव्रबुद्धि पाहून त्यावर अध्यापकांचा व सहाध्यायांचा फार लोभ जडला. त्याचे सहाध्यायी नित्य त्याजकडे विषय समजावून घेण्यास येऊं लागले. त्या सर्वांस तो मनापासून पाठ समजावून देई. शास्त्रीबावांचे घरीं जेवण्याची सोय नसल्यामुळें सखारामास मधुकरी मागावी लागते, ही गोष्ट त्याचे सहाध्यायांचे लक्षांत येतांच, त्यांनीं आपले गुरुजींस सांगून त्यांजकडून सखारामास पाठशालेंतील स्कॉलरशिप मिळण्याची तजवीज केली. परंतु सखाराम ह्मणे, मला हें ' भृतकाध्ययन ' नको. माझी वारांची तजवीज होईल तर करा ह्मणजे झालें ! तेव्हां निरुपायामुळें रघुनाथ शास्त्र्यांनीं त्याचे वार लावून दिले.

तसेंच सखारामाचें बिऱ्हाड पाठशाळेपासून बरेंच लांब होतें ह्मणून सदाशिव पेठेंत बिऱ्हाडाची सोय करून दिली. सदाशिव पेठेंत आल्यावर थोडे दिवसांनीं सखारामाची प्रकृति आमांशामुळें फार बिघडली. तथापि त्यावेळीं त्याचे सहाध्यायांनीं त्याची फारच उत्तम शुश्रूषा ठेविल्यामुळें ती लवकरच चांगली सुधारली. प्रकृति बिघडल्यामुळें घरीं जावें असा सखारामाचा एक दोनदां विचार झाला होता, परंतु त्याचे सहाध्यायांनीं तो लागलाच मोडून काढिला. कारण, तो तेथें असल्यानें त्यांस मोठी मदत असे. अशा रीतीनें अध्यापक व सहाध्यायी यांचा अत्यंत लोभ संपादन करून सखाराम अध्ययन करीत असतां, तर्कदीपिका, मुक्तावली व तीवरच्या टीका इत्यादि ग्रंथ पूर्ण होऊन न्यायांत सखारामाची चांगली प्रवीणता झाली.

इतक्यांत, सखाराम एके दिवशीं एकांतीं कांहीं विचार करीत असतां, त्याच्या पूर्ण लक्षांत आलें कीं, आपल्या वृत्तींत अलीकडे वादप्रवृत्ति आणि वादांत दुसऱ्याचा पाडाव करण्याची उत्कट इच्छा हीं विशेष जागृत झालीं आहेत ! तो आपल्याशीं ह्मणाला, अरे, काय हा मूर्खपणा ! तत्वज्ञान सुगम व्हावें ह्मणून वेदांत, आणि वेदांतांत प्रवेश व्हावा ह्मणून न्याय आरंभिला. असें असतां, इच्छित हेतु बाजूस राहून हें मध्येंच काय विघ्न आलें ? असो. आतां झालें तें झालें. इतक्यांतच अंतर्यामीं शुद्धि आली, हेंच महा-

भाग्य समजून आतां अध्ययनसमाप्ति करावी, व शेषकाल ब्रह्माभ्यासांत घालवावा, हेंच उत्तम ! ! !

मग दुसरेच दिवशीं **सखारामानें** आपले गुरुजी व सहाध्यायी ह्यांची आज्ञा घेतली, व **तारापुरास** येण्याची तयारी केली. त्यावेळीं त्याचे सहाध्यायांस व गुरूजींसही वाईट वाटलें. पण **सखारामानें** प्रकृति बिघडल्याचें निमित्त केल्यामुळें त्यांचा नाइलाज झाला. आणि खरेंच, त्याची **प्रकृतिच** बिघडली होती, व ती जास्त बिघडण्याचाही संभव होता ! मग त्यानें तेथें राहावें तरी कसें ? असो. अशा रीतीनें आमच्या **चरित्रनायकांचा** अध्ययनक्रम समाप्त झाला.

---

# प्रकरण तिसरें.

पूर्वे वयसि यः शान्तः सशान्त इति मे मतिः ।

पञ्चतन्त्र.

मनुष्यमात्राचे जन्माबरोबरच त्याचे आंगच्या बहुतेक वृत्ति उत्पन्न होतात. मात्र त्यावेळीं त्या बीजरूपानें असून, पुढें त्यांस जशी परिस्थिति अनुकूल किंवा प्रतिकूल होते, तशा त्या उदयास येतात, किंवा लयास जातात. वैराग्य-वृत्तीसही हीच गोष्ट लागू आहे, हें प्रस्तुत चरित्रावरून चांगलें व्यक्त होतें.

करंबोंवणापासून सुमारें अर्ध्या कोसावर बिवली ह्या नांवाचें एक गांव आहे. तेथें **श्रीलक्ष्मीकेशवाचें** देवालय आहे. तोच **श्रीलक्ष्मीकेशव केतकरांचा** कुळस्वामी होय. यास्तव वर्षांतून कांहीं दिवस तेथें राहण्यास जाण्याचा त्यांचा परिपाठ असे. तेथील ती **श्रीलक्ष्मीकेशवाची** मनोहर मूर्ती पाहून **सखारामास** फारच आनंद होई. मग मग तर त्याला त्या सगुण मूर्तीचा इतका ध्यास लागून राहिला कीं, त्यास जेवण खाण कांहींच सुचेनासें झालें! जेव्हां पाहावा तेव्हां **सखाराम** आपला मूर्तीजवळ उभा! रात्रीस सर्व मनुष्यांस झोंपा लागल्या, कीं **सखाराम** हळुच उठे, व देवाजवळ जाऊन पूर्ण एकाग्रतेनें मूर्तीचें निरीक्षण करीत बसे. एखादे वेळीं सहज कोणी जागें होऊन, "**सखाराम**,

दरवाजवळ काय करितोस ! " ह्मणून विचारिलेंच, तर "दिव्याची वात नीट करितों, " अशा तऱ्हेचें कांहीं तरी समर्पक उत्तर देऊन लागलाच जाग्यावर येऊन निजे. सारांश, अष्टौप्रहर त्याचें सर्व लक्ष त्या सगुण मूर्तीचें ध्यान करण्यांत गुंतलेलें असे ! ह्या वेळीं **सखाराम** अवघा चार पांच वर्षांचा होता ! ह्या आख्यायिकेवरून, अगदीं अल्पवयांत, किंबहुना जन्मापासूनच, ह्या असाधारण पुरुषाची ईश्वरचरणीं निष्ठा उत्पन्न झाली होती, असें उघड होत नाहीं काय ? वैराग्यवृत्ति उत्पन्न होऊन ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान होण्यास सगुणेश्वरनिष्ठा प्रथम उत्पन्न व्हावी लागते, असें ज्ञात्यांचें ह्मणणें आहे, व त्याप्रमाणेंच आमच्या **चरित्रनायकांचे** वृत्तींत अनुक्रमें बदल होत गेल्याचें दिसतें.

एके वेळीं **सखाराम** दोन होड्या व दोन कुणबिणी बरोबर घेऊन खाडीपलीकडचे गांवीं भात व पेंढा आणण्याकरितां गेला होता. परत येतेवेळीं एकाएकीं फारच मोठें वादळ झालें. मोठमोठ्या लाटा उसळूं लागल्या, कडेवरचीं झाडें धडाधड कोसळूं लागलीं, घरांवरचे शाकार व माच, गंज्या वगैरे चटसारीं वाऱ्याचे तडाक्यानें उडून जाऊं लागलीं ! इतक्यांत, दोन्ही होड्या एकमेकींस ज्या दोरखंडांनी बांधिल्या होत्या, त्यांपैकीं एका आंगचे बंद तुटले, व होड्यांत पाणी येऊं लागलें ! आतां होड्या खास बुडणार, असें पाहून त्या दोन्ही बाया रडूं लागल्या. पण **सखाराम** मुळींच न घाबरतां त्यांस ह्मणाला, तुह्मी रडूं नका, सर्वत्रांची काळजी

वाहणारा श्रीलक्ष्मीकेशव समर्थ आहे. ह्मणून तुह्मी त्याचा धांवा करा, ह्मणजे तो आपणांस ह्या संकटांतून मुक्त करील. ह्या त्याच्या सांगण्यानें त्या अडाणी व जात्याच भीरु अशा अबलांस कसचें धैर्य येणार ? त्यांचा रडण्याओरडण्याचा क्रम सुरूच होता ! सखारामानें मात्र मनःपूर्वक ईश्वरस्तवन सुरू केलें. श्रीलक्ष्मीकेशवा, नारायणा, संपूर्ण जगाची उत्पत्ति, स्थिति आणि लय करणारा तूंच आहेस. ह्यास्तव ह्या संकटांत माझा अंत होऊं देऊं नकोस. कारण, मनुष्य जन्म फार दुर्मिळ, त्यांतही ब्राह्मणजन्म व मोक्षप्राप्तीची इच्छा हीं तर फारच दुर्मिळ आहेत. आणि असा दुर्मिळ जन्म प्राप्त होऊन त्याचें मी कांहींच सार्थक्य केलें नाहीं ! असें ह्मणून श्रीलक्ष्मीकेशवाचें सप्रेम ध्यान करीत मोक्षप्राप्तीची दृढ इच्छा धरून स्वस्थ बसला ! मनांतला आशय हा कीं, यदाकदाचित् ह्या संकटांत अंत झालाच, तर पुनर्जन्मीं तरी मोक्षप्राप्तीची इच्छा राहील ! ! अहाहा, अवघ्या दहा वर्षांच्या वयांत इतकें मुमुक्षुत्व प्राप्त झाल्यावर त्याला पुनर्जन्म कशास पाहिजे आहे ? तो या लोकींच मुक्त व्हावयाचा ! ! ! इकडे सखाराम ध्यान करीत आहे, इतक्यांत, होड्यांचे आसपासचा शंभर हातांवरील वारा अगदीं पडला, लाटा शांत झाल्या व सखाराम कुणात्रिणींसह सुखरूप अलीकडे आला ! पण चमत्कार असा कीं, शंभर हातांपलीकडे पूर्ववत्प्रमाणें बराच वेळ वादळ सुरू होतें ! हा अपूर्व चमत्कार पुष्कळांनीं

पाहिला, व तेणेंकरून त्यांस मोठें आश्चर्य वाटलें ! ! ! तथापि त्यावेळीं " **तारत्यापुढें मारत्याचें कांहीं चालत नाहीं** " ह्यापलीकडे फारसें कोणी लक्ष दिलें नाहीं.

**सखारामास** लहानपणींच पोथ्या वाचण्याचा विशेष नाद लागला व विशेषेंकरून ज्ञानेश्वरी, विवेकसिंधु इत्यादि ग्रंथांचे अवलोकनानें वेदांताचीही बरीच गोडी लागली होती, वगैरे मजकूर मागील प्रकरणांत सांगितलाच आहे. **सखाराम** तारापुरास आल्यावर त्यानें जगन्नाथशास्त्री आठल्यांपासून 'शिवषडाक्षरी मंत्राची दीक्षा' घेतली. ह्यावेळीं **सखारामास** नुकतें कोठें तेरावें वर्ष लागलें होतें ! **सखारामाचे** वडील बंधु **पांडोबा** हे ह्यावेळीं तारापुरासच होते व ते हठयोगांत परम निपुण होते. त्यांनीं **सखारामाची** योग्यता ओळखून त्यास धोती, बस्ति, नेती इत्यादि षट्क्रिया व प्राणायाम आसन इत्यादि योगमार्गाचे विषय नित्य समजावून देण्याचा क्रम सुरू ठेविला होता. ह्याप्रमाणें **सखाराम** तेराव्या वर्षापासूनच योगमार्गानें वर्तूं लागला.

तारापुरास असतां, दररोज अरण्यांत जाऊन, एकांतीं मोठमोठ्यानें ओरडून व नाचून सप्रेमबुद्धीनें ईश्वरभजन करण्याचा **सखारामाचा** क्रम चालू असे. शिवाय घरीं श्रीशिवषडाक्षरी मंत्राचा जप व योगाभ्यास हीं चालूच असत. असा क्रम कांहीं दिवस चालू असतां, सप्रेमता विशेष वाढली, व तेणेंकरून धारणेच्या अभ्यासानें चित्त निर्विकल्प सुख घेऊं लागलें. एके दिवशीं **सखारामास** वाटलें कीं,

पाहिजे त्या पदार्थाची धारणा धरिल्यानें चित्ताची निर्विकल्पता व्हावी, ही अभ्यासाची गोष्ट होय. विवेकांतही ती कायम राहिली पाहिजे. पण ती कायम कशी राहणार? ती कायम राहण्यास सद्गुरुकृपाच झाली पाहिजे. पण असा सद्बोध देणारा सद्गुरु तरी कोण मिळतो? व त्याचें दर्शन आपणांस कसें व्हावें? अशी **सखारामास** मोठी विवंचना पडली.

याप्रमाणें **सखाराम** विवंचनेंत असतां, त्यानें एके दिवशीं सहज मंडळींत बोलतां बोलतां, समर्थ ***रघुनाथ भटजी मोघे** नाशिककर, ह्यांचा परम पवित्र महिमा **पांडोबांचे** तोंडून ऐकिला. तो ऐकतांच, हेच सद्गुरु आपली सर्व चिंता दूर करून, आपणास मोक्षमार्ग दाखवितील, असा त्याच वेळीं **सखारामाचे** मनानें ग्रह घेतला. त्यास असें झालें कीं, केव्हां एकदां ते सद्गुरुचरण आपल्या दृष्टीस पडतील! **पांडोबा** नाशिकास केव्हां केव्हां जात, हें **सखारामास** माहीत होतेंच. ह्मणून एके दिवशीं त्यानें मला नाशिकास न्याल काय? ह्मणून **पांडोबांस** विनंती केली. **पांडोबा** म्हणाले, मी जाईन तेव्हां तुला नेईन. तेव्हां **सखारामास** फार आनंद झाला! व तो सद्गुरुदर्शन होणारा दिवस कधीं उगवतो त्याची वाट पहात बसला.

**पांडोबा** नाशिकास जाण्याचा दिवस तर लवकरच आला.

---

* हे आमच्या चरित्रनायकांचे व पांडोबांचेही गुरु होत. ह्यांचें संक्षिप्त चरित्र मिळालें तेवढें पुढें परिशिष्ट पहिलें यांत दिलें आहे.

पण त्यापासून सखारामास आनंद न होतां उलट दुःखच झालें. तो प्रकार असा. समर्थ रघुनाथ भटजींची प्रकृति कांहींशी बिघडल्याचें वर्तमान समजलें, व दर्शनासही बरेच दिवस झाले होते, ह्मणून पांडोबा नाशिकास जाण्यास निघाले. व त्यांनीं सखारामास तूं येतोसना? ह्मणून विचारिलें. तेव्हां सखारामानें मोठ्या आनंदानें आपली जाण्याची तयारी केली, व शास्त्रीबावांजवळ परवानगी मागितली. पण शास्त्रीबावा म्हणाले, हें प्रकरण आरंभिलें आहे, तें संपलें ह्मणजे जा! झालें, सखारामाच्यानें कांहीं शास्त्रीबावांजवळ भीडेमुळें जास्त बोलवेना! अखेर पांडोबा एकटेच नाशिकास गेले. त्यांस पोंचविण्याकरितां सखाराम बराच लांबपर्यंत गेला होता. मागें फिरतांना डोळ्यांत पाणी आणून सद्गदित कंठानें तो पांडोबांस ह्मणाला, माझें दुर्दैव बलवत्तर, ह्मणूनच मला गुरुजींनीं आज्ञा दिली नाहीं! माझें पातक संपल्याखेरीज मला गुरुदर्शन कसें व्हावें? असो आतां तुह्मी जा. सद्गुरुकृपा करून चरणांचें दर्शन देतील तो सुदिन! याप्रमाणें मोठ्या कष्टानें पांडोबांस निरोप देऊन सखाराम परत आला.

'निराशा परमंसुखं' असें ह्मणतात खरें, परंतु तें सर्वथा खरें नाहीं. हेंच पहाना, सखारामाची गुरुदर्शनाविषयींची निराशा झाली, तरी त्याला तीपासून बिलकुल सुख न होतां, उलट अतिशय दुःखच झालें. व 'कीं तोडिला तरु फुटे आणखी भरानें' या न्यायानें त्याची उत्कंठा फारच वाढली.

तो इतकी कीं, दोन तीन दिवसांत [illegible] असमा-
आल्यासारखी वाटूं लागली ! अन्न गोड [illegible]ना, झोंप येई-
ना, चित्तास फारच अस्वस्थता आली आणि यामुळें अध्यय-
नही सुचतनासें झालें ! याप्रमाणें **सखारामाचे** तीन दिवस तर मोठ्या कष्टतर स्थितींत गेले !

" कस्यात्यन्तं सुखमुपनतं दुःखमेकान्ततोवा । नीचैर्गच्छत्युपरिच दशा चक्रनेमिक्रमेण " या कालिदासोक्तीप्रमाणें 'सुखामागून दुःख व दुःखामागून सुख' ही परंपरा चालावयाचीच. हेंच पहाना, **सखारामानें** तीन दिवस किती तरी दुःखांत काढिले ! पण तोच चौथा दिवस असा उजाडला, कीं त्या दिवशीं तो तें सर्व दुःख विसरून जाऊन आनंदपर्वताच्या शिखरावरच जाऊन बसला ! **पांडोबा** गेल्यावर चौथ्या दिवशीं, ( ह्मणजे माघ शुद्ध १० शके १७४० सन १८१९ ) तिसरे प्रहरीं, पुराणिकबावा ओटीवरच्या झोंपाळ्यावर निजले आहेत, व **सखाराम** खालीं अध्ययन करीत बसला आहे, इतक्यांत, एक ब्राह्मण एकाएकीं **सखारामाचे** पुढें येऊन उभा राहिला ! तो शरीरानें ठेंगणा असून त्याचा वर्ण गौर होता; त्याचे कपाळीं भस्माचा आडवा पट्टा व गळ्यांत बत्तिस रुद्राक्षांची माळ आणि शुभ्र यज्ञोपवित होतें; एक पंचा नेसलेला असून एक अंगवस्त्र आंगावर होतें; सारांश, त्याचें स्वरूप अगदीं साधें होतें. तरी त्याचें तेज असें कांहीं विलक्षण होतें कीं, त्यास पहातांच **सखारामाचे** डोळेच दिपून गेले. सद्गुरूचें

स्वरूपवर्णन **पांडोबांच्या** तोंडून **सखारामानें** ऐकिलें होतें. त्यावरून आपण ज्यांच्या दर्शनाविषयीं अत्युत्सुक झालों आहों, तेच हे सद्गुरुमहाराज असावे, असें **सखारा-माच्या** लागलेंच मनांत आलें.' त्यासरसे त्याच्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले, कंठ सद्गदित झाला व डोळ्यांवाटे अश्रु-धारा वाहूं लागून तो क्षणभर देहभानच विसरून गेला! इतक्यांत, त्या ब्राह्मणानें '**सखाराम**,' ह्मणून मोठ्यानें हाक मारिली, व ह्मणाला, सावध हो, असा खेद कां **करितोस?** हे शब्द ऐकतांच **सखाराम** देहभानावर येऊन त्यानें त्या ब्राह्मणास साष्टांग नमस्कार घातला, व आनंदाश्रूंनीं त्याचे चरणांस स्नान घातलें. नंतर त्या ब्राह्मणानें मस्तकीं वरदहस्त ठेवून उठण्याविषयीं आज्ञा करितांच **सखाराम** उठून उभा राहून ह्मणाला, सद्गुरुमहाराज, येथें अकस्मात् येणें कसें झालें? तेव्हां सद्गुरु हंसून ह्मणाले, अरे, तुला दर्शन देण्या-साठीं आलों. तुला नाशिकास येण्याची फारच उत्कंठा झाली होती ना? असो, तेथें येऊन तुला जें कांहीं कर्तव्य होतें, तें आता येथेंच करून घे. **सखाराम** ह्मणाला, चरण-दर्शनानेंच मी कृतार्थ झालों. तथापि मला एकदोन शंका आहेत त्या विचारितों. 'तूंच अविनाशी व निर्विकल्प ब्रह्म आहेस,' असें सर्व श्रुतिस्मृतिपुराणें सांगतात. व तें सयु-क्तिक असून सत्य आहे असें वाटतें. परंतु त्याविषयीं पुन्हां संशय उत्पन्न होतो तो कां? ( अहं तत्वमसि। ) निःसंशय मीच ब्रह्म आहें, अशी पूर्ण भावना कां उत्पन्न होत नाहीं?

हें ऐकून समर्थांनीं सखारामास सङ्क्षेप करून अद्वैत सिद्धांतांचें पूर्ण ज्ञान करून दिलें. व त्याच्या सर्व शंकांचें निरसन केलें. तेव्हां ( अहंतत्वमसि । ) निःसंशय मीच ब्रह्म आहें अशी आद्विवृत्ति सखारामाचेठायीं पूर्ण उदय पावली. नंतर सखारामानें सद्गुरूंस अनेक साष्टांगनमस्कार घातले व प्रार्थना केली कीं, आपला वियोग नसावा. तेव्हां सद्गुरु म्हणाले, तुमचाआमचा यामागेंही वियोग नव्हताच, मग यापुढें तरी कसा असणार आहे ! असो, मला येऊन बराच वेळ झाला, तिकडे माझी वाट पाहत असतील, याकरितां आतां मी जातों. ह्या निर्विकल्प अद्वैतब्रह्मानंदाचा उपभोग घेऊन अज्ञानी भाविकांस अखंड सुख दे. अशी आज्ञा करून व सखारामाचे मस्तकीं वरदहस्त ठेवून सद्गुरुमहाराज समर्थ रघुनाथ भटजी तेथच्या तेथेंच अंतर्धान पावले ! *

श्रीसमर्थ रघुनाथ भटजी आपल्या एकनिष्ठ शिष्यास दर्शन देऊन अंतर्धान पावल्यावर, सखाराम पूर्ववत् अध्ययन करूं लागला. त्यावेळीं तेथें दुसरें कोणी नव्हतें. शास्त्रीबाबा मात्र झोंपाळ्यावर होते, पण ते निद्रिस्त होते. ह्यामुळें झालेला प्रकार त्यावेळीं तसाच गुप्त राहिला.

---

* वरील मजकूर वाचून कित्येक वाचक आह्मावर कदाचित् अतिशयोक्तीचा आरोप करण्यास तयार होतील. तथापि यांत बिलकुल अतिशयोक्ति नाहीं. योगाभ्यासानें पाहिजे त्या ठिकाणीं इच्छामात्रेंकरून जातां येतें, भूत, भविष्य, वर्तमान सांगतां येतें, व आणखीही कित्येक सृष्टशास्त्रविषयकनियमांविरुद्ध दिसणाऱ्या गोष्टी करितां येतात ! हठप्रदीपिका पाहिल्यास प्रस्तुत विषयाचें कांहींसें स्वरूप समजेल.

ह्या गोष्टीस कित्येक दिवस लोटल्यावर एकेदिवशीं **सखारामाचे** तीर्थरूप तारापुरास आले. त्यांनीं कोंकणांत **सखारामाचें** लग्न निश्चित केलें होतें. फक्त तिथिनिश्चय मात्र व्हावयाचा होता. आणि आतां ते वहिणीकडील मनुष्यांस आमंत्रण करून त्यांस व **सखारामास** कोंकणांत घेऊन जावें ह्मणून आले होते. आपलें लग्न जमविलेलें ऐकून **सखारामास** अतिशय खेद झाला ! व तो मोठ्या फिकीरींतही पडला. त्याचा स्वभाव जात्याच फार भिडस्त होता. ह्यामुळें वडिलांजवळ समक्ष बोलण्याचा त्यास धीर होईना. तथापि स्वस्थ बसून उपयोग नव्हता. ह्मणून इतर मंडळींजवळ सहजगत्या “ मला लग्न कर्तव्य नाहीं, आणि जर मला कोणी आग्रह करितील तर मी पळून जाईन, ” असें तो ह्मणाला. ही हकीकत त्याचे वडिलांस समजली. तेव्हां त्यांस मोठी पंचाईत पडली. कारण, **सखारामाचे** वर्तनावरून, तो खरोखर ह्मटल्याप्रमाणें करील, असें सर्वांस वाटलें. ह्याला युक्तीनें वळविल्याखेरीज कांहीं उपयोग नाहीं, असें जाणून **हरिपंतांनीं पांडोबांस सखारामाचें** मन वळविण्याविषयीं सांगितलें, व आपण कोंकणांत निघून गेले.

हरिपंत गेल्यावर, एकेदिवशीं **पांडोबांनीं सखारामास** एकीकडे नेऊन ह्मटलें, **सखाराम**, विवाह करावयाचा नाहीं असें कां ह्मणतोस ? वडिलांचे आज्ञेप्रमाणें विवाह करून गृहस्थाश्रमधर्मानें चालावें हें उत्तम. असें केल्यानें बोधास ही कांहीं अडचण आहे असें मुळींच नाहीं. इंद्रियदमनही

अल्पायासानें होईल. असे बहुत लाभ आहेत. ह्याकरितां तूं ही गोष्ट नाकारूं नयेस, असें मला वाटतें. त्यावर **सखाराम** ह्मणाला, आपली व वडिलांची आज्ञा मला प्रमाण आहे, व विवाह केल्यानें अनेक लाभही आहेत, ह्या सर्व गोष्टी खऱ्या. तथापि त्यापासून हानिही पुष्कळ आहे. व आपण ती सर्व जाणतच आहां. ती मी आपणांपुढें सांगणें ह्मणजे 'आज्याला नात्वानें शिकविण्या' सारखेंच होय ! याकरितां ती मी सांगत बसत नाहीं. तरी विवाहकरून संसारसमुद्रांत पडण्याची माझी इच्छा नाहीं. ह्मणून आपण मला आग्रह करूं नये. अशानें हा कांहीं कबूल व्हावयाचा नाहीं ह्मणून **पांडोबांनीं** दुसरीच तोड काढिली. ते ह्मणाले, **सखाराम**, तूं माझी आज्ञा मोडणार नाहींस या भरंवशावर तर मी वडिलांस कोंकणांत जाऊन तयारीस लागण्यास सांगितलें. चारपांच दिवसांत आपणांसही कोंकणांत गेलें पाहिजे. असें असून तूं तर माझें ऐकत नाहींस, याला काय ह्मणावें ? तिकडे तर तिथिनिश्चयही ठरला असेल. आणि आतां जर तूं ही गोष्ट कबूल करणार नाहींस, तर आपला व वडिलांचा मोठा दुर्लौकिक होईल ! याकरितां आतां सर्व विचार मी तुजवरच सोंपवितों. तेव्हां **सखाराम** निरुत्तर झाला. अल्पवय आणि भिडस्त स्वभाव पराकाष्ठेचा ! तशांत ज्यांना ब्रह्मज्ञान प्राप्त झालें आहे, असे **पांडोबाच** लग्नाविषयीं उपदेश करूं लागल्यावर नाइलाजास्तव त्याला बंधूच्या ह्मण-

ण्यास रुकार देणें भाग पडलें असेल, हें निराळें सांगाव-यास नकोच !

ह्याप्रमाणें **पांडोबांनीं** मोठ्या प्रयत्नांनी **सखारामाचें** जेम-तेम मन वळवून त्यास घेऊन ते कोंकणांत गेले. परशुरामाच्या **गोंधळेकरांच्या** कन्येबरोबर **सखारामाचा** विवाह झाला. रीतीप्रमाणें सर्व सोहळे व्हावयाचे ते होऊन **सखाराम** कांहीं दिवसांनीं तारापुरास परत आला. सारांश, वडिलांनीं व बंधूंनीं हर प्रयत्न करून **सखारामाचें** लग्न केलें. व त्याचे पायांत सव्वामणाची बिडी तर एकदांची ठोकली ! आणि ते आपल्या समजुतीप्रमाणें स्वकर्तव्यांतून मुक्त झाले ! !

**पांडोबा** व **सखाराम** तारापुरास आल्यावर **सखारामाचा** पूर्ववत् योगाभ्यास, शास्त्राध्ययन वगैरे सुरू झालें. लग्न करण्याचें **सखारामाचे** मनांत पहिल्यापासून नव्हतेंच, आणि पुढें कांहीं दिवसांनीं तर त्यास त्याबद्दल फारच खेद आणि पश्चात्ताप होऊं लागला ! पण त्याचा आतां कांहींच उपयोग नव्हता ! एके दिवशीं **सखाराम** नित्याप्रमाणें अरण्यांत गेला असतां, जवळ पास कोणी मनुष्य नाहीं असें पाहून, त्यानें सद्गदित अंतःकरणानें हस्त जोडून श्रीसवितासूर्यनारायणाची अनन्यभावानें प्रार्थना केली. हे कर्मसाक्षी, जगच्चक्षु, नारायणा, माझी वृत्ति जर बोधवैराग्याकडे असेल, तर प्रारब्धवशात् घडलेल्या या विवाहरूप प्रतिबंधापासून मोक्षप्राप्तीचे कार्यांत कांहीं विघ्न येऊं देऊं नको. आणि संसृति महासागरांतील कामक्रोधादि नक्रांपासून मला सोडव ! एतदर्थ

तुला एक लक्ष नमस्कार घालण्याचा संकल्प करितों. अशी प्रार्थना करून त्यानें त्याच दिवसापासून रोज बाराशें नमस्कार घालण्यास सुरुवात केली. सुमारें ऐशीं हजार नमस्कार झाले असतां, एके दिवशीं कोंकणांतून **पांडोबांस** त्यांचे वडिलांचें पत्र आलें. त्यांत **सखारामाचे** कुटुंबास देवाज्ञा झाल्याचा मजकूर होता ! तें पत्र वाचतांच **पांडोबांस** महद्दुःख झालें ! कारण हें लग्न जमविण्यास त्यांना अत्यंत प्रयास पडले होते, व आतां पुनः **सखाराम** लग्नास कबूल व्हावयाचा नाहीं, ह्याबद्दलही त्यांची खात्री झालेलीच होती ! दुसरें असें कीं, ह्या लग्नास पुरतें वर्षही झालें नव्हतें !! सारांश, ह्या अनिष्ट प्रकारापासून उभय कुटुंबांसही महद्दुःख झालें !!! पण चमत्कार पहा काय तो, कीं ज्याचा ह्या गोष्टीशीं साक्षात् संबंध त्याला दुःख न होतां उलटा फार *आनंदच झाला ! ह्यावरून सुख किंवा दुःख हें निव्वळ मानण्यावर अवलंबून आहे, असें सिद्ध होतें.

---

* हा मजकूर वाचून कित्येकांचा भलताच ग्रह होण्याचा संभव आहे, पण तेच अंमळ शांतपणें विचार करितील, तर त्यांस आपले विचारांचा कोतेपणा लागलाच दिसून येईल. आपली खरोखर इच्छा नसतां, केवळ वडिलांचे आज्ञेमुळें मोहांत गुंतून प्रारब्धवशात् घडलेल्या प्रतिबंधाचा, केवळ यदृच्छेनेंच परिहार झालेला पाहून, अल्पवयी असून पूर्ण योगित्वास न पावलेल्या अशा आमच्या चरित्रनायकांस प्रस्तुत प्रसंगीं आनंद होणें, ही गोष्ट अगदीं साहजिक असून तींत विरुद्ध असें कांहींच नाहीं, अशी आमची तरी निदान मनोदेवता आह्मांस सांगते. मग इतरांस काय वाटेल ते वाटो.

पुढें **सखारामानें** नमस्कारांची संख्या मोठ्या आनंदानें पुरी केली असेल, हें सांगणें नकोच ! कांहीं दिवसांनीं **सखारामाचे** वडील तारापुरास आले होते. त्यावेळीं त्यांनीं **सखारामाचे** दुसरे लग्नाविषयीं गोष्ट काढिली. पण **पांडोबांनीं** वडिलांस सांगितलें, त्याचा वैराग्याकडे ओढा फार आहे, व त्याला संसारांत मुळींच सुख वाटत नाहीं. ह्मणून आपण त्याचें द्वितिय लग्न जमविण्याचे भरीस पडूं नये ! ह्यामुळें त्यांचा नाइलाज झाला. नंतर ते परत कोंकणांत गेले.

पुढें लवकरच **सखाराम** तर्कशास्त्राचें पूर्ण अध्ययन करण्याकरितां तारापुराहून अक्षीवागेस गेला. अक्षीवागेस गेल्यापासून तों अध्ययनसमाप्ति करून परत तारापुरास येईपर्यंतची सर्व हकीकत मागच्या प्रकरणांत सांगितली आहेच. त्यापुढची हकीकत पुढचे प्रकरणांत येईल.

# प्रकरण चौथें.

संनियम्येन्द्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः ।
ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहिते रताः ॥*

भगवद्गीता अ० १२—४.

न्यायशास्त्राचे अध्ययनामुळें वृत्तीस वादप्रवृत्ति जडलेली पाहतांच, सखारामानें अध्ययनसमाप्ति केली, आणि तो तारापुरास आला, इत्यादि मजकूर दुसऱ्या प्रकरणांत सांगितला. तारापुरास आल्यावर सखाराम व पांडोबा ह्या दोघांनीं मिळून श्रीशंकरावर एक अतिरुद्र केला.

आतां राहिलेलें आयुष्य गुर्वाज्ञेप्रमाणें ब्रह्माभ्यासांत घालवावयाचें, असा सखारामाचा यापूर्वींच निश्चय झालेला होता. तो त्यानें पांडोबांस व जगन्नाथशास्त्री यांस कळविला. व त्याकरितां नाशिकास जाण्याविषयीं त्यानें त्यांजवळ आज्ञा मागितली. परंतु नाशिकास राहिल्यानें लांब फार पडेल, याकरितां जवळच कोठें तरी रहावें, असें उभयतांचें मत पडलें. यास्तव सखारामानें नाशिकास जाण्याचा बेत रहित केला. व जवळच कोठें तरी सोयीकर ठिकाण पाहावें, ह्मणून बंधु व पुराणिकबावा यांची आज्ञा घेऊन एके दिवशीं तो तारापुराहून निघाला.

---

* आटोपुनि इंद्रियगण सर्वांठायीं सदैव समबुद्धि ॥
मातेंचि पावतीते सर्वा भूतांचिया हितीं निरत ॥

मोरोपंत—भगवद्गीता १२–४.

येथपर्यंत आमच्या चरित्रनायकांचे पूर्वस्थितीचा इतिहास झाला. त्यांचा अध्ययनक्रम समाप्त झाला असल्यामुळें, आतां त्यांची विद्यार्थिदशा संपली होती. व आप्तमाणसांपासून ते आतां लवकरच दूर होणार असल्यामुळें, त्यांस एकवचनी संबोधन करणारेंही कोणी नव्हतें. त्याचप्रमाणें ह्यांची एकंदर वृत्ति, साधुमार्गाची असल्यामुळें, येथून पुढें लोक त्यांस **बोवाच** ह्मणूं लागले होते ! तेव्हां, आपणही आतां त्यांस एकवचनी न लिहितां, बहुवचनीच लिहावें हें योग्य होय.

आमचे चरित्रनायक **सखारामबोवा** ब्रह्माभ्यासास योग्य असें स्थळ पाहाण्याकरितां तारापुराहून निघाले, ते फिरत फिरत प्रथम [1]शहापुरास आले. तेथें जवळ गंगा असल्यामुळें, तें स्थळ त्यांस प्रथम बरेंसें वाटलें. पण गांवांत ब्राह्मणवसति थोडी असल्यामुळें फार गैरसोय होती. ह्मणून तेथून माहुलीस गेले. ( हिला किल्ले माहुली ह्मणतात. ता० शहापूर, जि० ठाणें. ) पण तेथें मोकळ्या पाण्याची सोय नाहीं. ह्मणून पुन्हा परत कल्याणास आले. तेथें सुमारें आठदहा दिवस एका [2]घरीं राहिले होते. ह्या आठ दहा दिवसांत स्नान वगैरे करण्यास व भिक्षेकरितां

---

१ त्यावेळीं शहापूर हें अगदीं खेडें असून माहुली हें तालुक्याचें ठिकाण असे. पण सांप्रत ही स्थिति पालटून माहुली हें अगदीं खेडें झालें आहे, व शहापूर हें तालुक्याचें ठिकाण होऊन भरभराटीस आलें आहे.

२ हें घर बहुधा पिंपळखरे किंवा बोरगांवकर यांचें असावें. बरोबर माहिती मिळाली नाहीं.

मात्र बाहेर पडत. बाकी सर्व दिवस आणि रात्र खोलीस आंतून कडी घालून ब्रह्माभ्यासांत निमग्न असत! हें घर आल्या गेल्यास अन्न मिळण्याचें प्रसिद्ध ठिकाण असल्यामुळें, येथें पाहुण्यांची नेहमीं गर्दी असे. एके दिवशीं तेथें एक अनगांवचा गृहस्थ आला. त्यानें **बोवांची** वृत्ति पाहून, व त्यांस चांगलासा गांव राहण्यास पाहिजे आहे असें ऐकून, **बोवांस** ह्मटलें, महाराज, आमचे गांवाजवळ येथून सुमारें पांच कोसांवर कवाड ह्मणून गांव आहे, तेथें आपल्या इच्छेप्रमाणें बहुतेक सर्व सोयी जमतील, असें मला वाटतें. आपली इच्छा असल्यास उद्यां मजबरोबर चलावें. **बोवांनीं** त्या गृहस्थाचें बोलणें ऐकून त्यांजवळ कवाडची सर्व माहिती विचारिली. तेव्हां गृहस्थानें जी माहिती सांगितली, ती ऐकून हें गांव आपल्यास राहण्यास बरें आहे, असें **बोवांस** वाटलें आणि ते दुसरेच दिवशीं त्या गृहस्थाबरोबर कवाडास गेले.

कवाड* हा गांव खरोखरच मोठा टुमदार आहे. गांवांत आणि सभोंवतीं झाडी दाट आहे. पूर्व बाजूस गांवाला लागूनच एक तलाव आहे. त्याचप्रमाणें दक्षिण बाजूस पोंव-

---

* कवाड हा गाव भिवंडीहून वाड्यास जाणारे सडकेचे बाजूला भिवंडीपासून चार मैलांवर आहे. पूर्वीपेक्षां हल्लीं येथील लोकवस्ती बरीच कमी झाली आहे.

ईची विहीर असून तिचे पलीकडे कांहीं अंतरावर *गळ-फांसा या नांवाचा एक लहानसा ओढा आहे. ह्या ओ-ढ्यास आठ महिने पाणी असतें. त्याचे पलीकडे कांहीं अंतरावर बोरपाड्याचा तलाव व त्याचेही पलीकडे का-मोडी या नांवाची नदी आहे, तिला बारा महिने पाणी विपुल असतें. ह्या नदीच्या दोहों तीरांवर करवंदीच्या वगैरे मोठमोठ्या जाळ्या आणि वृक्ष पुष्कळ आहेत. नदीच्या पलीकडे व गांवच्या पश्चिम व दक्षिण बाजूला लहान लहान डोंगर असून बसण्यासारखे मोठमोठे दगडही पुष्कळ आहेत. वर सांगितलेल्या दोहों तलावांत कमळें पुष्कळ असून पक्षीही पुष्कळ असतात. त्याचप्र-माणें पोंवईचे विहिरीवर एक अश्वत्थाचा मोठा वृक्ष आहे. ह्याप्रमाणें गांवाची नैसर्गिक रचना आहे.

महाराज **सखारामबोवा** जेव्हां प्रथम कवाडास गेले, त्यावेळीं तेथें ऋग्वेदी व आपस्तंब शाखेचे ब्राह्मणांचीं बरींच घरें असून विद्वान् वैदिक ब्राह्मणही बरेच होते. दोन अग्निहोत्री होते; कांहीं शास्त्री मंडळी होती; त्याचप्रमाणें दोन शंकराचीं व एक रामाचें अशीं तीन देवालयें होतीं. इतकें असून शूद्रादिकांची वस्तीही ह्मणण्यासारखी नव्हती.

---

* हा ओढा अगदीं लहान आहे. तरी पावसाळ्यांत गळाभर पा-ण्यांतून कोणाही उत्तम पोंहणारास तो उतरून परतीरास जाववत नाहीं! ह्मणून त्याला 'गळफांस' असें नांव पडलें आहे. हल्लीं ह्या ओढ्या-वरून सडक गेल्यामुळे त्यावर पूल झाला आहे.

सारांश, कवाडची स्वाभाविक रचना व त्यावेळची स्थिति हीं सर्व प्रकारें बोवांचे इच्छेप्रमाणें होतीं.

अनगांवचे गृहस्थाबरोबर, सखारामबोवा मिति वैशाख शुद्ध १ शके १७४६ ( सन १८२४ ) रोजीं दोन प्रहरीं अकरा वाजण्याचे सुमारास कवाडास आले. कवाडास दोन अग्निहोत्री त्यावेळीं होते, असें वर सांगितलेंच आहे. त्यांपैकीं गदाधरभट दाजी घांगुरडे यांजकडे त्या दिवशीं इष्टीचा मोठा समारंभ होता. अनगांवकर गृहस्थाचे सांगण्यांत, हे गृहस्थ मोठे सुशील आहेत, व त्यांचे घरीं बिऱ्हाडाचीही सोय होईल, असें आल्यावरून, बोवा कवाडास जे आले, ते प्रथम घांगुरड्यांचेच घरीं गेले. तेथें त्यावेळीं इष्टि चालू होती. बोवांनीं ओटीवर जाऊन "यजमान, उतरण्यास जागा मिळेल का?" ह्मणून मोठ्यानें हाक मारून विचारिलें! हाक ऐकतांच, कोण आहे ह्मणून पाहण्याकरितां, गदाधर भटजीच बाहेर आले.

"एकनूर अदमी और दसनूर कपडा" अशी एक ह्मण आहे, व तिचा अनुभव आपणास व्यवहारांत हरहमेश येत असतो. पोषाग, दागदागिने इत्यादिकांच्या बाह्य भपक्यावरच कित्येक हलक्या लोकांस मानमान्यता मिळून, खऱ्या थोर मनुष्यांस केवळ त्यांच्या साधेपणामुळेंच कोणी विचारीत सुद्धां नाहीं! तथापि, खऱ्या तेजस्वी हिऱ्याचें तेज नसें कोणत्याही स्थितींत लपावयाचें नाहीं, त्याचप्रमाणें खरे तेजस्वी पुरुष कोणत्याही स्थितींत असले तरी त्यांचें तेज लपत

नाहीं ! वास्तविक पाहिलें तर, सखारामबोवांचा पोषाग ह्या वेळीं अगदींच साधा व हलका होता. नेसूं एक पंचा, आं- गांत बंडी ( जुन्या तऱ्हेची—अंगरख्यासारखी ) व त्यावर दुहेरी अंगवस्त्र, डोक्याला एक धोतर गुंडाळलेलें, पायांत वाहणा, हातांत एक उंच काठी व खांद्यावर पडशी; ह्या पडशींतच सोंवळें भांडें व एक दोन पोथ्या वगैरे सामान. सारांश, ह्या पोषागावरून हा कोणी तरी राजापुऱ्या देशवर करण्यास निघाला आहे, असें वाटणें साहजिक होतें. तथापि ह्यांचें तेज असें कांहीं विलक्षण असे कीं, ह्यांजकडे पहातांच पाहणाऱ्याचे मनांत पूज्य बुद्धि उत्पन्न व्हावी ! गदाधरभ- टजींनीं बोवांस पहातांच, त्यांची तर अशी वृत्ति झाली कीं, हे साक्षात् अग्निनारायणच ब्राह्मणरूपानें आले असावे ! गदाधरभटजी बाहेर येतांच, बोवांनीं " उतरण्यास स्थळ मिळेल काय ? " ह्मणून पुन्हा प्रश्न केला. भटजी ह्मणाले, महाराज, घर आपलेंच आहे, येथें ओटीवर उतरून दोन प्रहरीं अग्निनारायणाचा प्रसाद घ्यावा ! इतकें बोलून भट- जींनीं त्यांस पाय धुण्यास पाणी आणून दिलें, व नंतर ते आपल्या उद्योगास लागले. इकडे बोवांनींही हातपाय धुतले व ओटीवर बिऱ्हाड लावून ते स्वस्थ बसले.

त्या दिवशीं घांगुरड्यांकडे गांवांतील बहुतेक मंडळी भो- जनास आलेली होती. भोजनोत्तर ग्रामस्थ मंडळीनें बोवां- जवळ नांव, गांव, कोठून आलां, कोठें जावयाचें, वगैरे बरीच चौकशी केली. बोवांनीं सरळ मार्गानें थोडक्यांत सर्व हकी-

कत सांगून आपण येथेंच राहण्यास[1] आलों आहों, व कोठें तरी बिऱ्हाडास जागा पाहिजे आहे, नच मिळेल तर देवालय आहेच, तेथें राहूं, असें सांगितलें. त्यांची एकंदर हकीकत ऐकून घेऊन गदाधर भटजी ह्मणाले, महाराज, आपली जर स्नानसंध्या करून येथेंच सुखवस्तु राहण्याची इच्छा आहे, व आपण पहिल्यानें आमचेच घरीं आलां आहां, तर माझें एवढेंच सांगणें आहे कीं, आमचे येथें खुशाल राहावें, दुसरीकडे बिऱ्हाड पाहण्याची किंवा देवाळयांत राहण्याची जरूर नाहीं. तेव्हां **बोवांनीं** त्यांचे ह्मणण्यास रुकार देऊन त्यांचे येथेंच राहण्याचें ठरविलें.

'गांव आहे तेथें ह्मारवडा असावयाचाच !' **बोवा** कवाडास आले तेव्हां त्यांचें भरज्वानीचें वय होतें, आणि अशा ऐन तारुण्यांत हे **बोवा** बनले—बनले कसले ! मुळचेच होते—असल्यामुळें चार चहाटळ आणि गांवकुटाळ लोकांचे मनांत, 'चोराचे मनांत चांदणें' किंवा 'जारास जशा सर्वच स्त्रिया जारिणी दिसतात' तद्वत् अनेक कुकल्पना येऊं लागल्या ! 'येन केन प्रकारेण' आपले इच्छेप्रमाणेंच कांहीं तरी **बोवांचे** वर्तनांत घोंटाळा सांपडेल, अशी ह्या मंडळीस भरभक्कम आशा होती, आणि ह्मणूनच ते रात्रंदिवस डोळ्यांत तेल घालून **बोवांचें** वर्तन बारकाईनें तपाशीत होते ! पण भर तारुण्याचें वय असतांही वैराग्यावर कडकडीत

---

१ **बोवांची** वास्तविक योग्यता काय आहे, हें तेव्हां समजण्यास मार्गच नव्हता.

निष्ठा, प्रौढता, विनय, सुशीलता, सौजन्य, पराकाष्ठेची शांतवृत्ति व अपूर्व तेज इत्यादि अनेक गुणांनीं त्यांच्या दुष्ट वृत्ति जागच्याजागींच विरून गेल्या ! व **बोवांचे** अत्यंत निर्मळ आणि परमपवित्र वर्तनाबद्दल त्यांची पूर्ण खात्री होऊन त्यांस फार पश्चात्ताप झाला ! !

कवाडास आल्यावर **बोवांनीं** एक दोन दिवस गांवासभोंवतीं हिंडून तलाव, नदी, विहीर, ओढा, डोंगर वगैरे पाहण्यांत घालविले. त्यानंतर त्यांनीं आपला नित्यक्रम सुरू केला. **सखारामबोवा** मोठ्या पहांटेस उठून पोंवईच्या विहिरीवर जात. तेथें शौचविधि, मुखमार्जनादिक आटोपून प्रातःस्मरण करीत करीत सोनटक्याच्या तलावावर ( पूर्वआंगच्या ) किंवा नदीवर स्नानास जात. तेथें स्नानसंध्याब्रह्मयज्ञादिक नित्यान्हिक आटोपून नदीतीरानें बोरपाड्याच्या तलावाकडे ( दक्षिणआंगच्या ) येतेवेळीं, वाटेंत कोठेंतरी निवांत स्थळीं 'योगाभ्यास' करीत बसत. नंतर सुमारें बारा वाजण्याचे सुमारास गळफांशाचे ओहोळावरून, पोंवईचे विहिरीवरून गांवांत येत. मग **आगाशे, पेठे, कर्वे, जोशी, उकिडवे** व **साठे** अशा पांच घरीं मधुकरी घेऊन बिन्हाडीं येत. भोजन झाल्यावर थोडीशी विश्रांति घेऊन पुन्हा सुमारें तीन वाजतां पश्चिम बाजूचें डोंगरावर रानांत एकांतीं जाऊन योगाभ्यास करीत, व सायंकाळीं पोंवईचे विहिरीवर येऊन तेथें संध्यावंदन करीत. नंतर काळोख पडण्याचे सुमारास बिन्हाडीं येऊन सप्रेम चित्तानें बरीच रात्र होईपर्यंत भजन करीत. या

प्रमाणें यांचा बरींच वर्षेपर्यंत अव्याहत नित्यक्रम सुरू होता. पुढें कांहीं थोडासा फरक झाला होता, तो सांगण्यांत येईलच.

बोवा आपल्या वयाच्या तेविसाव्या वर्षी कवाडास आले. ते शेवटपर्यंत ह्मणजे त्रेचाळीस वर्षे तेथेंच होते. त्यांपैकीं पहिलीं बारा वर्षे बहुतेक वर सांगितल्याप्रमाणेंच क्रम असे. त्यानंतर तरी विशेष फरक ह्मणण्यासारखा झाला नाहींच. मात्र पुढें पुढें मधुकरीस जात नसत; कांहीं नियमित घरची एकेका दिवशीं मधुकरी ( भिक्षा ) येत असे. आणि हा तरी फरक आमवातानें प्रकृति फार बिघडली होती, तेव्हांपासून लोकांचे विशेष आग्रहामुळें झाला होता. तसेंच योगाभ्यास पूर्ण झाल्यावर स्नान वगैरे घरींच होत असे, व स्नान झाल्यावर बिऱ्हाडाच्या ( ओटीवरच्या ) खोलींतच सुमारें तासभर समाधि लावून बसत असत ! याहून विशेष स्नानसंध्या कांहींच नव्हती ह्मटली तरी चालेल. बोवा कवाडास प्रथम आले, तेव्हां वैशाख महिना असून अतिशय उन्हाळा असल्यामुळें, पाऊस पडण्यापूर्वी सुमारें महिनाभर गांवांत कोरडी भिक्षा मागून घांगुरड्यांचे घरींच जेवीत असत. पण तें पंक्तीबरोबर नव्हे हो! तर जेव्हां यांचा योगाभ्यास आटोपून हे येतील तेव्हां ! आणि तें जेवण काय ? तर नुसता भात, मीठ आणि आंब्याच्या चिटक्या ( येतेवेळीं आणिलेल्या ) ! भाजी किंवा कालवण बिलकुल घ्यावयाचें नाहीं ! हा क्रम फक्त एकच महिना होता.

कवाडास आल्यावर थोड्याच दिवसांनीं बोवांनीं गीता-

भाष्य, उपदेशसाहस्री, अध्यात्मरामायण इत्यादि अध्यात्मविषयक ग्रंथ वाचण्याचा क्रम सुरू केला. तो पुढें पुष्कळ दिवस चालू होता. बहुतकरून दोन प्रहरीं भोजन झाल्यावर हें वाचन चालत असे. काव्यव्युत्पत्ति वगैरे शिकण्याकरितां विद्यार्थी येत त्यांस शिकविण्याची वेळ हीच होय.

बोवा कवाडास आल्यावर कांहीं वर्षे धोतरें वगैरे वापरीत असत. वस्त्रांची सोय कांहीं तारापुराहून होत असे, व कांहीं बोवा स्वतांच करीत. ते कवाडास आले तेव्हां त्यांजवळ दोन तोळ्यांचें सोन्याचें जोडवें होतें. तें संपल्यानंतर बोवांनीं धोतरें नेसावयाचीं सोडून देऊन कौपिनकरवस्त्रादिकांचा स्वीकार केला!

एकदां बोवांची हिंवतापानें प्रकृति बिघडली. तेव्हां कोणी औषध आणून देत; परंतु बोवा तें मुळींच घेत नसत! त्यांचें औषध ह्मणजे हिंव भरूं लागलें असतां गळाभर पाण्यांत जाऊन थंडी बंद होईपर्यंत उभें राहणें हें असे! या औषधानें त्यांस थोडक्याच दिवसांनीं गुण येऊन त्यांची प्रकृति चांगली सुधारली! पुढेंही आणखी दोन तीन वेळां बोवांस हिंवताप येत होता. एक वेळ तर एकसारखा अडीच वर्षेपर्यंत चातुर्थिकज्वर येत असे. पण वर सांगितलेल्या उपायाशिवाय त्यांनीं कोणताही औषधोपाय केला नाहीं! एकदां पिहा ( कवलु ) फारच वाढली होती. त्यावेळीं बोवा ती बरी होईपर्यंत सतत कांहीं दिवस कडकडीत उपोषणेंच करून राहत असत! एकदां आमांशाचा फार विकार होऊन

ठाणे.

रक्त पडूं लागलें, ह्मणून बोवा पंधरा दिवस फक्त पाणी पि-
ऊन राहिले ! झालें, आमांश पार नाहींसा झाला ! ह्याप्र-
माणें बोवांचा नेहमींचा क्रम असे. कोणत्याही रोगावर औ-
षध ह्मणून घ्यावयाचें नाहीं ! हा तर त्यांचा पूर्ण निश्चयच
होता ! ! ते ह्मणत, रोगाला आपण काय ह्मणून भ्यावें ?
रोगानें आपणास भ्यालें पाहिजे ! ! !

बोवा सतत बारा वर्षें ( एक तप ) पर्यंत योगाभ्यास
करून पूर्ण योगीच बनले होते ! मग त्यांचा मनोनिग्रह
असाधारण असल्यास त्यांत नवल तें काय ? त्यांची इंद्रि-
यदमन करण्याची रीतिसुद्धां मोठी विलक्षण व आश्चर्यका-
रक होती. तिचे कांहीं प्रकार वर सांगितलेच आहेत. को-
णत्या गोष्टीपासून किती पीडा होते ह्याचा अनुभव घ्यावा,
व ती पीडा सहन करण्याची अशी संवय व्हावी कीं, ति-
जपासून बिलकुल त्रास होऊं नये, ह्मणून ते प्रत्येक गोष्टीची
अगदीं कमाल करून सोडीत ! ह्मणजे ऐन थंडीच्या कडा-
क्यांत पाण्यांत जाऊन बसावें; पाऊस धुम्माधार पडत असला कीं,
पावसांतच प्रहर प्रहर बसावें; ऐन उन्हाळ्यांत भर दोन प्रहरीं
तापलेल्या खडकावरच जाऊन बसावें; कित्येक दिवस एक-
सारखीं उपोषणेंच करावीं; जाग्रणें तर जाग्रणेंच महिना
महिना दोन दोन महिने करावीं; केव्हां केव्हां रात्रंदिवस
सांपडेल तितका वेळ निद्रेंतच घालवावा; सारांश, सर्व पीडा-
दायक स्थितींचा अनुभव घेऊन त्यांची इतकी संवय करून
ठेविली होती कीं, ती पीडा कितीही दुर्धर असली, तरी

तेणेंकरून वृत्तींत चलबिचल बिलकुल होऊं नये. अशा रीतीनें **बोवांनीं** आपल्या सर्व इंद्रियांचें दमन करून मन पूर्ण स्वाधीन ठेविलें होतें.

**बोवांचा** योगाभ्यास इतका पूर्ण दशेस आलेला होता कीं, तास दोन दोन तास पर्यंत ते एकांतीं अखंडसमाधि लावून बसत! प्रथम नदीच्या कांठीं जेथें उदकाचा एकसारखा शब्द चालतो तेथें, अगर रात्रीच्या शब्दावर, अगर डोंगरांत पक्ष्यांचे शब्दनादावर, धारणा केली असतां सहज समाधि लागे! पुढें अंतरंग शब्दही सहज अखंड श्रवणांत येऊं लागून समाधीचा अभ्यास पूर्णतेस पावला! **बोवा** नित्य प्रेमळ भावानें भजन करीत असत, असें मागें सांगितलेंच आहे. त्यांनीं स्वतांच कांहीं भजनी पदें, बलरामस्तोत्र, वज्रेश्वरी वर्णन, वज्रेश्वरीची आरती, कवितासारसंग्रह इत्यादि कांहीं कविता केल्या आहेत. त्या फार सुरस असून भक्तिरसानें केवळ ओतप्रोत भरलेल्याच आहेत अशा वाटतात! ह्या कविता पाहण्याची वाचकांस जिज्ञासा होणें साहजिक आहे. पण ती पूर्ण करण्याची आज आह्मांस सवड नसल्यामुळें दिग्दर्शनार्थ खालीं एकच पद दिलें आहे.

## पद.

**आनंदरस मी प्याला ॥ भवताप शांतचि झाला ॥धृ०॥**
**अनंत कोटी कल्मषपाश ॥ पावे एका समयीं नाश ॥**
**दृढ धरितां सद्गुरूची कांस ॥ निजगुज सांगुनि गेला ॥१॥**

आतां मजही कैचें ध्यान ॥ विसरूनि गेलें समुळीं भान ॥
श्रवण कराया नाहीं मज कान ॥ संकल्पाची नीमाला॥२॥
मेली यद्यपि मोह माय ॥ केला ज्यानें दृढव्यवसाय ॥
रामसखा तो शोकेल काय ॥ चिन्मय होउनि ठेला ॥३॥

ही कविता किती सहजरीत्या व आनंदभरांत झाली आहे, हें मार्मिक वाचकांच्या सहज लक्षांत येईल. असो.

बोवा कवाडास आल्यावर थोड्याच काळांत त्यांची चोहोंकडे प्रसिद्धि झाली. दूरदूरच्या शेंकडो लोकांस बोवांचे दर्शनास जाण्याविषयीं दृष्टांत होऊं लागले! यामुळें कवाडास महाराजांचें दर्शन घेण्याचे इच्छेनें येणाऱ्यांची नेहमीं गर्दी होऊं लागली. एकादशी, गुरुवार, पौर्णिमा इत्यादि तिथिपर्वणीस दर्शनास येणाऱ्या लोकांची मोठी थोरली यात्राच जमत असे! पुढें पुढें तर बाराही महिने लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊं लागल्या! आठवड्यांतून कमींत कमी दोन तीन तरी मंत्रजागरणें दर्शनेच्छु भाविक लोकांकडून होत असत. यामुळें भिक्षुक मंडळीस बरीच प्राप्ति होत असे. शाळेंतील मुलांचा खाऊशिवाय एकही दिवस जात नसे! कोणी मोठा मनुष्य दर्शनास आला, कीं तो मेवामिठाई घेऊन येतच असे, ती सर्व बोवा लहान मुलांस वाटून टाकीत. दर्शनास येणाऱ्या भाविक मंडळींत कित्येक मोठमोठे श्रीमंत, संस्थानिक, जहागिरदारही असत. यामुळें धोतरजोडे, शालजोड्या, वगैरे उंची उंची वस्त्रें, सुंदर सुंदर तांब्यापितळेचीं भांडीं व दुसरे अनेक पदार्थ येत असत. मेवामिठाई,

फळफळावळ, खारका, बदाम, पिस्ते, बेदाणा ह्यांच्या राशींच्या राशी पडत. त्याचप्रमाणें दररोज खुर्द्याचा ढीग पडत असे! हे सर्व पदार्थ व पैसा गरीव, अनाथ, व्यंग अशा लोकांस **बोवा** वाटून टाकीत !

**बोवांची** भूतदयाही अपूर्व असे! त्यांचेजवळ पांखरें, मांजरें, कुत्रीं, गाई हीं बरींच जमलीं होतीं. ह्या सर्वांचें खाणेंपिणें, व धुणें वगैरे सर्व कांहीं **बोवा** स्वतांच करीत असत. **बोवांची** एक **पंढरी** या नांवाची गाय होती. तिचा वर्ण अगदीं शुभ्र होता. हिचा पुढें बराच वंश वाढला होता, पण चमत्कार असा होता कीं, तीं सर्व कालवडें त्या गाईप्रमाणेंच अगदीं शुभ्रवर्णी होतीं! ही पंढरी गाय व तिचा सर्व वाढा **बोवांचे** हयातीपर्यंत होता. ज्यादिवशीं **बोवाचे** समाधिस्त झाले,त्या दिवशीं ही पंढरी गाय व तिचीं तीं तान्हींपाडशीं गोजिरवाणीं कालवडें सर्व दिवसभर **बोवांचे** समाधिस्थानाभोंवतीं भोंवतीं हिंडत होतीं व एकसारखीं हंबरडे फोडीत होतीं!आणि त्या सर्वांचे नेत्रांवाटे एकसारख्या अश्रुधारा चालल्या होत्या! अहाहा! मुक्या जनावरांचे ठायीं सुद्धां आपल्यावर उपकृति करणाराविषयींचें अनुपम प्रेम पाहून, कोणाही सहृदय मनुष्यास विलक्षण आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाहीं! अशा तऱ्हेचें मुक्या जनावराचेठायीं सुद्धां ज्याच्याविषयीं प्रेम उत्पन्न झालें होतें, त्याची भूतदया किती वर्णन करावी? त्या जनावरांनीं त्या दिवशीं गवताचे काडीसही स्पर्श केला नाहीं! सर्व दिवस आणि

रात्र त्या समाधिस्थानापाशीं भोंवतीं भोंवतीं फिरण्यांत व हंबरण्यांत त्यांनीं घालविली ! !

पोंवईचे विहिरीवर **बोवा** सकाळ संध्याकाळ जात असत, व संध्याकाळीं ह्याच विहिरीवर ते संध्या करीत असत, वगैरे मजकूर मागें आलाच आहे. ह्या विहिरीवर **बोवांनीं** एक लहानशी आंब्यांची सुंदर बाग केली आहे. ह्या आंब्यांचे झाडांस **बोवा** नित्य सायंकाळीं पाणी घालीत असत. ही विहीर भिवडीहून वाड्यास जाणाऱ्या सडकेच्या अगदीं बाजूला आल्यामुळें ह्या बागेच्या शीतळ छायेपासून पांथस्थांस फार सुख होतें ! व त्या झाडांकडे पाहून ह्या **सत्पुरुषाची** लागलीच आठवण होते ! ! ह्याच विहिरीवर अश्वत्थाचा एक जुनाट वृक्ष होता, परंतु तो वाळून गेला, म्हणून **बोवांनीं** जुन्या बुडख्याजवळच दुसरा अश्वत्थाचा वृक्ष लाविला आहे. हाही वृक्ष हल्लीं बराच मोठा झालेला आहे. कवाड गांवांतही **बोवांनीं** दोन बकुळीचे वृक्ष लाविले आहेत. एक राममंदिराजवळ व एक शिवालयाजवळ. हे वृक्ष हल्लीं बरेच मोठे झाले असून आपले नैसर्गिक सौंदर्यानें व कुसुमप्रसारानें कवाड गांवास भूषणभूत व प्रिय झाले आहेत.

**बोवा** कवाडास आल्यावर एक दोन महिने झाले नाहींत, तोंच त्यांजकडे काव्यव्युत्पत्ति वगैरे शिकण्याकरितां गांवचे व कांहीं परगांवचेही विद्यार्थी येऊं लागले. मग मग तर बरीच गर्दी जमली होती. ही सर्व मंडळी चांगली विद्वान् झाली.

ह्यांपैकीं कित्येक शिष्यमंडळी आजमितीस हयात आहे. ह्या शिष्य मंडळीची नांवानिशी दिल्यास फारच विस्तार होईल, ह्यास्तव तसें न करितां कांहीं नांवें मात्र येथें दिलीं आहेत. दुसरें असें कीं, सर्व शिष्यमंडळीचीं नांवें समजणें ही गोष्ट बरीच कठीण असल्यामुळें तीं मिळविण्याचा आह्मी प्रयत्नही केला नाहीं. **मोरोबा जोशी, मोरोबा गोसावी, बापुशास्त्री बेहेरे, पिलुशास्त्री पटवर्धन, महादेव तात्या कुंटे, विष्णु भटजी घांगुरडे, लक्ष्मणशास्त्री पाटणकर, परशरामजोशी गोंधळेकर, रावजीशास्त्री भट** वैगेर सुमारें चाळीस पन्नास मंडळी **बोवां**जवळ अध्ययन करून विद्वान् झाली. ह्यांपैकीं बहुतेक मंडळी सांप्रत हयात आहे. ह्याखेरीज पारमार्थिक ज्ञान संपादनार्थ मंडळी येत असे ती निराळीच. त्यांपैकीं प्रसिद्ध मंडळीची हकीकत पुढच्या प्रकरणांत थोडीशी दिली आहे.

शेंकडो भाविक लोक नित्यशः **बोवांचे** दर्शनास येत, त्यांस **बोवा** एक राखाडीची चिमटी प्रसाद ( आंगारा ) ह्मणून देत असत ! पण ह्या राखाडीचे चिमटीचा प्रभाव अपूर्व असे ! मोठमोठ्या वैद्यांनीं व डाक्टरांनीं असाध्य ह्मणून सोडलेले रोगी नुसत्या एका चिमटीनें बरे झाल्याबद्दल शेंकडो लोकांस अनुभव आहे ! ! हिंवताप येणाऱ्या लोकांस **बोवा** एक काळा दोरा आणावयास सांगत, व आपल्याजवळच्या आंगाऱ्याची एक चिमटी कागदांत घालून, ती पुडी त्या दोऱ्यास बांधीत, आणि तो दोरा त्यांच्या हातास बांधीत.

तो दोरा हातास बांधिला कीं, हिंवताप निश्चयानें गेलाच ह्मणून समजावा ! काय हें अद्भुत सामर्थ्य ! कशाचें ? तर योगबळ आणि खरें सदाचरण ह्यांचें ! धन्य धन्य ते सत्पुरुष महाराज सखारामबोवा ! अशा सत्पुरुषांचें दर्शन होण्यासही महत्पुण्य पदरीं असलें पाहिजे, यांत संशय नाहीं.

**सखारामबोवा** कवाडास आल्यापासून त्यांचा नित्यक्रम कसा असे वगैरे बहुतेक हकीकत येथपर्यंत सांगितलीच आहे. आतां, **बोवा** ज्यांचे घरीं होते, त्या गदाधर भटजींचे कुटुंबाविषयीं हकीकत सांगून हें प्रकरण आटोपतें घेऊं.

गदाधर भटजींस दोन मुलगे होते; व त्यांचें कुटुंब आंधळें होतें. गदाधर भटजी शेवटल्या दुखण्यांत अजारी असतां, एके दिवशीं त्यांची प्रकृति फारच अस्वस्थ झाली, तेव्हां त्यांनीं आपल्या पत्नीस व दोन्ही मुलांस जवळ बोलाविलें, आणि त्यांस **बोवांचे** आज्ञेप्रमाणें वागा, असें सांगितलें. त्याचप्रमाणें ते **बोवांस** ह्मणाले, महाराज, ह्या त्रिवर्गांस आपल्या पदरांत घातलें आहे ! आतां ह्यांचें संरक्षण करणें आपलेकडे आहे. **बोवा** ह्मणाले, माझे अनुषंगानें चालतील तर—त्यांचें त्यांत कल्याणच आहे ! पुढें त्याच दुखण्यांत गदाधरभटजींचा अंत झाला ! **बोवांनीं** त्यांच्या एकंदर कुटुंबास कांहीं कमी पडूं दिलें नाहीं. त्यांचा वडील मुलगा आत्माराम ह्याचें पुढें कांहीं दिवसांनीं कुटुंब वारलें. त्यास एक मुलगी झाली होती. ही अनगांवास लेल्यांकडे दिलेली आहे. आत्मारामाचें कुटुंब वारल्यानंतर त्याचें दुसरें

लग्न करावयाचें, परंतु इतक्यांत त्याचे डोळे गेल्यामुळें त्यानें दुसरें लग्न करण्याचें नाकारिलें. (हे हल्लीं हयात आहेत.) दुसरा मुलगा विष्णु हा **बोवांजवळच** अध्ययन करीत होता. त्याचें **बोवांनीं** लग्न जमविलें होतें, परंतु तो ह्मणे मला लग्न करावयाचें नाहीं! मी आपली सेवाचाकरी करून राहणार! विष्णूचें परमार्थाकडे विशेष लक्ष्य आहे, हें **बोवांस** माहीत असल्यामुळें, त्यांनींही त्यास लग्नाचा विशेष आग्रह केला नाहीं. विष्णुभट वांगुरडे हे शेवटपर्यंत **बोवांची** एकनिष्ठपणें सेवाचाकरी करून होते. **बोवांचाही** विष्णुभटजींवर अत्यंत लोभ असे. कोणतेंही कृत्य करणें झाल्यास विष्णुभटजींवांचून पानही हालावयाचें नाहीं असें असे. जसे समर्थ **रामदास स्वामींचें** प्रियशिष्य **कल्याण**, तसे **सखारामबोवांचे** हे *****विष्णुभटजी**! कांहीं वर्षांपूर्वीं हे संन्यास घेऊन समाधिस्थ झाले. **बोवांचे** समाधिमंदिराचे सभामंडपाचे उजवे कोंपऱ्यावर ह्यांची समाधि बांधिली आहे.

---

* अभाग्याचे हातीं सहजगत्या हिरा लागला असतांही, तो ती गारगोटी समजून कशी फेंकून देतो, ह्याचा प्रत्यक्ष अनुभव हें चरित्र वाचल्यानें सहज येईल. कवाडकरांनीं **बोवांपासून** काय मिळविलें? काव्यव्युत्पातिज्ञान, (कांहींकांना तेंही पूर्ण मिळवितां आलें नाहीं, ते फक्त अधोलीभर तांदुळांचेच मालक बनले आहेत!) जागरणाची दक्षिणा, पेढे, बर्फी व जेवणावळी!! परमार्थाचे अधिकारी कायते दोघे, एक विष्णुभट व दुसरे गणोबा गोसावी. पारमार्थिक लाभ संपादणारी बाकीची सर्व मंडळी परस्थ आहेत!!! ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

# प्रकरण पांचवें.

साधूनां दर्शनं पुण्यं तीर्थभूता हि साधवः ।
कालेन फलते तीर्थं सद्यः साधुसमागमः ॥

सुभाषित.

कवाडास आल्यापासून बोवा अखेरपर्यंत तेथेंच राहून असत, असें मागें एक दोन वेळां सांगितलेंच आहे. आणि ह्यावरूनच त्यांस **कवाडवासी, कवाडकर** असें नांव पडलें आहे. काय चमत्कार आहे पहा ! कोठें **करंबोवणें** आणि कोठें **कवाड ! बोवांच्या** लहानपणीं पुढील गोष्टींविषयीं कोणास अनुमान तरी झालें असेल काय ? हेंच कशाला ? आपल्याला नेहमीं व्यवहारांत असाच अनुभव येत आहे. संसाररथाचीं चक्रें जीं स्त्री आणि पुरुष हीं वैवाहिकसंबंधापूर्वीं परस्परांपासून शेंकडो कोसांवर जरी असलीं, तरी अगदीं थोडक्या काळांत आणि साहजिक योगायोग जमून तीं विवाहरूपी आंसानें परस्पर निगडित होतात ! आणि तीं इतकीं कीं एकाचें सुखदुःख सर्वस्वी दुसऱ्यावर अवलंबून असतें ! पण ह्याबद्दल पूर्वीं कांहीं अनुमान बांधितां येण्याजोगें असतें काय? नाहीं. सारांश, " **डोंगरचे, आंवळे आणि समुद्राचें मीठ** " हाच न्याय सर्वत्र लागू आहे.

ह्या प्रकरणांत विशेषेंकरून **बोवांनीं** कवाडास आल्यानंतर मधून मधून जो थोडासा साधुदर्शनें व तीर्थयात्रांनिमित्त प्रवास केला, त्याचें वर्णन करावयाचें आहे. हें वाक्य

वाचतांच, आतां आपल्याला अनेक स्थलवर्णनें वगैरे वाचावयास मिळतील, असें जिज्ञासु आणि रसिक वाचकांस वाटून, त्यांस मोठा आनंद होईल. परंतु वाचकांना विनाकारण आशा लावून ठेवण्यापेक्षां " तसें येथें कांहीं नाहीं ! " असें अगोदरच स्पष्ट सांगावें हें बरें. तथापि, अशा नीरस वर्णनांतही त्यांस वाचनीय भाग मुळींच आढळणार नाहीं, असें नाहीं. किंबहुना अनेक सत्पुरुषांच्या समागमानें त्यांचें मन येथें तर विशेष प्रसन्न होईल ! आतां ह्याचा अनुभव वाचकांस कसा काय येईल तो खरा.

**बोवा** कवाडास आल्यावर थोड्याच दिवसांनीं, त्यांस **ब्रह्मानंद महाराज *आगाशीं** जवळ **×वैतरणा**तीरीं आल्याचें समजलें. हे महाराज बद्रिकाश्रमीं राहत असून योग, वेदांत, धर्म इत्यादिकांत पारंगत होते. ह्या सत्पुरुषाचें दर्शन घ्यावें, ह्मणून **बोवा** तिकडे गेले. त्यांचा आणि

---

* अगाशी ता० वसई जि० ठाणें. येथें सुकेळीं फार उत्तम होतात. हा पदार्थ दुसरे कोठेंही होत नाहीं !

× ठाणें जिल्ह्यांत ही एक नदी आहे. हिचें पात्र टिकठिकाणीं बरेंच खोल आहे. शिवाय ह्या नदीच्या दोहोंबाजूंस किर्र झाडीनें व्याप्त असे मोठाले कडे आहेत व सभोंवतीं फार दाट जंगल आहे. ह्यामुळें ह्या नदीस अपूर्व असें नैसर्गिक सृष्टिसौंदर्य आलेलें आहे. तथापि एकंदर देखावा फार भयप्रद असून चोरटे लोकांचें व हिंस्र पशूंचें अनेक सोईमुळें हें एक वसतिस्थानच असल्यामुळें ही नदी फार भयंकर झाली आहे. वैतरणासिंधुसंगमावर **नागानंद** नांवाचा शककर्ता राजा व्हावयाचा आहे, असें सांगतात.

बोवांचा पांच दिवस सहवास झाला. तितक्या कालांत बोवांची आत्मनिष्ठेविषयीं योग्यता पाहून ब्रह्मानंदमहाराजांस फार आनंद झाला, व बोवांवर त्यांचा फार लोभ जडला. बोवांस गीताभाष्यांत वगैरे कांहीं शंका आलेल्या होत्या, त्या त्यांनीं ब्रह्मानंदमहाराजांस विचारिल्या, व त्यांचीं योग्य उत्तरें देऊन महाराजांनीं त्यांचें समाधान केलें. नंतर एकेदिवशीं वेदांतविषयक संभाषण चाललें असतां, बोवांनीं महाराजांस प्रश्न केला, महाराज, आपल्यासारखे आत्मनिष्ठ पुरुष फारच क्वचित् आढळतात; तथापि, आपले स्वतःविषयीं आपली कोठपर्यंत खात्री आहे? हें कृपाकरून सांगाल, तर ऐकण्याची फारच इच्छा आहे. हा प्रश्न ऐकून ब्रह्मानंदमहाराजांस फार आनंद झाला, व त्यांचे डोळ्यांतून आनंदाश्रुधारा वाहूं लागल्या! ते ह्मणाले, आजपर्यंत मला कोणीही असा प्रश्न केला नाहीं. तथापि, तुह्मी आतां विचारिलेंतच ह्मणून सांगतों. नंतर महाराजांनीं आपले स्वतःविषयींचा अनुभव सिद्धांतद्वारा बोवांस सांगितला. तो ऐकून बोवांस परमानंद झाला! नंतर ब्रह्मानंद महाराजांची आज्ञा घेऊन बोवा कवाडास आले व महाराजही स्वस्थळीं गेले.

पुढें कांहीं दिवसांनीं बोवा गंगास्नानाकरितां नाशिकास गेले. ते आठ दिवस तेथें होते. एकेदिवशीं स्नानसंध्या आटोपून गंगाघाटावर बसले असतां, त्यांची व त्यांचे गुरुबंधु निरंजन बोवा ह्यांची भेट झाली. परस्पर कुशल प्रश्न

वगैरे झाल्यावर, वेदांतविषयक संभाषण सुरू झालें. तेव्हां बोलतां बोलतां **निरंजनबोवा** ह्मणाले, तुह्मांस भूमास्वरूपाचा अनुभव नाहीं, यास्तव मुक्ति दुर्लभ ! **बोवा** ह्मणाले, भूमास्वरूप आणि ब्रह्म यांत कांहीं भेद आहे कीं काय ? भेद असल्यास तो आह्मांस ज्ञात नाहीं. यास्तव तो भेद काय आहे, हें आपण समजावून सांगावें. तेव्हां **निरंजनबोवा** ह्मणाले, उद्यां प्रातःकाळीं आपण आमचे बिऱ्हाडीं यावें, ह्मणजे ह्याबद्दल विचार करूं. दुसरे दिवशीं **निरंजनबोवांनीं** छांदोग्योपनिषदांत सांगितल्याप्रमाणें भाष्यरीतीनें भूमास्वरूपाविषयीं विवेचन केलें. तथापि, तें ऐकून **बोवा** ह्मणाले, भूमास्वरूप आणि ब्रह्म यांत कांहीं वास्तव भेद आहे असें वाटत नाहीं. तेव्हां हा समजुतींत प्रक्रियाभेद असावा !. असो. नंतर **बोवा** ×**अच्युतरावजी मोडक** व ×**गोपाळभटजी** ह्यांची भेट घेऊन कवाडास आले.

पुढें शके १७५० (सन १८२८) यावर्षी **पांडोबा**, भाऊपटवर्धन, मोरोबा गोसावी इत्यादि मंडळीचा विचार घेऊन, **बोवा** त्रिस्थळी यात्रा करण्यास गेले. वाटेनें पुणें, गणपतीचें रांजणगांव, पैठण, उमरावती, नागपूर, रामटेक, जबलपूर इत्यादि ठिकाणें पाहत पाहत काशीस गेले. नंतर प्रयाग व गया येथें जाऊन अक्षय्यवट आणि बिंदुमाधव ह्यांचींही दर्शनें घेतलीं. काशींत गेल्यावर तेथें कांहीं तरी एक पदार्थ सो-

× हे **बोवांचे** गुरुबंधुच होते. अच्युतरावजी हठयोगांत पूर्ण झाले होते.

डावा लागतो, त्याप्रमाणें बोवांनीं त्यांस फार प्रिय असलेला फणस सोडिला! तेव्हांपासून बोवा गरे, आठ्या, फणसाची भाजी हीं खात नसत व फणसाचे पानावर जेवीत नसत. बोवा एक वर्ष काशींत राहिले होते. तेथें त्यांची आणि सत्पुरुष दिवाकरबोवा ह्यांची गांठ पडली. दिवाकरबोवा परम अध्यात्मनिष्ठ असत. त्यांचे शिष्यसांप्रदायी लोक पूर्वी कल्याण प्रांतांत बरेच होते. ह्यांचा कल्याण प्रांतांत चांगला लौकिक असल्यामुळें बोवांस त्यांचें नांव पूर्वीपासून ठाऊक होतेंच. "समानशील" असल्यामुळें ह्या उभयतां बोवांचें फारच संघट्टण पडलें होतें. त्यांचा ह्यांचा अध्यात्मविषयावर नेहमीं संवाद होत असे. साधकानें बोधाविषयीं फार तीव्रता ठेवावी, कारण वैराग्यवृत्ति ही प्रारब्धवशात् देहपातपर्यंत राहीलच, असा निश्चय कोणासच करितां येणार नाहीं, असें दिवाकरबोवांचें ह्मणणें असे. शके १७५२ सन (१८३०) ह्यावर्षीं वैशाखमासीं महायात्रेहून परत येऊन बोवा कोंकणांत आपल्या गांवीं गेले. तेथें बोवांनीं वडीलमातुश्रींस गंगा घातली व काशीयात्रेचें मावंदें केलें. नंतर थोडे दिवस घरीं राहून बोवा कवाडास आले.

काशीयात्रेहून परत येत असतां, सदाचारसंपन्न व परम भाविक सखारामभटजी माटे यांची आणि बोवांची भेट झाली होती. ह्यांचेच चिरंजीव प्रसिद्ध वक्ते व हरिदास रामकृष्णबोवा माटे हे होत. ह्यांजविषयींची हकीकत पुढील प्रकरणीं योग्य स्थळीं येईलच.

काशीयात्रेहून आल्यानंतर थोड्या दिवसांनीं, बोवा कृष्णातीरीं मरडें येथें ब्रह्मानंदमहाराज आल्याचें ऐकून, त्यांचे दर्शनास गेले. या सत्पुरुषाची पूर्वी एकवेळ भेट झालेली होतीच. परस्परांची दृष्टादृष्ट होतांच उभयतांसही परमानंद झाला. ह्यावेळीं ब्रह्मानंदमहाराज कृष्णेच्या घाटावर शिष्यमंडळीस पाठ देत होते. पाठ संपतांच शिष्यमंडळी गे-ल्यावर उभयतांचा संवाद सुरू झाला. ह्याही खेपेस बोवांचा त्यांचा तीन दिवस समागम झाला. नंतर बोवा तेथून निघाले ते, पुण्यावरून भिमातीरीं खेड येथें आले. तेथें श्रीकृष्णसेवारत, योगविद्यापारंगत, कर्मनिष्ठ, तपोनिधि चंडीरामबोवा ह्यांचें दर्शन घेतलें. चंडीरामबोवांचा व सखारामबोवांचा तीन दिवस सहवास झाला, व अनेक वेदांत विषयांवर वादविवाद झाला. एके दिवशीं सहज श्रीसमर्थ रघुनाथ भटजी ह्यांची गोष्ट निघाली! उभयतांसही समर्थांचें दर्शन घडलें होतेंच. त्यावेळीं उभयतांनीही त्यांची पुष्कळ स्तुति केली. नंतर बोवा चंडीरामबोवांची आज्ञा घेऊन कवाडास परत आले.

खेडाहून आल्यानंतर थोड्याच दिवसांनीं बोवांचे तीर्थरूपांस* देवाज्ञा झाल्याचें वर्तमान समजलें! पुढें त्यांचे वडील बंधु काशिनाथ तात्या ह्यांस वेश्यागमनाचा पराकाष्ठेचा छंद लागला होता! परंतु हें बोवांस समजतांच, त्यांनीं त्यांस युक्तीनें कवाडास बोलावून आणिलें, व त्यांस अनेकप्रकारें

* ह्यांचें सर्व नांव हरि बचाजी केळकर असें लागत असे.

सद्बोध केला, तेव्हां त्यांस कृतकर्माचा पराकाष्ठेचा पश्चात्ताप झाला ! मग बोवांनीं त्यांस नित्य १२०० गायत्रीजप व एक रुद्राची एकादशणी करण्याचा नियम लावून दिला. काशिनाथ तात्यांस खरी उपरति झाली ! असें पाहून बोवांनीं त्यांस त्रिस्थळी यात्रा करण्यास सांगितली. त्याप्रमाणें त्यांनीं यात्रा करून गयावर्जनादिकानें पितृण फेडिलें. पुढें ते कोंकणांत गेले व बोवांचे आज्ञेप्रमाणें नित्यनैमित्तिक कर्मै करून सदाचरणानें राहूं लागले.

इकडे बोवांचे तीर्थरूप वारल्यानंतर, थोड्याच दिवसांनीं त्यांचे भाऊबंदांत तंटे लागले होते, म्हणून ते मोडण्याकरितां बोवा कोंकणांत गेले. तेथें त्यांनीं सर्वांस पसंत पडतील असे युक्तीनें विभाग करून तंटे मोडून टाकिले. बोवांचे वांट्यासही एक हिस्सा आला होता, त्याची त्यांनीं अशी व्यवस्था केली कीं, एकेकानें एकेकवर्ष ह्याप्रमाणें त्याची वहिवाट करून उत्पन्न घ्यावें.

बोवा कोंकणांत गेले, तेव्हां रोहें येथें उतरले होते. त्यावेळीं तेथें कुशाभाऊबर्वे मामलतीचे कामावर होते. त्यासही वेश्यागमनाचा पराकाष्ठेचा नाद लागलेला होता ! रोह्यास गेल्यावर बोवांस हें वर्तमान ( घरांतून ) समजलें. पण बोवा येणार हें कुशाभाऊंस पूर्वीच समजलें असल्यामुळें, त्यांनीं अगोदरच सर्व बंदोबस्त करून हा प्रकार बोवांचे नजरेस न येईल, अशी व्यवस्था ठेविली होती ! बोवांनींही त्यावेळेस कांहींच न बोलतां, येतेवेळींच कायतें

करूं, असा विचार केला. पुढें येतेवेळींही **बोवा** रोह्यास उतरले, त्यावेळीं **कृष्णाजीपंतांस** अगाऊ बातमी न समजल्यामुळें अनायासेंच सर्व प्रकार **बोवांचे** दृष्टोत्पत्तीस आला! आपण मागले खेपेस इतके जपलों, तरी अखेर सर्व फुकट गेलें, असें पाहून **कुशाभाऊंस** अगोदरच फार उद्वेग झाला होता! पुढें **बोवांनीं** एके दिवशीं युक्तीनें बोलण्यास सुरुवात करून, दृष्टांत रूपानें चालू असलेला प्रकार किती निंद्य आहे, याविषयीं **कुशाभाऊंचे** हृदयांत चांगला उजेड पडे असें भाषण केलें. तें ऐकून **कुशाभाऊंस** पराकाष्ठेचा पश्चात्ताप झाला ! व त्यांस पश्चात्ताप झालेला त्यांचे मुद्रेवरूनही स्पष्ट दिसूं लागला ! तेव्हां **बोवा** ह्मणाले, वृत्तीस कोणताही छंद लागतो तो अविवेकानें; तथापि सुज्ञांनीं विवेकानें तो सोडावा हें योग्य. आपण सुज्ञ आहां, ह्मणूनच तर सरकारी पगार मिळवितां, आणि तोही कोणत्या कामावर, तर इनसाफ करण्याच्या ! असें असतां आपण आपले स्वतःचा इनसाफ मात्र लक्षांत ठेवीत नाहीं हें काय? आपणांस पूर्व वयांत **पांडुभाऊंचा** बराच समागम झालेला आहे, त्याचें कांहीं तरी स्मरण ठेवून तदनुसार वर्तन करावें. सुज्ञ आहेत ते पूर्वस्थिति कधींही विसरत नाहींत ! असो. **बोवांचे** अंजनरूपी सद्बोधानें **कुशाभाऊंचे** डोळ्यांवरील सर्व धुंदी उतरली, व त्या दिवसापासून ते सर्व दुर्व्यसनांस रजा देऊन सदाचरणानें राहूं लागले ! दुर्व्यसनपंकांत बुडाल्यावर सद्बोधरूप हस्तानें ओढून बाहेर काढणारा सत्पुरुष भेटणें, हें तरी त्या दुर्व्यसनी

मनुष्यानें पूर्वभाग्यच समजलें पाहिजे, असें कोण ह्मणणार नाहीं !

**बोवा** कोंकणांतून आल्यानंतर कांहीं दिवसांनीं तारापूर येथें **पांडोबांची** प्रकृति बिघडली होती ह्मणून तिकडे गेले. **बोवा** गेल्यावर दोन तीन दिवशीं त्यांची प्रकृति बरी झाली. तेथें एके दिवशीं असें झालें कीं, **बोवा** स्नानसंध्यादिक आटोपून नित्याप्रमाणें अभ्यासास बसले असतां, त्यादिवशीं त्यांची एकसारखी तीन प्रहरपर्यंत समाधि लागली ! दोनप्रहरीं जेवणाची वेळ झाली, तरी **बोवा** खोलींतून रोजच्याप्रमाणें बाहेर आले नाहींत. ते येतील, तेव्हां मंडळी भोजनास बसावयाची. अखेर वाट पहातां पहातां तीन वाजले; सर्व मंडळी उपाशीं ! योगबलाचें असें अपूर्व तेज कीं, त्यांजकडे नुसतें पाहण्याचीही पंचाईत! मग जवळ जाऊन त्यांस सावध करणार कोण? अस्तमान झाला, तेव्हां एकदां **बोवा** समाधि विसर्जन करून पूर्व स्थितीवर आले ! त्यानंतर सर्व मंडळीस भोजन मिळालें. ही हकीकत लागलीच सर्व गांवभर पसरली. तेव्हां जो तो **बोवां**कडे येऊन त्यांस कांहींतरी विचारूं लागला. यामुळें व तेथें त्यांच्या अभ्यासासही कांहींसा व्यत्यय येऊं लागला, ह्मणून ते दोनतीन दिवशींच तेथून निघून कवाडास आले.

एकदां बरोबर कांहीं मंडळी घेऊन **बोवा कार्तिकस्वामींचे** दर्शनास गेले होते.

त्यानंतर **पांडोबा** संन्यास घेऊन समाधिस्थ झाले ! ह्मणून **बोवा** एकदां तारापुरास गेले होते. तिकडून आल्यावर

थोड्याच दिवसांनीं तारापुरचे **जगन्नाथशास्त्रीही** चतुर्थाश्रम घेऊन समाधिस्थ झाले!

ह्यानंतर **बोवा** कवाड सोडून दुसरे कोठें कधींही गेले नाहींत. नाहीं ह्मणण्यास एकदां ठाण्यास मात्र गेले होते. त्याबद्दलची हकीकत पुढील प्रकरणीं सांगण्यांत येईल.

येथपर्यंत **बोवांच्या** प्रवासांतील हकीकतीविषयीं लिहिलें. आतां पुढील प्रकरणांत त्यांच्या योगबलाची व साधुत्वाची साक्ष देणारे असे अनेक अलौकिक चमत्कार, कित्येक भाविक मंडळीची हकीकत व कित्येक मानवीशक्तीच्या बाहेरचीं भासणारीं, किंबहुना असंभवनीय वाटण्याजोगीं परंतु खरोखर घडलेलीं अशीं कृत्यें, हीं यथामति व यथाशक्ति सांगण्याचा विचार आहे. इतकें सांगून हें प्रकरण आतां येथेंच समाप्त करूं.

# प्रकरण सहावें.

पिबन्ति नद्यः स्वयमेव नाम्भः स्वयं न खादन्ति फला-
निवृक्षाः ॥
नादन्ति सस्यं खलु वारिवाहाः परोपकाराय सतां
विभूतयः ॥

सुभाषित.

जगाच्या कल्याणा, संतांच्या विभूति । देह कष्टविती,
उपकारें ॥

तुकाराम.

महाराज सखारामबोवा कवाडास आल्यावर अगदीं थोडक्या कालांतच त्यांचे साधुत्वाबद्दल जिकडे तिकडे प्रसिद्धि होऊं लागली. वास्तविक पाहिलें तर, बोवांचा स्वभाव अगदीं निस्पृह होता, व त्यावेळीं बहुतकरून त्यांचा सर्व वेळ रानांत वगैरे जात असे. असें असतांही कवाडासारख्या अगदीं यःकश्चित खेड्यांत राहणाऱ्या मनुष्याची काशीपासून रामेश्वरापर्यंत अगदीं थोडक्या काळांत-हल्लींप्रमाणें प्रवासाची सोय वगैरे नसतां-सर्वत्र प्रसिद्धि होण्यास काय बरें कारण झालें असावें ? दुसरें काय असावयाचें आहे ? त्यांची खरी साधुवृत्ति आणि अपूर्व योगबल हींच त्यांच्या प्रसिद्धीचीं वास्तविक कारणें होत. " वार्ताच कौतुककरी विमलाच विद्या लोकोत्तरः परिमलश्च कुरंगनाभेः । तैलस्य बि-

न्दुरिव वारिणि दुर्निवारमेतत्रयं प्रसरति स्वयमेव भूमौ ॥" ह्या श्लोकाचा अनुभव व्यवहारांत कोणाला आलेला नाहीं, असें नाहींच. ह्या प्रकरणांत पुढें ज्या अनेक गोष्टी लिहिल्या आहेत त्यांवरून तर तो अनुभव विशेष दृढ होईल यांत संशय नाहीं.

शके १७५२ (सन १८३०) ह्या वर्षाच्या चैत्र महिन्यांत **बोवा** काशीयात्रा करून परत येत असतां, **जालवण** येथें आपल्या आतेकडे उतरले होते. तेथें एके दिवशीं असें झालें कीं, अंगणांत हरभरे वाळत घातले होते, ते शेजारच्या एका हरिणानें खाल्ले ! तें ते खात असतां, घरच्या एका मनुष्यानें पाहिल्यावरून त्यानें त्या हरिणास एका खांबाशीं बांधून ठेविलें. आधींच कडक उन्हाळा, तशांत त्या हरिणानें पुष्कळ हरभरे खाल्ले असून त्यावर त्यास पाणी मिळालें नव्हतें, यामुळें थोड्या वेळानें तें हरिण तहानेनें फारच व्याकुळ झालें ! सुटून जाण्याबद्दल त्याची एकसारखी धडपड चालू आहे इतक्यांत **बोवा** बाहेर आले. तेव्हां त्यांचे नजरेस तो सर्व प्रकार आला. त्या हरिणाचे ते क्लेश पाहून **बोवांचें** अंतर्याम एकदम कळवळून आलें ! आणि त्याजविषयीं त्यांचे मनांत पराकाष्ठेची दया आली ! अहाहा ! याचें नांव खरी भूतदया ! **बोवा** लागलेच त्या हरिणाजवळ जाऊन ह्मणाले, "बिचाऱ्या, या देहबंधनापासून जर तुला आपली सुटका करितां येईना, तरमग जन्मबंधनापासून तूं आपली सुटका कशी करून घेणार ?" असें ह्मणून त्यांनीं त्या हरिणास

सोडलें, व त्याचे तोंडांत थोडें गंगोदक घालून त्याचें सर्वांगावरून हात फिरवीत ह्मणाले, " तूं आजपर्यंत पुष्कळ क्लेश भोगिलेस, आतां तुला मी त्यांतून मुक्त केलें आहे, तूं आतां अखंड सुख भोगण्यास खुशाल जा!" त्या बरोबर त्या हरिणानें या दुःखद सृष्टीचा व क्षणभंगुर तनूचा त्याग केला ! काय विलक्षण चमत्कार आहे पहा ! हरिण चांगलें **धडधाकट** असतां अंगावरून हात फिरवितांच अचेतन व्हावें! हीं गोष्ट आश्चर्यकारक नव्हे काय ? **बोवांनीं** त्यास खरोखरीच ह्मटल्याप्रमाणें सद्गति दिली असली पाहिजे. त्याखेरीज या विस्मयकारक गोष्टीची उपपत्ति कोणत्याही रीतीनें जुळवितां येणार नाहीं. या एकाच गोष्टीवरून, **बोवांचें** सामर्थ्य कशा प्रकारचें होतें, याची वाचकांस सहज कल्पना होईल. जे खरे सत्पुरुष आहेत, त्यांचें सामर्थ्य किती असतें, हें **तुकाराम बोवांनीं** आपल्या एका अभंगांत चांगलें स्पष्ट केलें आहे. तो अभंग असाः—

**आपणा सारिखे करिती तात्काळ ॥**
**नाहीं काळवेळ त्यांस कांहीं ॥ १ ॥**

असो, सारांश काय कीं, **बोवांनीं** त्या हरिणास जन्ममरणबंधापासून सोडवून मुक्ति दिली !

**बोवांची** जसजशी प्रसिद्धी होऊं लागली, तसतशी दर्शनास येणाऱ्या लोकांची त्यांचे भोंवतीं नेहमीं गर्दी होऊं लागली. **बोवा** सकाळसायंकाळ स्नानसंध्येस जात, तिकडेही लोकांची केव्हां केव्हां गर्दी होत असे, आणि तिकडेही

काहीं विलक्षण चमत्कार त्यांच्या नजरेस पडत. यामुळें तर बोवांच्या सामर्थ्याविषयीं त्यांस चांगली प्रचीती येई, व तेणेंकरून त्यांचे ठिकाणीं बोवांविषयीं भारी श्रद्धा उत्पन्न होत असे.

एके दिवशीं तिसरे प्रहरीं नित्याप्रमाणें बोवा अरण्यांत योगाभ्यासांत असतां, एक मोठा भुजंग त्यांचे अगदीं समोर दोन तीन हातांवर फणा वर करून उभा राहिला. त्यानें सुमारें दोन घटका बोवांकडे एकसारखी टक लाविली होती. मग तसें करण्यांत त्याचा काय हेतु असेल ईश्वर जाणे ! दोन घटकांनीं त्यानें आपली फणा एकदां जमिनीस टेंकून, बोवांस जणुं काय नमनच केलें, व नंतर त्यांचे भोंवतीं फिरून त्यानें त्यांस तीन प्रदक्षिणा घातल्या. आणि पुन्हां एकदां जमिनीस डोकें टेंकून नमन केलें. इतकें केल्यावर तो सर्प तेथून निघाला, तो बोवांचे अंगावरून पलीकडे निघून गेला !

एके दिवशीं दोनप्रहरीं बोवा नित्याप्रमाणें योगाभ्यास आटोपून गांवांत येत होते, व त्यांचेमागून कित्येक दर्शनेच्छु लोकही येत होते. ही सर्व मंडळी नदीजवळ आली, इतक्यांत एक मोठा थोरला चिवळ्या वाघ जवळच्या एका जाळींतून अह्लाद उडीमारून, बोवांचे अगदीं समोर सुमारें दहा हातांवर येऊन उभा राहिला ! त्यास पाहण्याबरोबर मंडळी जागचेजागीं गर्भगळित होऊन गेली असेल हें सांगण्यास नकोच. आतां आपणा सर्वांची येथेंच खास

ठाणे

इतिश्री होणार! अशी सर्वांची खात्री होऊन सर्व मंडळी एकमेकांकडे निराशायुक्त मुद्रेनें टकमकां पाहूं लागली! पण चमत्कार असा विलक्षण झाला कीं, बोवांची व त्याची नजरानजर होतांच, तो अत्यंत क्रूर व्याघ्र मांजरापेक्षांही गरीब झाला! त्यानें बोवांस तीन प्रदक्षिणा घातल्या व पायांपुढें जमिनीस डोकें टेंकून मुकाट्यानें आल्या वाटेनें जंगलांत निघून गेला! ती पंचानन महाराजांची स्वारी जेव्हां दृष्टीआड झाली, तेव्हां मंडळीच्या जिवांत जीव आला. कांहीं वेळानें ही सर्व मंडळी गांवांत आल्यावर सर्वतोमुखीं हीच गोष्ट होऊन सर्व लोक मोठ्या आश्चर्यानें थक्क होऊन गेले! व बोवांच्या अलौकिक सामर्थ्याचा पूर्ण अनुभव आल्यामुळें त्यांचेविषयीं अत्यंत पूज्यबुद्धि त्यांचे मनांत उत्पन्न झाली.

कित्येक दिवसपर्यंत एक मोठा वाघ मोठ्या पहांटेस बोवांचे दर्शनास येत असे! कशावरून म्हणाल तर, गांवांत रस्त्यानें बोवांचे बिऱ्हाडापर्यंत वाघाचीं पावलें लागलेलीं नित्य दिसत असत! प्रत्यक्ष वाघ जरी कधीं कोणी येतांना पाहिला नाहीं, तरी हीं पावलें लहानापासून थोरांपर्यंत नित्य सर्वांचे दृष्टीस पडत असत!

एके दिवशीं बोवा नदीवरून येत असतां, वाटेनें चारणाचे कळपांतील चुकून आलेला एक बैल त्यांस आढळला. त्याचे सर्वांगावर मोठालीं किवणें पडलीं असून कावळे, घारी, गिधाडें इत्यादि पक्ष्यांचा मोठा थोरला जमाव त्याचे-

वर बसरला होता ! **बोवा** जर कांहीं वेळपर्यंत तेथें गेले नसते, तर त्या बैलास लवकरच परलोकचा मार्ग स्वीकारावा लागला असता ! परंतु त्याचें भाग्य फार मोठें असल्यामुळें ह्मणा, किंवा **बोवा** अंतर्साक्षी होते ह्मणून ह्मणा, तो घारी गिधाडांचा जमाव पाहतांच **बोवा** तिकडे गेले. पहातात तों तेथें एक बैल पडला असून त्या गिधाडादिकांनीं त्यास बहुतेक अर्धमेला केला आहे ! त्याची ती दशा पाहतांच **बोवांचें** अंतःकरण अगदीं वितळून कळवळून गेलें ! ऐन दोन प्रहर झाले होते, वरून उन्हाचा सपाटा सडकून बसत होता, खालून पाय पोळतच होते; तथापि त्याची त्यांनीं बिलकुल परवा केली नाहीं. अगोदर त्या बैलाचे शुश्रूषेस लागले ! "भूतांची दया हें भांडवल संतां॥ आपुल्या ममता नाहीं देहीं ॥" असें जें **तुकाराम बोवांनीं** ह्मटलें आहे, तें येथें प्रत्यक्ष अनुभवास येत आहे.

असो. **बोवांनीं** प्रथम त्या सर्व पांखरांस हाकून लाविलें, व त्या बैलाचीं तीं सर्व किंवणें नदीचें पाणी गडव्यागडव्यानें आणून साफ धुवून काढिलीं. तेथेंच एका दगडावर कांहीं झाडाचा पाला ठेंचून तो त्या किंवणांवर बसविला व आपलें अंगवस्त्र फाडून त्याच्या पट्या त्यांवरून बांधिल्या! नंतर **बोवा** गांवांत आले, व एक गाडी आणि कांहीं मनुष्यें बरोबर घेऊन पुन्हा तेथें गेले व त्या बैलास गाडींत घालून बिऱ्हाडीं घेऊन आले. इतकें होई तों दुपारचे तीन वाजून गेले ! पण तीन आणि चार यांचा हिशोब कोणाला?

तुह्मां आह्मांला ! बोवांना त्याचें कांहींच नव्हतें. त्यांचे सर्वच मार्ग निराळे ! भगवद्गीतेंतच एके ठिकाणीं ह्मटलें आहे, "या निशा सर्व भूतानां तस्यां जागर्ति संयमी। यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः* ॥" असो. पुढें दररोज बोवा त्या बैलाचीं किंवणें स्वतः धूत, व त्यास खाण्यापिण्यास घालीत. सुमारें आठदहा दिवशीं तो बैल चांगला बरा झाला. तो बैल नेहमीं मोकळाच असे, तरी इतर जनावरांप्रमाणें गांवभर कधींही भटकत नसे. त्याचा नित्य नियम असा असे कीं, बोवा सकाळीं उठले ह्मणजे, गोठ्यांतून येऊन त्यांचे पाय चाटण्याकरितां खोलीचे पडवींतील खिडकीजवळ येऊन उभें राहावयाचें, व पाय चाटतांच पुन्हां आपल्या गोठ्यांत परत जावयाचें. याचप्रमाणें सायंकाळींही करावयाचें ! त्या मुक्या जनावराचा हा नित्य नियम, व तोही वेळच्यावेळीं चालत असलेला पाहून, सर्वांस मोठा चमत्कार वाटे, व बोवांची लीला अगम्य आहे, असें ह्मणून मनाचें कसें तरी समाधान करण्यापलीकडे त्यांची कांहींच मति चालत नसे. याप्रमाणें कित्येक महिने गेल्यावर एके दिवशीं सकाळीं तो बैल नित्याप्रमाणें

---

* ह्या श्लोकाचा अर्थ वेदांतपर व बराच गहन आहे. प्रस्तुत स्थळीं केवळ त्याच अर्थी जरी नाहीं, तरी जवळजवळ तोच अर्थ मनांत आणून ह्याची योजना केलेली आहे.

लोकांस ब्रह्मनिष्ठा निशाचि हा तेथ संयमी जागे ॥
विषयांत लोक जागे या द्रष्ट्यातें निशा जशी तैसे ॥
मोरोपंत—भगवद्गीता २–७०.

पादवंदनास आला असतां, **बोवा** त्याला उद्देशून ह्मणाले, " तुला मुक्त केला आहे, तूं आतां खुशाल जा. " हे शब्द ऐकतांच तो बैल तडक जो तेथून निघाला, तो गांवाबाहेर पडून जंगलांत कोठें निघून गेला. तो बैल त्यानंतर पुन्हां कोणाचेही नजरेस पडला नाहीं. मग तो कोठें गेला, आणि कां ? तो ईश्वर जाणे ! तो बैल गांवांत आल्या दिवसापासून त्यास दावें ह्मणून कसें तें मुळींच माहीत नव्हतें; तो नेहमींच मोकळा होता, तरी तो दिवसांतून दोनवेळांशिवाय कधींही बाहेर पडला नाहीं. असें असतां, त्याच दिवशीं **बोवांनीं** जा ह्मणून सांगण्याबरोबर तो बैल एकदम गेलेला पाहून सर्वांस या गूढ गोष्टीबद्दल मोठें आश्चर्य वाटलें असेल यांत विशेष काय आहे? आश्चर्य वाटलें नसतें तरच विशेष !

अनेक ठिकाणच्या भाविकांस **बोवांच्या** दर्शनास जाण्याविषयीं वारंवार दृष्टांत होत असत ! व त्याप्रमाणें दर्शनास येणाऱ्या लोकांची कवाडास नेहमीं यात्रेसारखी मोठी गर्दी जमत असे ! !

श्री काशी क्षेत्रांत राहणाऱ्या एका संन्याशास, " कवाडास सत्पुरुष **सखारामबोवा** आहेत, त्यांचें दर्शन घे, ह्मणजे ते तुला मोक्षमार्ग दाखवितील, " असा स्वप्नांत दृष्टांत झाल्यावरून तो कवाडास **बोवांचे** दर्शनास आला ! दर्शन होतांच त्यास पराकाष्ठेचा आनंद झाला असेल हें उघड आहे. **बोवांनीं** त्यास कांहीं दिवस तेथें ठेवून घेऊन व सद्बोध करून मोक्षमार्गास लाविलें.

---

बोवा त्रिकालज्ञ होते, याची पूर्ण साक्ष पटविणाऱ्या अशा शेंकडो गोष्टी त्यांच्या सहवासीयांच्या अनुभवास हमेश येत असत. अशा प्रकारच्या कांहीं गोष्टी पुढें दिल्या आहेत. त्यावरून वाचकांचीही बोवांच्या त्रिकालज्ञतेविषयीं पूर्ण खात्री होईल, यांत संशय नाहीं.

एके दिवशीं (शके १७७३ सन १८५२ पौष शुद्ध चतुर्दशी रोजीं) तिसरे प्रहरीं बोवा मांडवांत शिष्य मंडळीस शिकवीत बसले असून, कित्येक ग्रामस्थ मंडळी व कांहीं दर्शनेच्छु लोकही तेथें बसले होते. बोवा विद्यार्थ्यांस पाठ सांगत असतां, मधून मधून मंडळीशींही बोलत होते. असें असतां, बोवा एकदम मंडळींतून उठून स्नानाचे धोंडीवर गेले व " विष्णु, स्नानास पाणी घेऊन ये," असें ह्मणाले. त्याप्रमाणें विष्णूनें बोवांस पाणी घातलें व त्यांचें स्नानही झालें. पण तेथें बसलेल्या मंडळीस या गोष्टीचें मोठें आश्चर्य वाटलें, व त्यांनीं " बोवा, आज एकाएकीं या भलत्याच वेळीं स्नान कां ? " असा बोवांस प्रश्न केला. बोवा ह्मणाले, " आमचे गुरुबंधु चंडीरामबोवा खेडास असत, ते आतांच समाधिस्थ *झाले ! " हें उत्तर ऐकून मंडळीस किती आश्चर्य वाटलें असेल, याची कल्पना करण्याचें वाचकांवरच सोंपवितों. ही गोष्ट ताबडतोब सर्वतो मुखीं होऊन सर्वांस परमाश्चर्य वाटलें ! तथापि, त्यांतही कित्येक धूर्त मंडळी होतीच ! त्यांस वाटलें, आपली प्रसिद्धि व्हावी,

* हा काल समाधिप्रसंगींचा सर्व विधि पूर्ण झाल्याचा समजावा.

ह्मणून बोवांनीं हे कांहीं तरी ढोंग केलें असेल ! त्यांनीं लागलींच दोन मनुष्यें खेडास रवाना केलीं, व तेथून **चंडीरामबोवा** समाधिस्थ कधीं व केव्हां झाले ? त्याजविषयीं बरोबर वेळ लिहून आणविली. परंतु ती खेडच्या पत्रांतील लिहून आलेली वेळ आणि **बोवांनीं** सांगितलेली वेळ हीं अगदीं बरोबर मिळालेलीं पाहतांच, त्या धूर्त मंडळीस **बोवां**विषयीं आपण व्यर्थ संशय घेतला ह्मणून फार पश्चाताप झाला ! आणि **बोवांचे** योग्यतेविषयीं त्यांची पूर्ण खात्री होऊन गेली. आपण **बोवांस** काय काय दोष लाविले, हेंही **बोवांस** खचित समजलें असेल, असें समजून त्यांस मोठें भय वाटलें ! आणि ते पराकाष्ठेचे घाबरून गेले ! ती मंडळी लागलीच **बोवांकडे** जाऊन त्यांस अनन्य भावें शरण गेली व झालेली इत्थंभूत हकीकत प्रांजलपणें **बोवांस** निवेदन करून अज्ञानानें घडलेल्या प्रमादाबद्दल तिनें **बोवांची** क्षमा मागितली ! तेव्हां **बोवांनीं** त्यांस अभय देऊन भिऊं नका स्वस्थ रहा, ह्मणून सांगितलें.

निजामहैद्राबाद येथील दोन प्रसिद्ध विद्वान् मुसलमान गृहस्थ, ठिकठिकाणच्या विद्वानांस कांहीं शास्त्रीय प्रश्न विचारीत, काशीपासून हिंडत आले होते. परंतु त्यांस कोठेंही समाधानकारक उत्तरें अद्यापि मिळालीं नव्हतीं ! यामुळें ते गर्वानें अतिशय चढून गेले होते. इतक्यांत त्यांनीं **बोवांचे** विद्वत्तेचा व साधुत्वाचा लौकिक ऐकिला, तेव्हां त्यांची परीक्षा पहावी ह्या हेतूनें ते कवाडास आले ! आ-

पणांस **बोवां**कडून आपल्या प्रश्नांचीं योग्य उत्तरें मिळणार नाहींतच व आपण यांस खचित जिंकून जाऊं, अशी त्या उभय विद्वानांची पूर्ण खात्री होती. **बोवा** नित्याप्रमाणें शिष्यमंडळीस पाठ सांगत मांडवांत बसले असतां, हे उभय विद्वान् तेथें आले. ते येतांच **बोवांनीं** त्यांस बसावयास बैठक वगैरे देऊन त्यांचा आदर सत्कार केला. व येण्याचा उद्देश काय? वगैरे प्रश्न केले. तेव्हां त्यांनीं आपली हकीकत व येथें येण्याचा उद्देशहीं थोडक्यांत सांगून प्रश्न विचारण्याविषयीं परवानगी मागितली. **बोवा** ह्मणाले, आपले काय प्रश्न असतील ते विचारा, त्यांचीं यथामति उत्तरें देईन. नंतर त्या विद्वानांनीं आपले ठराविक प्रश्न **बोवांस** विचारिले. ते ऐकून घेऊन **बोवा** ह्मणाले, अंमळ थांबा, ह्मणजे उत्तरें देतों. इतकें ह्मणून **बोवा** तेथून उठले व ओटीवरच्या खोलींत जाऊन त्यांनीं दार आंतून बंद करून घेतलें! व सुमारें वीस पंचवीस पळांनीं बाहेर येऊन, मांडवांत येऊन बसले, आणि त्या विद्वानांचे प्रश्नांचीं योग्य तीं उत्तरें त्यांनीं दिलीं! तीं उत्तरें ऐकतांच ते मुसलमान एकदम चपापले, व त्यांस मोठा विस्मय वाटला! त्यांचा सर्व गर्व निरसन झाला, आपल्या छळक बुद्धीविषयीं त्यांस पराकाष्ठेचा पश्चात्ताप वाटला, व त्यांनीं एकदम जाऊन **बोवांचे** पाय धरिले! व महाराज, आह्मी महापराधी आहों, क्षमा असावी, अशी त्यांनीं **बोवांची** प्रार्थना केली! **बोवांनीं** त्यांस अभय देऊन, उठा, ह्मणून सांगितल्यावर ते आपल्या

जाग्यावर येऊन बसले. नंतर ते पुन्हा बोवांस ह्मणाले, महाराज, आपण यावेळीं काशींत जाऊन आलां काय? कारण, आपण आमच्या प्रश्नांचीं जीं उत्तरें दिलीं, तीं ज्या ग्रंथाचे आधारानें दिलीं आहेत, तो ग्रंथ सांप्रत फक्त काशींत मात्र एका विद्वानाकडे आहे! परंतु तेथें त्याचा उपयोग करण्यासारखा कोणी नाहीं. तो ग्रंथ दुसरे कोठेंही उपलब्ध नाहीं, व आपण आतां ज्या खोलींत गेलां होतां तेथेंही तो खचित नसेल! हें त्या विद्वानांचें भाषण ऐकून शिष्य मंडळीस व तेथें असलेल्या ग्रामस्थांसही मोठा चमत्कार वाटला. ग्रामस्थ मंडळी त्या मुसलमानांस ह्मणाली, आपल्या ह्मणण्याप्रमाणें बोवा खरोखरच काशींत जाऊन आले असवित! कारण बोवांचे खोलींत भगवद्गीता, अध्यात्मरामायण इत्यादि लहान लहान दोन तीनच ग्रंथ आहेत. त्यांशिवाय आणखी ग्रंथ मुळींच नाहींत. नंतर ते मुसलमान खिडकीजवळ आले व त्यांनीं आंत पाहिलें तों खरेंच, तेथें दुसरे ग्रंथ मुळींच नव्हते. तेव्हां तर त्या मुसलमानांची पूर्ण खात्री होऊन गेली कीं, महाराज यावेळीं योगबलानें काशींत जाऊन आले! ही गोष्ट खरी काय? ह्मणून त्यांनीं बोवांस पुनः पुनः विचारिलें. परंतु बोवांनीं त्यांस कांहींच जबाब दिला नाहीं. थोडें हांसले मात्र! नंतर कांहीं वेळानें बोवांनीं त्या दोघांस दोन शालजोड्या दिल्या व ह्मणाले, तुह्मी खरे विद्वान् आहां, पण या वृथा गर्वानें मात्र फुकट जाल! यास्तव तुह्मी हा गर्व सोडा, आणि इतःपर कोणाचा छळ करण्याचें

मनांतही आणूं नका, म्हणजे श्रीगुरुसमर्थ तुम्हांवर कृपा करितील. **बोवांचा** हा उपदेश मान्य करून त्या मुसलमानांनीं पुन्हा एकदां **बोवांचे** पायांवर डोकीं ठेविलीं. व नंतर ते **बोवांची** आज्ञा घेऊन मार्गस्थ झाले.

एके दिवशीं दोन प्रहरीं **बोवा** भिक्षेस ( मधुकरीस ) गेले असतां, एके बाईनें मधुकरी आणून घातली. परंतु त्यावेळीं ती बाई नुकतीच अस्पर्श झाली होती ! मात्र त्या बाईचे समजुतींत अद्यापि ही गोष्ट आलेली नव्हती. तथापि **बोवांस** अंतर्ज्ञानानें ती गोष्ट तत्काल समजली ! पण ते त्या गोष्टीची वाच्यता न करितां शांतपणें त्या घरून निघाले, व गांवांत दुसरे कोठें मधुकरीस न जातां तडक नदीवर गेले. तेथें ती सर्व मधुकरी मत्स्यांस खावयास घालून व स्नान करून बिऱ्हाडीं परत आले. लोकांनीं या गोष्टीचें कारण विचारिलें, "विशेष कांहीं नाहीं," इतकेंच म्हणाले. परंतु तेवढ्या उत्तरानें लोकांचें कोठलें समाधान व्हावयाचें ? ज्या घरीं मधुकरी घेतल्यावर **बोवा** नदीवर गेले होते, त्या घरीं ते चौकशी करण्याकरितां गेले. तेथें तपास करितां कारण तर कांहीं समजलें नाहींच, पण ज्या बाईनें **बोवांस** मधुकरी घातली होती ती नुकतीच अस्पर्श बसली आहे, ही गोष्ट त्यांचे तेव्हांच लक्षांत आली ! **बोवा** मधुकरी घेऊन गेल्यावर थोड्याच वेळानें त्या बाईचे समजुतींत येऊन ती अस्पर्श बसली होती. तथापि आपले चुकीनें **बोवांची** मधुकरी विटाळली असावी, ही गोष्ट तिला समज-

ली नव्हती. वास्तविक प्रकार काय झाला असावा, हें मंडळीचे लक्ष्यांत येऊन, तीही कांहीं वाच्यता न करितां परत **बोवांकडे** आली, व त्यांस तो प्रकार सांगून हेंच कारण काय? म्हणून विचारितां, **बोवा** "होय" म्हणाले! त्या दिवशीं **बोवांस** उपोषण! हें निराळें सांगावयास नकोच!!

एकदां एक राजपुराकडील ब्राह्मण **बोवांकडे** आला. त्यानें आपली विपत्ति बरीच तिखट मीठ लावून वर्णन केली. अखेर **बोवांस** ह्मणाला, काय सांगूं, महाराज, यंदांच माझें घर जळालें आहे! आपण घर बांधण्यापुरती तरी सोय लावाल, अशी आशा धरून आलों आहें! हें ऐकतांच **बोवा** शांतपणें ह्मणाले, भटजी, खोटें बोलण्याखेरीज उदरपोषणास आणखी पुष्कळ मार्ग आहेत! अस्तु. असें ह्मणून **बोवांनीं** त्यास चार आठ आणे देऊन वाटेस लाविलें! भटजी मनांत पक्के विरमल्यामुळें तेही मग मुकाट्यानें दुसऱ्या गांवीं निघून गेले. पुढें चमत्कार असा झाला कीं, ह्या गोष्टीस पुरे आठ दिवसही लोटले नाहींत, तोंच भटजींच्या घराकडील "घर जळालें!" अशा मजकुराचें पत्र आलें!! अरेरे, हें पत्र वाचतांच भटजींच्या मनाची काय बरें स्थिति झाली असेल? "इच्छा तसें फळ" ह्या ह्मणीची सत्यता त्यांचे मनावर पक्की ठमून त्यांस कृतकर्माचा पूर्ण पश्चात्ताप झाला असेल, नाहीं बरें? त्यांची कंबरच त्या मजकुरामुळें बसली होती, पण तसेच ते एकदां **बोवांकडे** आले, व खरा पश्चात्ताप होऊन **बोवांस** शरण गेले. **बोवांनीं** त्यांस सदा-

चरणाविषयीं पुष्कळ उपदेश करून घर बांधण्याकरितां रकमही दिली. नंतर भटजी कोंकणांत निघून गेले, व घरबीर बांधून सदाचरणानें राहूं लागले.

एके दिवशीं **बोवा** विद्यार्थ्यांस पाठ सांगत व जमलेल्या मंडळीबरोबर बोलत बसले असतां, एकाएकीं उठले व मंडळीस घरीं जाण्यास सांगून आपण बाहेर जाण्याकरितां निघाले ! मंडळीनें **बोवा**, आज या भलत्याच वेळीं कां? असें विचारून हातानें कोठें जातां? अशा अर्थाची खूण केली. तेव्हां **बोवा** ह्मणाले, आमचे बंधु भेटण्यास येत आहेत, त्यांस सामोरे जातों! त्यावर मंडळीनें पुनः प्रश्न केला, **बोवा**, आपले बोलण्याचा अर्थ समजला नाहीं. आपले कोणते बंधु येत आहेत? **बोवा** ह्मणाले, अंमळ थांबा, ह्मणजे सर्व समजेल! असें ह्मणून ते तडक भिवडीच्या रस्त्याला लागले. हा काय चमत्कार आहे? असें ह्मणत कित्येक मंडळीही त्यांचे पाठोपाठ निघाली. **बोवा** भिवडीच्या अलीकडे जी मोठी ( कामोडी ) नदी लागते, तिच्या कांठापर्यंत जात आहेत, तोंच तिकडून निजामपूर (भिवडी)-च्या दरग्यांत पुष्कळ दिवसांपासून कोणी एक मुसलमान अवलीया राहत असत, ते एकसारखे धांवतच आले! त्यांचे पाठीमागून कित्येक मुसलमानही येत होते. ह्या उभयतां विद्वानांची नदीचे अलीकडे ( कवाडाकडील ) बाजूस गांठ पडली. गांठ पडतांच दोघेही एकमेकांस कडकडून भेटले, व नंतर मिठी सोडून एकमेकांकडे पहात सुमारें दोन घटिका

एकसारखे मोठमोठ्यानें हांसतच राहिले! दोन घटिका झाल्यावर बोवा.कवाडाकडे वळले, व ते अवलीया दरग्याकडे वळले! परस्परांचें संभाषण वगैरे कांहींच झालें नाहीं. फक्त दोघेही मनमुराद हांसले मात्र! हा चमत्कार वाचून वाचक मोठ्या बुचकळ्यांत पडतील. आणि खरोखर बुचकळ्यांत पडण्यासारखीच ही गोष्ट आहे. दोघेही साधु पूर्व संकेत नसतां, एकमेकांकडे यावयास निघाले कसे! दुसरा आपले भेटीस यावयास निघणार असें समजून प्रत्येक जण अगदीं एकाच वेळीं निघाला कसा? बरें, भेट झाल्यावर एकमेकांस घट्ट आलिंगन देऊन दोघेही परस्परांकडे पहात हर्षवायु झाल्याप्रमाणें हांसत कां राहिले? व अखेर परस्पर कांहींच न बोलतां दोघे दोहोंकडे निघून गेले, तेव्हां त्यांच्या भेटीचा उद्देश काय? आणि तो साधला कसा? असे अनेक प्रश्न मनांत एकामागून एक उभे राहतात! तथापि, आमचे आंगांत वाचकांपेक्षां कांहीं ज्यास्त योग्यता—ह्या प्रश्नांचीं उत्तरें देण्यासारखी—नसल्यामुळें, त्यांस तसेच बुचकळ्यांत ठेवून आह्मांस नाइलाजास्तव दुसरीकडे वळणें भाग पडत आहे. यास्तव, वाचक आह्मांवर रागावणार नाहींतच.

सांगलीस राहाणारा गोविंदभट या नांवाचा कोणीएक ब्राह्मण, काशीयात्रा करून गंगेची कावड घालण्याकरितां, रामेश्वरीं चालला होता. तो नाशिकास आल्यावर त्यास एके रात्रीं स्वप्नांत असा दृष्टांत झाला कीं, कोणीएक गोसावी येऊन त्यानें आपणांस जागें केलें व तूं काशीहून

आणिलेली ही गंगोदकाची कावड रामेश्वरीं नेऊन घालण्याकरितां चालला आहेस, पण तूं एवढी खटपट करूं नकोस. तर ही कावड तूं कवाडास सखारामबोवा आहेत त्यांस नेऊन घाल, ह्मणजे ती रामेश्वरास पोंचेल! असें ह्मणाला. नंतर तो गोसावी एकदम दिसेनासा झाला. तो ब्राह्मणही लागलाच जागा झाला, व पहातो तों अगदीं चक्क उजाडलें! त्याला ह्या स्वप्नांतील दृष्टांताचा मोठा चमत्कार वाटला व त्याचें मन द्विधा झालें. आपण इतक्या लांब मोठ्या श्रमानें आणिलेली कावड श्रीरामेश्वरास न घालितां यःकश्चित (!) 'बोवास' काय नेऊन घालावी? असेंही त्यास वाटूं लागलें. स्वप्नच तें! त्यांतील मजकूर खराच कोठें असतो! असे अनेक तरंग त्याचे मनांत येऊन अखेर त्यानें रामेश्वरासच कावड घालण्याचा निश्चय केला! आणि त्याप्रमाणें दुसरे दिवशीं तो मार्गस्थही झाला. पण त्याच्या या अविचाराचा असा परिणाम झाला कीं, तो कोस दोन कोस गेला असेल नसेल, तोंच त्याचे पाय अतिशय दुखूं लागले! त्याच्यानें एक पाऊलही पुढें टाकवेना. अखेर जेमतेम करून तो एकदांचा शेजारच्या गांवीं गेला. तेथें जातो तों त्याचे दोन्ही पाय सुजले व सायंकाळीं तर त्यास मनस्वी ज्वर आला! आपण दृष्टांतांतील आज्ञा उल्लंघिली, त्याचाच हा सर्व परिणाम आहे, अशी त्याचे मनाची पूर्ण खात्री होऊन चुकली! त्यानें रात्रौ रामेश्वराची अनन्यभावें स्तुति करून ह्मटलें, देवा, काल झालेला दृष्टांत जर खरा असेल,

तर रात्रींतून सर्व यातना दूर होऊं दे, ह्मणजे मी उद्यांच कवाडास जाण्यास निघून **महाराज सखारामबोवांवर** ही गंगोदकाची कावड नेऊन घालितों. ब्राह्मणास त्या रात्रीं स्वस्थ झोंप लागली व सकाळीं तो उठून पहातो तों पायांस सूजबीज कांहीं नसून प्रकृति अगदीं उत्तम आहे! हा चमत्कार पाहून ब्राह्मणाची **दृष्टांताचे** सत्यतेविषयीं पूर्ण खात्री झाली व तो ती कावड घेऊन कांहीं दिवसांनीं कवाडास आला. त्यानें ही झालेली सर्व हकीकत **बोवांस** सांगून त्यांस ती कावड घातली! आणि **बोवांचे** आज्ञेप्रमाणें काशीस जाऊन चतुर्थाश्रम स्वीकारून मुक्त झाला!

**नारायण भट वर्वे** ह्मणून एक वांईकर गृहस्थ दरसाल भिक्षुकीकरितां कल्याण प्रांतीं येत असत. तेव्हां भिक्षुकीचे निमित्तानें त्यांच्या कवाडासही दोन चार खेपा होत. कवाडास गेल्यावर **बोवांचे** दर्शनाचा अमूल्य लाभ घेतल्याखेरीज ते कधींही राहत नसत यामुळें **बोवांचा** व त्यांचा बराच परिचय झाला होता. शके १७८१ (सन १८५९)चे वैशाखमासीं **नारायण भट** कवाडास **बोवांकडे** गेले असतां, **बोवांनीं** त्यांस लागलेंच सांगितलें, भटजी, "वाटेंत कोठें फारसे न राहतां तुमच्यानें होईल तितकी त्वरा करून घरीं जा"! ही आज्ञा ऐकतांच भटजी लागलेच **बोवांस** नमस्कार करून निघाले. भटजी गेल्यावर **बोवा** जवळ बसलेल्या मंडळीस उद्देशून ह्मणाले, ब्राह्मणाचे मुलांबाळांचा पसारा होणार आहे! आणि खरोखरच तसें झालें! **नारायण भट** हे किती झाले

तरी भिक्षुक ! त्यांच्यानें का पैशाच्या लोभ सोडून जाववणार आहे? ते कल्याणास आल्यावर कांहीं भिक्षुकीचा लग्गा आला, झालें, तेथें त्यांचा दोन तीन दिवस सहजच मुक्काम झाला. त्याचप्रमाणें आणखीही असाच एक दोन ठिकाणीं एखादा दिवस कमजास्ती लागला. यामुळें भटजी जरी आपल्याकडून मोठ्या जलदीनें घरीं आले, तरी ते येण्याच्या पूर्वींच दोन दिवस त्यांचे कुटुंबास देवाज्ञा झाली होती ! ! आणि त्यांच्या लहान लहान मुलांबाळांचा पसारा झाला होता ! ! ! **नारायण भटजी** जर भिक्षुकीचे लोभास गुंतले नसते व **बोवांचे** सांगण्याप्रमाणें त्वरेनें घरीं आले असते, तर त्यांची व त्यांच्या कुटुंबाची अखेरची भेट तरी झाली असती, व त्या अति दुःखद प्रसंगीं ममतेचें माणूस कोणी जवळ नसल्यामुळें त्या लहान मुलांची जी अत्यंत कष्टतर स्थिति झाली, ती तरी तितकी कष्टतर झाली नसती ! पण हीं सर्व संकेतार्थी अनुमानें काय उपयोगाचीं? "भवितव्यता बलीयसी" हेंच खरें ! **बोवांनीं** जरी भटजींस अगाऊ सूचना दिली होती, तरी ही सूचना व्यर्थ आहे, हें त्यांस पूर्वींच समजलें होतें, व त्याप्रमाणें होणार , हें ब्रह्मलिखितच होतें ! तथापि केवळ आपल्याच चुकीमुळें आपण आपल्या कुटुंबाशीं अंतरवैरी झालों, असें वाटून भटजींचें मन त्यांस नेहमीं खात असे ! खरोखर पाहतां ह्या सर्व गोष्टी पराधीन असून आपण निमित्ताला मात्र कारण होत असतों, पण प्रसंगीं हा विचार मनांत येतो कोठें? आणि तो येत

नाहीं, ह्मणूनच आपण वारंवार दुःख करीत राहतों!

अष्टागर प्रांतांत त्र्यंबकराव गोडबोले ह्मणून एक सुप्रसिद्ध गवई होऊन गेले. ते एकदां बोवांचे दर्शनास कवाडास आले होते. त्यांचे मनांतून श्रींचे पुढें गाणें करावें असें फार होतें. पण मी गवई आहें, असें आपल्याच तोंडानें सांगणें ह्मणजे 'आत्मस्तुति' होय, असें समजून ते तर कांहींच बोलेनात! त्यांची तेथें कोणास माहिती नव्हती, व त्यांजवळ तंबोरा वगैरे कांहीं—गवयाची खूणही नव्हती, यामुळें आपल्यास कोणी गाण्याविषयीं सुचवील असाही त्यांस कांहीं सुमार दिसेना. तेव्हां आतां काय करावें? आपली इच्छा पूर्ण होणार कशी? अशी त्यांस मोठी चिंता पडली. तथापि त्यांची ही चिंता लवकरच दूर झाली. रात्रीस कित्येक ग्रामस्थ मंडळी जमून त्र्यंबकरावांबरोबर इकडल्या तिकडल्या गोष्टी बोलत बसली होती. इतक्यांत बोवा सायंकाळचें नित्यनैमित्तिक वगैरे आटोपून बाहेर आले. व त्र्यंबकरावांस उद्देशून ह्मणाले, त्र्यंबकराव, तुमचे आंगीं जी एक अप्रतिम कला आहे, ती अशी लपवून कां ठेवितां? या मंडळीचे मनांत आपलें गाणें ऐकण्याचें फार आहे. बोवांचे हें बोलणें ऐकतांच त्र्यंबकरावांस व मंडळीस अत्यंत आश्चर्य व आनंद झाला असेल हें सांगण्यास नकोच. नंतर मंडळीनें तंबोरा वगैरे आणिल्यावर चार घटका अनेक रागरागिणींवर गायन होऊन मंडळी घरोघर गेली,

व त्र्यंबकराव दुसरे दिवशीं **बोवांची** आज्ञा घेऊन आपलें गांवीं गेले.

शके १७८८(सन१८६६)सालीं कोणी एक सोनार काशीयात्रा करून **बोवांस** घालण्या करितां गंगा घेऊन कवाडास आला. तो **बोवांकडे** आला, तों **बोवा** स्नान करण्याकरितां धोंडीवर बसले असून, आंगावर आतां तांब्या घेणार, इतक्यांत, सोनारानें गंगा आणिलेली कुपी **बोवांजवळ** आणून ठेविली. ती गंगा **बोवांनीं** स्नानास घ्यावी, अशी सोनाराची मनोभावापासून इच्छा होती, व त्याची शुद्ध भक्ति जाणून **बोवांचेंही** मनांत ती इच्छा पूर्ण करावयाची होतीच. परंतु तेथें कित्येक ब्राह्मण मंडळी होती, तेव्हां सोनाराचे हातचें पाणी स्नानास घेतलें असतां, त्यांचे दृष्टीनें तें करणें अप्रशस्त होईल ! ह्मणून **बोवांनीं** गंगोदकानें फक्त नेत्रस्पर्श केला व ती कुपी दूर ठेवून नंतर घंगाळांतून तांब्या भरून घेऊन ' जय गंगेभागीरथी ' ह्मणून तो आपले मस्तकावर ओतिला. इतक्यांत असा चमत्कार झाला कीं, **बोवांनीं** ' जय गंगे भागीरथी ' ह्मणण्या बरोबर त्या कुपींतील गंगोदक भराभर बाहेर येऊं लागून **बोवांचे** घंगाळाकडे प्रवाह जाऊं लागला ! हा अपूर्व चमत्कार पाहून मंडळी अगदीं थक्क होऊन **बोवांस** ह्मणाली, **बोवा**, भागीरथीचा हेतु आपल्यास स्नान घालण्याचा आहे. यास्तव तिला स्नान पात्रांत घ्यावें !! **बोवांस** तरी तेंच पाहिजे होतें. त्यांनीं तें गंगोदक स्नानास घेऊन सोनाराची इच्छा पूर्ण केली !!!

ह्या प्रकारणाचे आरंभींच **बोवांनीं** हरिणास मुक्ति दि- ल्याची गोष्ट लिहिली आहे. तशाच आणखी दोन तीन गोष्टी आहेत त्या पुढें लिहिल्या आहेत.

एकदां एका शूद्राचे मुलानें एक पोपट धरून आणून **बोवांस** दिला. **बोवांनीं** त्यास पिंजऱ्यांत घालून त्याचें दोन तीन वर्षें मोठ्या ममतेनें रक्षण केलें. एके दिवशीं तो पोपट मो- ठ्यामोठ्यानें आक्रोश करूं लागला. तेव्हां **बोवांनीं** त्याचा अंतकाल समीप आला आहे असें समजून त्यास पिंजऱ्या- बाहेर काढिलें, त्याचे कपाळीं भस्म लाविलें व त्याचे तोंडांत गं- गोदक घातलें. नंतर त्याचे अंगावरून हात फिरवून **बोवा** ह्मणाले, राघोबा, आतां व्यर्थ क्लेश न पावतां स्वस्थ जा! हे शब्द ऐकण्याबरोबर पोपटानें देह ठेविला ! ! नंतर **बो- वांनीं** त्याचें शव खोल खळगा खणवून पुरून टाकविलें !

**बोवांकडे** कुतरीं, मांजरें वगैरे पुष्कळ असत, व त्यांस **बोवा** स्वतां खाणें पिणें घालीत, वगैरे मजकूर चौथ्या प्र- करणांत आलाच आहे. एके दिवशीं एक कुत्रा खाणें खा- तांच निघून जाऊं लागला. तेव्हां **बोवांनीं** त्यास परत हाक मारून बोलाविलें. परंतु त्यांचे हाकेकडे लक्ष न देतां कुत्रा तडक निघून चालता झाला ! त्यावर **बोवा** त्याला उद्देशून ह्मणाले, तूं तरी काय करिशील ? तुझा मृत्युसमयच जवळ आला आहे ! ! खरोखरीच त्या रात्रीं कुत्र्यास एका खर- ड्यानें मारून टाकिल्याची बातमी सकाळीं **बोवांकडे** आली!

एकदां एका कुणब्याच्या मुलास ससा घेऊन जातांना

**बोवांनीं** पाहिलें. हा मुलगा आतां ह्या सशास मारणार असें **बोवांचे** तावडतोब मनांत येऊन त्यांस पराकाष्ठेचें वाईट वाटलें ! तथापि ते नुसते वाईट वाटूनच राहिले नाहींत. त्यांनीं त्या मुलास जवळ बोलावून व त्यास द्रव्य देऊन त्याजपासून तो ससा विकत घेतला. तो ससा बरेच दिवसपर्यंत बोवांजवळ होता. पुढें त्यास कांहीं विकृति झाल्यामुळें ह्याला आतां मुंबईस पांजरपोळांत पोंचवावें असा मंडळीनें विचार काढिला होता. पण त्याचें नेमोत्तर ह्याहून फार निराळें होतें ! एके दिवशीं तिसरे प्रहरीं तो ससा मोठ्यामोठ्यानें ओरडूं लागला. तें पाहतांच **बोवांनीं** त्याचे तोंडांत गंगोदक घालून त्याचे आंगावरून हात फिरविला. त्याबरोबर सशानें **बोवां**कडे पहात पहात प्राणोत्क्रमण केलें ! !

एके दिवशीं **बोवा** स्नानास जात असतां त्यांस एका मोठ्या विषारी सर्पानें दंश केला. पण **बोवांनीं** त्याजवर कांहींच उपचार केले नाहींत किंवा कोणास करूंही दिले नाहींत ! तथापि त्यांस त्या विषाची मुळींच बाधा झाली नाहीं !

शके १७८१ सालीं **बोवांस** घाटसर्पाचा आजार झाला होता. तोही औषधोपचाराशिवाय बरा झाला! **बोवा** कधींही औषध घेत नसत, हें आह्मी मागेंही एक दोन वेळां लिहिलेंच आहे !

एका गरीब कुणब्याचे मुलास पोटशुळाची अतिशय पीडा जडली होती. पहिल्या पहिल्यानें घरच्या माणसांनीं

झाडपाल्याचीं कांहीं औषधें केलीं. तथापि दिवसें दिवस शूळ फारच वाढत चालला. यामुळें अखेर घरचीं माणसें कंटाळून त्याजकडे कोणी लक्ष देईनाशीं झालीं! बरोबरच आहे, नित्य मरे, त्याला कोण रडे ! आणि त्यांतून गरीबी! अखेर त्या मुलास कोणी बोवांकडे जाण्यास सांगितल्यावरून तो त्यांजकडे आला. **बोवांनीं** त्याची हकीकत ऐकून घेऊन त्यास आपल्या येथेंच राहण्यास सांगितलें, व एक सारखें "राम, राम" ह्मणत राहा, अशी आज्ञा केली! फक्त या एकाच जहालीम औषधानें त्याचा पोटशूळ संध्याकाळाला साफ बरा झाला!! अहाहा! किती तरी हें अद्भुत सामर्थ्य!!! नंतर **बोवांनीं** त्यास दोन नियम पाळण्यास सांगून घरीं जाण्यास आज्ञा दिली. ते दोन नियम असे. रोज कांहीं घरें भिक्षा मागून तें भिक्षान्न खावयाचें, व मद्यमांसादिक निशिद्ध पदार्थांचें सेवन करावयाचें नाहीं. एकदां मोहानें त्या मुलानें हे नियम मोडिले! त्याबरोबर पुन्हा पोटशूळ उत्पन्न झाला! तेव्हां पुन्हां **बोवांकडे** येऊन त्यानें सर्व हकीकत सांगितली व पश्चात्तापपूर्वक अपराधाची क्षमा मागितली. तेव्हां **बोवांनीं** कृपाकुपणानें त्याजकडे पहातांच त्याची व्यथा दूर झाली! पण यावेळीं **बोवांनीं** त्यास निक्षून सांगितलें कीं, पहा बरें, जर आतां पुन्हा नियम मोडिलास तर मात्र मजकडे कांहीं नाहीं! त्या मुलानें पुन्हा कधीं ते नियम उल्लंघन केलेच नाहींत. व यामुळें तो रोगमुक्त होऊन सुखी झाला!

ठाणे

कवाडकर दादा जोग ह्यांस क्षयरोगाची भावना होऊन ते अगदीं निराश झाले होते! कोणाही वैद्याचे औषधाचा गुण ह्मणून येईना. अखेर ते एके दिवशीं बोवांकडे येऊन त्यांस अनन्यभावें शरण गेले. तेव्हां बोवांनीं त्यांस नित्य भगवद्गीता व विष्णुसहस्त्रनाम वाचीत जा ह्मणून सांगितलें! व त्यांस तीं आपण स्वतांच शिकविलीं. बोवांचे आज्ञे-प्रमाणें दादा नित्य भगवद्गीता व विष्णुसहस्त्रनाम वाचीत असतां, दुसरें कांहीं औषध घेतल्याखेरीज, असाध्य ह्मणून ठरलेल्या क्षयरोगापासून मुक्त झाले!

शके १७८८ (सन १८६६) सालीं मार्गशीर्ष मासीं नारायणबोवा पटवर्धन मुंबईच्या विठ्ठलवाडीचे संस्थानिक ह्यांस काशीनाथ* बोवांनीं कवाडास बोवांच्या दर्शनास आणिलें. ह्यांस दोन तीन वर्षांपासून भ्रम झाला होता. बोवांचें दर्शन होऊन त्यांनीं कपाळीं आंगारा लावितांच दुसरे दिवशीं ते भ्रममुक्त झाले! मग बोवांनीं त्यांस वासुदेवदीक्षा देऊन परमार्थमार्गास लाविलें. हे हल्लीं मुंबईस असतात.

पडघें येथें एकदां एका ब्राह्मणाचे मुलास महामारीचा उपद्रव झाला. त्यास बाप नव्हता. आई होती, ती सुद्धां बरीच वृद्ध झाली असून तिला ह्या मुलाखेरीज दुसरें अपत्य नव्हतें. ह्मणून तिचा सारा जीव कायतो त्या मुलावरच होता. आतां तर त्या एकुलत्या एक मुलावर मृत्यूचा घाला पडणार, अशी वेळ येऊन ठेपली होती! हाय, हाय! त्या

* ह्यांची हकीकत पुढें एके ठिकाणीं दिली आहे.

दुर्धरप्रसंगीं त्या बिचारीची काय बरें अवस्था झाली असेल ! ! "मन चिंती तें वैरी न चिंती" या म्हणीप्रमाणें पुढील घोर प्रसंगाचें चित्र तिला स्पष्ट दिसूं लागून तिची कंबरच खचली ! ! ! हर हर ! असा परम दुर्धर प्रसंग कोणावरही ईश्वरकृपेनें न येवो. ती म्हातारी निराशेनें आणि शोकानें व्याकुल होऊन गेली ! कांहीं वेळानें मुलाची प्रकृति जास्तच बिघडली, व आतां तर तो घटका अर्ध्या घटकेचाच सोबती झाला ! ! मग तर त्या म्हातारीनें जो आकांत केला, त्याचें वर्णन करण्यास आमची लेखणीच चालत नाहीं. यास्तव, वाचकांनीं आम्हास क्षमा करून, तो प्रकार स्वकल्पनेनेंच जाणावा. पण हा प्रकार फार वेळ टिकला नाहीं. मग "आशायाः परमं दुःखं निराशा परमं सुखं" म्हणून म्हणा, किंवा तिचे मनांत दुसरी कांहीं कल्पना आली म्हणून म्हणा, —परंतु दुसराच पक्ष खरा दिसतो.—तिनें आपला सर्व शोक आंवरला, व मोठ्या कष्टानेंच ती उठली. एकदां त्या आसन्नमरण अशा अत्यंत प्रिय पुत्राकडे डोळे भरून पाहिलें, आणि लगेच तेथून दूर सरली. कुटुंबांतील इतर मनुष्येंही कमजास्त मानानें शोकाकुल होऊन तेथेंच बसलीं होतीं. त्यांस म्हातारीचे या कृत्यामुळें कांहीं आश्चर्य व कांहीं भय वाटलें! इतक्यांत म्हातारी त्यांस म्हणाली, ह्या मुलास संभाळा. मी कवाडा बोवांकडे जाणार. जर मुलगा ह्यांतून वांचला, तर त्याला कवाडास घेऊन या. न वांचलाच तर—जी गत त्याची ती माझी आहेच ! मी जातें, संभाळा. असें म्हणून

म्हातारीनें पुन्हा एकदां पुत्रमुखावलोकन केलें, व तिनें मग तडक कवाडाची वाट धरिली. **बोवांचें** स्मरण होतांच, घरच्या मंडळीनेंही त्यांचे नांवानें मुलास अंगारा लावून, त्यास आरोग्य होण्याविषयीं **बोवांची** प्रार्थना केली. इकडे ती म्हातारी बसत उठत कवाडास आली. तिनें येतांच **बोवांचे** पाय गच्च धरून, त्यांस आपल्या दुःखाश्रूनें न्हाणिलें. तिचा आक्रोश ऐकून खरोखरी पाषाणहृदय सुद्धां द्रवलें असतें, मग **बोवां**सारख्या "वसुधैवकुटुंबकास" काय वाटलें असेल, हें सांगावयासच नको आहे. **बोवा** जरी सर्व जाणत होते, तरी लौकिकार्थ त्यांनीं त्या बाईचें शांतवन करून, शोकाचें कारण काय? म्हणून बाईस प्रश्न केला. बाईनें हकीकत सांगून **बोवांस** म्हटलें, आपण मज अभागिनीवर दया करून मला पुत्र दान दिलें तर ठिकच आहे, नाहींतर मी देहत्याग करण्याचा निश्चय करून येथें आलें आहे. बाईची निष्कपट वृत्ति आणि दृढनिश्चय पाहून **बोवा** म्हणाले, बाई, तुमचा मुलगा खुशाल आहे. तुम्ही आतां कांहीं काळजी न करितां स्वस्थ घरीं जा ! **बोवांचें** भाषण अन्यथा व्हावयाचें नाहीं, हें बाई पूर्ण जाणत होती. तरी ती म्हणाली, मुलगा बरा झाला, तर त्यास आपल्या पायांवर घालण्यास आणा, म्हणून मी सांगून ठेविलेंच आहे. मुलास बरा झालेला पाहिल्याशिवाय किंवा त्याची बरी वाईट खबर समजेपर्यंत हे पाय सोडून मी कोठें जाणार नाहीं कीं अन्नपाणी घेणार नाहीं. असा माझा दृढ संकल्प आहे ! "भाव तेथें देव"

ही ह्मण कांहीं खोटी नाहीं. ह्मातारीच्या सत्यसंकल्पाप्रमाणें **बोवांनीं** तिला खरोखर पुत्रदानच दिलें ह्मणावयाचें. इकडे तो मुलगा अगदीं घटका पळें मोजूं लागला असतांही, औषधोपचारांवांचून नुसत्या अंगाऱ्यानेंच—**बोवांच्या** हातचा सुद्धां नव्हे, तर फक्त **बोवांच्या** नांवानें लाविलेल्या अंगाऱ्यानेंच—उतार पडून चांगला बरा झाला ! तेव्हां दुसरे दिवशीं त्याला घरच्या मनुष्यांनीं कवाडास **बोवांचे** दर्शनास आणिलें. अहाहा, त्यावेळीं त्या ह्मातारीला पुत्रदर्शनानें किती बरें आनंद झाला असेल ! नंतर ती सर्व मंडळी बाईसहवर्तमान मोठ्या आनंदानें **बोवांचे** गुण गात पढघ्यास परत गेली. उद्यां ह्मणजे आपण अशा विलक्षण आनंदांत निमग्न होऊं अशी कल्पना आदल्या दिवशीं त्यांपैकीं एकास तरी झाली असेल काय ? नाहीं, नाहीं. अशी कल्पना होणें, ह्मणजे "मुसळाला अंकुर फुटतील," अशी कल्पना होण्यासारखेंच होतें ! पण **बोवांसारख्या अद्वितीयांस** काय अशक्य आहे ?

**बापुसाहेब** दातार ह्मणून भिवंडीस एक मामलेदार होते. त्यांची **बोवांचे** ठिकाणीं अत्यंत निष्ठा असे. त्यांस संतति नसल्यामुळें फार खेद होत असे. तरी ते व त्यांचें कुटुंबहीं फार विचारी असल्यामुळें, तीं आपला खेद सहसा कोणाचे दृष्टोत्पत्तीस येऊं देत नसत. तथापि **बोवांस** ती गोष्ट समजणें अशक्य नव्हतेंच! शके १७७२(सन १८५०)सालीं **बापुसाहेब** दर्शनास गेले असतां, **बोवांनीं** त्यांचे कुटुंबाचे ओटींत श्रीफल

( नारळ ) प्रसाद घालून " पुत्रवतिं भव " असा आशीर्वाद दिला ! त्याप्रमाणें **बापुसाहेबांस** एक वर्षाचे आंतच पुत्रलाभ झाला ! त्या मुलाचें नांव त्यांनीं **बोवांची** आज्ञा घेऊन ' **सखाराम** ' ठेविलें. ह्याच सुमारास बापुसाहेबांवर सरकारी कामासंबंधानें कांहीं संकट आलें होतें. पण **बोवांचे** कृपेनें त्यांतूनही ते बचावले !

केळवें-माहीम येथें एका *गृहस्थाकडे शके १७८९ (सन

---

* ह्यांचें नांव बाळकृष्ण गोविंद दळवी असें आहे. हे गृहस्थ हल्लीं हयात आहेत. हे जातीचे कायस्थ परभू आहेत. ह्यांचे घरांत जी पिशाचाची बाधा होत असे, ती लहान सहान पिशाचाची नव्हती ! तर तो एक " ब्रह्मपुरुष " असे ! ! असें सांगतात कीं, बाळकृष्णपंतांच्या आजोबांच्या आजोबांनीं कांहीं विशेष राजकारस्थानसंबंधीं इच्छितफलप्राप्त्यर्थ एक मोठा यज्ञ केला असून, त्या यज्ञांत पूर्णाहुतीस त्यांनीं आपल्या प्रत्यक्ष मुलाचें दंपत्य बळी देण्याचें योजिलें होतें ! त्या यज्ञास काशीपासून कांहीं विद्वान् आले असून मुख्य अध्वर्यू हे काशींतीलच मोठें नामांकित वेदशास्त्रसंपन्न होते ! खुद्द यजमान व बळी जाणारें दंपत्य यांचा पूर्ण निश्चय ठरल्यानंतर अध्वर्यूनीं यज्ञास आरंभ केला. अखेरचा पूर्णाहुतीचा दिवस आला. तें नवतरूण दंपत्य सर्वालंकारयुक्त होऊन यज्ञमंडपांत येऊन हुत होण्यास सिद्ध होऊन राहिलें ! पण,— अखेर जेव्हां पूर्णाहुतीचा समय आला, आणि अग्निकुंडांतून देदिप्यमान ज्वाला आहुति घेण्याकरितां अध्वर्यूकडे येऊं लागल्या, तेव्हां यजमानांस कृतकर्माचा पश्चात्ताप होऊन त्यांचा पूर्वनिश्चय ढळला, व त्यांचें मन शोकाकुल होऊन पुत्रस्नुषेविषयीं मोह पावलें । झालें, त्यांनीं त्या दं-

( पुढें चालू. )

१८६७) सालीं चैत्र महिन्यापासून कांहीं पैशाचिक उपद्रव होत असे! त्याचे प्रकार मोठे विलक्षण असून ते सतत चार पांच महिने होत होते. वासनांतील मधलेंच चिरगुट जळून त्याची रक्षा व्हावी, पण वरच्या खालच्या चिरगुटांस स्पर्शही होऊं नये; गादी, लोड ह्यांतील मधलाच कापूस जळावा; घराचे भागांस विनाकारण आग लागावी; दांडीवरचीं चिरगुटें देखतां देखत भुरभुर जळून जावीं; भलत्याच वेळीं एकाएकीं निखारे वरून पडावे; घरांतील बंदोबस्तांतील वस्तु नाहींशा व्हाव्या; आणि मग त्या भलत्याच कोठें तरी पडलेल्या सांपडाव्या! सारांश, एक ना दोन, बोलून चालून भूतचे-

---

पत्यास यज्ञमंडपांतून लागलेंच नाहींसें केलें!! इकडे पूर्णाहुति देण्याची वेळ आली, पण दंपत्य तर कोठें दिसेना; चोहोंकडे एकच गडबड उडाली, इतक्यांत अग्निकुंडांतून एक फार मोठी ज्वाला निघाली, आणि तिनें पूर्णाहुति न मिळाल्यामुळें अध्वर्यूस अग्निकुंडांत ओढून त्यांचीच पूर्णाहुति घतली!!! चोहोंकडे एकच हाहाकार झाला! पण उपयोग काय? अध्वर्यूंची क्षणांत राखरांगोळी होऊन गेली!! आणि यज्ञफला ऐवजीं यजमानांस ब्रह्महत्या मात्र घडली!!! पुढें पापक्षयार्थ काशीयात्रा वगैरे अनेक उपाय यजमानांनीं चालविले होते, व त्या "ब्रम्हपुरुषाचे" नांवानें ब्राह्मणभोजनादिक कित्येक पुण्यकृत्यें नेहमीं चालू ठेविलीं होतीं. पण या गोष्टीस बराच काळ लोटल्यामुळें बाळकृष्णपंतांचे वेळेपर्यंत त्यांची आठवणही नाहींशी होत आली होती. आणि ह्मणूनच त्या "ब्रम्हपुरुषानें" पुन्हा उपद्रव देऊन सूड उगाविण्यास आरंभ केला होता! अशी आख्यायिका आहे.

एाच त्या ! त्यांचें वर्णन करावें तितकें थोडेंच होणार ! ! असा प्रकार चालू असल्यामुळें घरांतील सर्व मनुष्यें अगदीं कंटाळून गेलीं. देवर्षि, छांछूं करणारे, चीरमंत्री कित्येक लटपटले ! पण कांहीं नाहीं. ज्याचें नांवतें. आपला पूर्व प्रकार चालू आहे तो आहेच ! इतकेंच नव्हे, तर असा कोणी एखादा बंदोबस्त करावयास आला, कीं त्या पिशाचास जास्तच राग येत असे ! ! आणि मग तर घरच्या मनुष्यांस नकोनकोसें होई ! ! ! अखेर त्या गृहस्थास कोणी सखारामबोवांकडे जा ह्मणून सांगितलें. त्यावरून तो कवाडास आला. आणि त्यानें सर्व प्रकार बोवांस निवेदन केला. बोवांनीं सर्व हकीकत ऐकून घेऊन त्यास मुठभर अंगारा दिला, आणि हा सर्व घरांत चोहोंकडे फेंका, ह्मणजे सर्व पीडा दूर होईल, ह्मणून सांगितलें ! त्याप्रमाणें तो अंगारा त्यांनीं माहिमास आल्यावर घरांत चोहोंकडे फेंकला, आणि तेव्हांपासून आजपर्यंत त्या घरीं पुन्हा कधींही उपद्रव झाला नाहीं ! मात्र बोवांचे आज्ञेप्रमाणें दरसाल श्रावण महिन्यांत यथाशक्ति ( पांच सात ) ब्राह्मण भोजन घालावें लागतें !

वसईस कोणी एका शूद्र स्त्रीस पिशाच्यबाधा होती. तिचीही ती बाधा बोवांनीं नुसत्या अंगाऱ्यानें घालविली ! ह्या बाईस तीन पिशाचांची बाधा असून, त्यांपैकीं एकानें बोवांचे स्नानाचे शिळेखालीं, व दोघांनीं कुशावर्तांत गति घेतली असें ह्मणतात !

कुळगांवकर[1] मोकाशी[2] ह्यांचा भाऊबंदकीसंबंधाचा ठाण्यास जज्जकोर्टांत एक खटला सुरू होता. ते बोवांचे भाचे होते. व त्यांपैकीं एकानें कांहीं माहितीसंबंधानें बोवांवर साक्ष दिली होती! बोवांची साक्ष कमिशनमार्फत कवाडासच व्हावी, अशाविषयीं मोठ मोठ्या मंडळीनें बरीच खटपट केली. नानासाहेब दप्तरदार व शंकरराव महाजन इत्यादि गृहस्थ त्या मंडळींत असतांही जज्जसाहेबांचे दुराग्रहामुळें ती खटपट व्यर्थ झाली! तरी "हिंदु अवलियास कोर्टांत खेंचीत आणून आपल्या पुढें प्रतिज्ञा देण्याची" जी साहेब बहादुरांची दुष्ट इच्छा होती, (असें ह्मणतात) ती कांहीं अखेर सफल झाली नाहींच! नेमल्या तारखेचे आदले दिवशीं बोवा ठाण्यास (बैलगाडीनें शूद्रादिक स्पर्श न करितां) गेले. इतक्यांत, असा चमत्कार झाला कीं, त्याच दिवशीं जज्जसाहेबांस देखत हुकूम चार्ज सोडून, तावडतोब रत्नागिरीस जाण्याविषयीं हुकूम झाल्यामुळें, नाइलाजास्तव त्यांस तसें करणें जरूर पडलें! दुसरे दिवशीं असिस्टंट जज्जांपुढें तो खटला येतांच, त्यांनीं कागदपत्र पाहून, "बेकायदेशीर," ह्मणून खटलाच काढून टाकिला!!

---

१ कुळगांव ता० कल्याण जि. ठाणें. २ हे कुळगांवचे इनामदार आहेत. यांचें उपनांव जोशी. याच भाऊबंदकीमुळें यांचें अतोनात नुकसान झालें. यांपैकींच रा. रा. केशवराव जोशी, हे ठाण्यास जज्जकोर्टांत वकील होते. हे गुदस्तांच वारले! मागें सांगितलेला कल्याणचा ब्रम्हसंबंधामुळें ओसाड पडलेला वाडा तो यांचाच होय.

**बोवा** ठाण्यास शंकरराव महाजन यांचे बिऱ्हाडीं तीन दिवस होते. ठाण्यास गेले त्या दिवशीं पौष शुद्ध एकादशी होती. द्वादशीस शंकररावांकडे व त्रयोदशीस तारापूरकर **बर्वे** यांचें कुटुंब तेथें आलें होतें ह्मणून त्यांजकडे भिक्षा झाली. या तीन दिवसांत मुंबई व इतर आसपासच्या ठिकाणांहून हजारों लोक मुलांबाळांसह दर्शनास येत होते. मेवामिठाई, फळफळावळ यांचे ढिगांचे ढीग जमले होते. ते सर्व **बोवांनीं** गोरगरिबांस वांटून टाकिले ! १५० रुपयांचा खुर्दा जमला होता ! चौथे दिवशीं **बोवा** कवाडास परत आले. **बोवांस** ठाण्यास जरी जावें लागलें, तरी अखेर ते कोर्टांत गेले नाहींतच ! यावरून केवळ हजारों भाविकांस दर्शनाचा लाभ देण्याकरितांच ते तेथें गेले असावे ! असें अनुमान केल्यास केवळ चुकीचेंच होईल असें नाहीं.

**बोवांजवळ** सुमारें एक वर्षभर एक चिपळूणचा ब्राह्मण येऊन राहिला होता. त्यास १५० रुपयेच कर्ज झालें होतें. यास्तव ठाण्यास जमलेली रक्कम **बोवांनीं** त्या ब्राह्मणास देऊन सांगितलें, भटजी, ही रक्कम घ्या, आणि कर्ज फेडून, व मुलांमाणसांस भेटून, मोहांत न गुंततां सत्वर परत या. भुलाल तर काळ विपरीत आहे ! भटजी ती रक्कम घेऊन घरीं गेले व त्यांनीं आपलें सर्व कर्ज फेडिलें. परंतु आज्ञेप्रमाणें लवकर कवाडास परत आले नाहींत ! इकडे महिन्या दोन महिन्यांचे आंत भटजींची प्रकृति बिघडून त्यांतच त्यांचा काळ झाला ! भटजींची आयुर्मर्यादा लवकरच सरणार, हें

**बोवास** पूर्वीच समजलें असल्यामुळें, त्यांनीं त्यांसलवकर परत बोलाविलें होतें. परंतु भटजींचा पापक्षय होईल, तेव्हांना त्यांस मुक्ति मिळणार ? पापक्षय झाला असता, तर त्यांस मोह पडलाच नसता, व ते खचित मुक्त झाले असते.

**बोवांकडे** नेहमीं जे भाविक दर्शनास येत, त्यांत प्रकारही बरेच असत. कित्येक अध्ययनाकरितां येऊन राहत; कित्येक इच्छित द्रव्य मिळावें ह्मणून; कित्येक ऐहिक सुखप्राप्त्यर्थ **बोवांची** कृपा व्हावी ह्मणून; कित्येक नुसतें भक्तिपूर्वक दर्शनच घेण्याकरितां; आणि कित्येक फक्त परमार्थप्राप्तीचा मार्ग **बोवांस** विचारावा, ह्मणून येत असत. त्यांत परमार्थप्राप्त्यर्थ येणाऱ्यांचीच योग्यता फार मोठी समजली पाहिजे. असे पुष्कळ मुमुक्षुजन **बोवांचे** कृपेनें जन्ममरण संस्कारांतून सुटून मोक्षाप्रत गेले आहेत ! परंतु त्या सर्वांची हकीकत देण्यास आमचे जवळ आज तयारी नाहीं व सवडही नाहीं. तथापि, वाचकांस अगदींच निराशा करणें बरें नाहीं, असें समजून आह्मी पुढें कांहीं मुख्य मुख्य व्यक्तींची हकीकत देण्याचा प्रयत्न केला आहे.

नाशिकास राहणारे सात असामी संन्यासी, **बोवांस** महावाक्याविषयीं कांहीं प्रश्न विचारावे ह्मणून एकदां कवाडास आले होते. **बोवांनीं** एकांतीं त्यांच्या सर्व शंकांचें निरसन करून एकांतवासाविषयीं आज्ञा केली. मुमुक्षुजनांस बहुतकरून एकांतवास, ब्रह्मचिंतन, भूचरीधारणा इत्यादि मार्ग सांगण्याचा **बोवांचा** परिपाठ असे.

गणोबा गोसावी या नांवाचे एक गृहस्थ होते. त्यांस मुमुक्षुत्व उत्पन्न होऊन, ते **बोवांस** अनन्यभावें शरण गेले, **बोवा** त्यांस योगाभ्यासाकरितां नित्य आपणाबरोबर अरण्यांत नेत असत. परंतु कांहीं प्रतिबंधामुळें त्यांचे चित्तास उपरम होईना ! ह्मणून **बोवांनीं** निवांत स्थळाकरितां त्यांस तारापुरास पाठविलें. तेथेंही उपरम होईना, ह्मणून गणोबा श्रीमद्भागवताचें मनन करीत असत. पुढें **बोवा** तारापुरास गेल्यावर, त्यांनीं तो सर्व प्रकार पाहून गणोबांस ह्मटलें, तुमचे अंतःकरणास मोक्षप्राप्तीची इच्छा तीव्र आहे खरी, तरी पूर्व प्राक्तनामुळें उपरमविवेक होत नाहीं ! यास्तव तुह्मीं आतां निष्काम सदाचरणानें काशीवास करावा. ह्मणजे **श्रीशंकर** अनायासें अंतकाळीं मुक्ति देतील ! ह्या आज्ञेप्रमाणें गणोबा **बोवांस** नमस्कार घालून तत्काळ काशीक्षेत्रीं निघून गेले. व सदाचरणानें राहून कृतार्थ झाले !

गणोबांचे बंधु नारायणबोवा ह्मणून होते. त्यांनींही **बोवांचा** अनुग्रह मिळविला होता.

नर्मदातीरीं राहणारा कोणीएक रामभट नांवाचा ब्राह्मण **बोवांची** कीर्ति ऐकून कवाडास आला. त्यानें तप, सदाचरण, एकांतवास ह्यांविषयीं कित्येक युक्ति **बोवांस** विचारून घेतल्या व पूर्ण विरागिता स्वीकारून तो नर्मदातीरीं एकांतवासास निघून गेला.

मागें एकदां शंकरराव महाजन ह्यांचें नांव आल्याचें वाचकांस स्मरत असेलच. हे मुळचे नारायणगांवचे राहणारे.

ह्यांचें गोत्र भारद्वाज. बाळपणापासून ह्यांचें ईश्वरचरणीं फार लक्ष्य असे. पुढें हे एकोणीस वर्षांचे असतां, जन्मांतर संस्कारानें ह्यांची, व ज्ञानेश्वर सांप्रदायी गुंडोजी बोवांचे शिष्य बाळकृष्ण बोवा यांची गांठ पडली. तेव्हां त्यांजपासून शंकररावांनीं पांडुरंगदीक्षा घेतली. त्याच दिवशीं रात्रीं त्यांस स्वप्नांत **पांडुरंग** दर्शन झालें ! ह्यानंतर त्यांची **पांडुरंगाचे** ठायीं सप्रेमता विशेष वाढून सगुणध्यान व भजन ह्यांत प्रहर प्रहर विदेहस्थिती होऊं लागली. तरी त्यांस पूर्ण समाधान होईना ! अशा स्थितींत त्यांस पेण येथें कुळकरण्याचे कामावर नोकरी मिळाली. तेथें शके १७७७(सन१८५५) सालीं वैशाखमासीं त्यांस स्वप्नांत **सखारामबोवांचें** दर्शन झालें ! तेव्हांपासून त्यांस **बोवांचे** प्रत्यक्ष दर्शनाविषयीं अतिशय उत्कंठा लागली. इतक्यांत त्यांस ठाण्यास वेंडरची जागा मिळाली. ठाण्यास आल्यावर तर त्यांस **बोवांचा** पुष्कळच लौकिक समजला. नंतर ते भाद्रपद शुद्ध ४ शके १७७८ (सन१८५६) रोजीं कवाडास **बोवांचे** दर्शनास प्रथम आले. स्वप्नांत पाहिलेली मूर्ती हीच, असें पाहतांच त्यांस अत्यानंद झाला, पुढें प्रति शनिवारीं शंकरराव ठाण्याहून कवाडास येत, व सोमवारीं परत जात. त्यांची सप्रेमता व निष्ठा पाहून **बोवांचें** त्यांजवर फार प्रेम जडलें. पुढें शके १७८१ (सन१८५९) वैशाख शुद्ध द्वादशी पासून **बोवांनीं** निर्विकल्पसमाधानाविषयीं त्यास मार्ग सांगून, त्यांजकडून अभ्यास चालू केला. यांची परमार्थाविषयीं विशेष योग्यता होती.

पेण येथें काशीनाथपंत करमरकर ह्मणून एक गृहस्थ होते. ह्यांचें गोत्र काश्यप यांस मुनसफ कचेरींत नोकरी होती. ह्यांनीं शके १७७४ (सन १८५२) सालीं, रामदासी सांप्रदायी हरिभक्तिपरायण भास्करपंत दामले ह्यांजपासून, रामोपासना घेतली होती. पुढें ह्यांस पूर्वसंचितेंकरून योगवासना उत्पन्न झाली. त्यांनीं बरेच ग्रंथ अवलोकन करून स्वर, ब्रह्मसिद्धांत, आकाशावलोकन, तेजोधारणा यांजवर अभ्यास चालविला. पण गुरुमुखाशिवाय त्यांस खरें मर्म कांहीं कळेना! "सद्गुरूवांचूनि सांपडेना सोय ॥ धरावे ते पाय आधीं त्याचे ॥" ही तुकारामबोवांची उक्ति खोटी आहे, असें कोण ह्मणेल? काशीनाथपंतांनीं बोवांचा लौकिक ऐकला होताच, ह्मणून ते दोन वेळां कवाडास दर्शनासही जाऊन आले. पण बोवांचें अपूर्व तेज पाहून त्यांस मनांतील हेतु बोवांस कळविण्याचें धैर्यच होईना! आणि मनाचें समाधानही होईना. अखेर अतिशय उद्वेग येऊन त्यांनीं पंधरा दिवसांची रजा घेतली व ते शके १७७७ (सन १८५६) मार्गशीर्ष कृष्ण अमावास्या रोजीं कवाडास आले. दोन तीन दिवस रोज दर्शनास जात, पण तेथें गेले ह्मणजे पूर्ववत् स्तब्ध बसत! शेवटीं पौष शुद्ध तृतीयेचे दिवशीं तिसरे प्रहरीं दर्शनास गेले असतां, बोवा एकटेच बसलेले पाहून, काशीनाथ पंतांनीं मोठ्या धैर्यानें, अगदीं सद्गदित होऊन, आजपर्यंतचें सर्व वृत्त आणि मनांतील हेतुही बोवांस निवेदन केलीं. काशीनाथपंत ह्मणाले, आपणांसारख्या जीवन्मुक्तांच्या विभूति मजसारख्या हतभाग्य

व मंदविवेकी जनांस तारण्याकरितांच आहेत. यास्तव येथें चरणांजवळ राहून कांहीं परमार्थ साधन करावें, अशी अत्युत्कट इच्छा आहे. बोवा हंसून ह्मणाले, "परमार्थ कांहीं बाजारांत पैसे टाकून मिळणारा आहे, असें नाहीं. तुमची इच्छा असल्यास येथें पटवर्धनांकडे स्वस्थ रहा आणि काय विचारणें असेल तें विचारा." दुसरे दिवसापासून रोज सुमारें दहा बारा तास बोवांजवळ बसून काशीनाथपंतांनीं लघुबोध, समाधि, विहंगममार्ग, शोडषमहावाक्य, मूलस्तंभ, उत्तरगीता, हठप्रदीपिका, ज्ञानेश्वरकृत समाधिपर अभंग इत्यादि अनेक प्रकरणें समजून घेतलीं, व तेणेंकरून त्यांस समाधान झालेंसें वाटूंही लागलें. परंतु ती सर्व 'पुस्तकी विद्या' होती! असो. इतकें होई तों पौष शुद्ध एकादशी झाली. व दुसरे दिवशीं पारणें करून, काशीनाथपंत बोवांचा निरोप घेऊन पेणेस जावयास निघाले. सुमारें पंचवीस तीस कदमांवर गेले होते सुद्धां! पण बोवांस दया येऊन त्यांनीं त्यांस परत बोलाविलें. तेव्हां काशीनाथपंत परत आले व बोवांजवळ बसले. बोवा त्यांजकडे कृपादृष्टीनें पाहून शक्तिपातपूर्वक ह्मणाले, "तुह्मी पेण सोडून येथें कां बरें आलांत? कारण शरीरासंबंधीं विचार करितां कांहीं भेद दिसत नाहीं; बरें, उपाधींविषयीं ह्मणावें, तर येथें आल्यानें काय विशेष तुह्मांस वाटतो? आणि तुह्मी येथें येऊन काय घेऊन चाललांत?" हे शब्द ऐकतांच, पंतांचे हृदयांत चकचकन उजेड पडला, त्यांचा कंठ सद्गदित झाला, सर्व शरीरास कंप सुटला आणि नेत्रांवाटे

अश्रुधारा वाहूं लागल्या ! ते बोवांस ह्मणाले, सद्गुरुमहाराज, मी अत्यंतापराधी पामर आहें, आपल्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याचें लांबच राहिलें; आपल्या प्रश्नांचा अर्थ सुद्धां मला समजला नाहीं! मी इतका अज्ञानी असून, व्यर्थ 'मी ज्ञानी झालों' असें वाटून भ्रमगर्तेंत बुडत आहें. यांतून उद्धरण्यास आपणाखेरीज कोण समर्थ आहे? मी अनन्यभावें शरण आलों आहें. नंतर **बोवा** ह्मणाले, काशीनाथपंत, आतां ग्रंथदृष्टीचा अभ्यास पुरे करा. कोणाशीं वाद करूं नका. आणि सर्व ज्ञान ज्या सच्चिदानंद-स्वरूपीं वास करितें, त्याजवर दृष्टी द्या; ह्मणजे, मीच तूं; पेणाच कवाड; ब्रह्मच स्थिति; असें अनुभवास येईल. असें ह्मणून **बोवांनीं** पुन्हा एकवार त्यांजकडे दयार्द्र दृष्टीनें अवलोकन करून, व त्यांचे मस्तकीं हस्त ठेवून, त्यांस जाण्यास आज्ञा दिली. त्याबरोबर काशीनाथपंतांचा सर्व संशयावरणविक्षेप दूर होऊन त्यांस ब्रह्मज्ञान झालें! व नंतर ते **बोवांचा** निरोप घेऊन पेणेस गेलें. पुढें शके १७८२(सन १८६०)सालीं, काशीनाथ-पंतांस विषमज्वर येत असतां, विसावे दिवशीं रात्रीं स्वप्नांत **बोवांनीं** त्यांस दर्शन देऊन अंगारा लाविला ! यामुळें दुसरेच दिवशीं काशीनाथपंत ज्वरमुक्त झाले.

माहुलीस *हरिपंत जोशी दुगल म्हणून एक गृहस्थ होते. ह्यांस शके १७६९(१८४७) सालीं श्रावण महिन्यांत एके

---

* यांची संपूर्ण हकीकत आम्हांस माहीत आहे. तथापि, हे प्रकरण फारच लांबत चाललें आहे, ह्मणून ती सर्व न देतां मुख्य मुख्य गोष्टी मात्र येथें लिहिल्या आहेत.

दिवशीं पहांटेस एक मोठें विलक्षण स्वप्न पडलें, तें असें. एक दिगंबर, भस्मोध्दूलन केलेला, त्रिशूळ व रुद्राक्ष धारण केलेला, असा पुरुष येऊन, त्यानें हरिपंतांस उठविलें, व 'गाठोडें बांध' असें म्हणून तेथें असलेल्या चिरगुटांचा एक भला मोठा बोजा बांधिला. नंतर त्यानें हरिपंतांस कौपिन नेसावयास देऊन तो तो बोजा घेऊन जाऊं लागला. तेव्हां हरिपंतांनीं हें काय ? म्हणून विचारितां, आम्हीं जातों, तूं मागून येशील, असें त्यानें उत्तर दिलें व तो दिगंबर पुरुष दिसेनासा झाला. इतक्यांत हरिपंत जागे झाले, व पहातात तों, अगदीं चक्क उजाडलें ! आतां या स्वप्नाचा काय अर्थ असेल तो असो. तरी तेव्हांपासून हरिपंतांस भक्तिमार्गाची अत्यंत गोडी लागली. अनगांवास त्यांची बहिण असल्यामुळें ते तेथें जात तेव्हां कवाडासही दर्शनास जात असत. तरी बोवांचा व त्यांचा विशेष परिचय नव्हता. पुढें शके १७७६ (सन १८५४) सालीं कार्तिक मासीं, हरिपंत अनगांवास जात असतां वाटेंत त्यांची व एका अवधूत पुरुषाची गांठ पडली. एका डबक्यांत पावसाचें पाणी सांचलेलें होतें, व तें नासून त्यांत जीवही झाले होते. तरी हे अवधुत महाराज त्या पाण्याचे गुळणे करीत मोठ्या आनंदानें बसले होते. तें पाहून हरिपंत जवळ जाऊन म्हणाले महाराज, ह्या पाण्यांत गुरें सुद्धां तोंड बुडविणार नाहींत, इतकें हें गलिच्छ आहे. असें असतां, आपण मोठ्या आनंदानें त्यांत विहार करितां हें काय ? त्यावर तो बावा म्हणाला, "उदक तितकें सर्व गंगाजल, आणि जें दिसतें तें

सर्व रामरूप आहे." हरिपंत म्हणाले, महाराज, ही खरी गोष्ट. पण आम्हां अज्ञान्यांस ती समजावी कशी ? आपण कृपा करून समजून सांगाल, तर मी आज कृतार्थ झालों असें समजेन ! तो बावा म्हणाला, काळजी करूं नको. थोडेच दिवसांनीं तुझी माझी गांठ पडेल, तेव्हां तुझी सर्व इच्छा पूर्ण होईल! असें म्हणून तो बावा तेथून चालता झाला, व हरिपंत अनगांवास गेले. पुढें शके १७८१ (सन१८५९) भाद्रपद कृष्ण अमावास्या रोजीं. हरिपंत बोवांचे दर्शनास गेले असतां, येथेंच अनन्यभावें शरण जाऊन परमार्थ साधावा, अशी हरिपंतांची वृत्ति झाली ! हरिपंतांनीं बोवांस आपली सर्व हकीकत, घडलेले दोन्ही चमत्कार व आपला हेतुही निवेदन करून, येथें राहण्याची आज्ञा व्हावी, म्हणून प्रार्थना केली. बोवांनीं त्यांस राहण्यास सांगून रात्रौ प्रसादरूप दोन पेले दूध दिलें व एकांतीं ब्रह्मस्वरूपाविषयीं बोध केला ! नंतर हरिपंत माहुलीस येऊन ब्रह्माभ्यासांत काळ घालवूं लागले. प्रतिवर्षीं भाद्रपद मासीं कवाडास दर्शनास येण्याचा त्यांचा नियम होता. बोवा त्यांस दरसाल अंगावरची उपरणेंजोडी प्रसाद देत असत. शके १७८६ (सन१८६४) सालीं दहा, व शके १७८९ (सन १८६७) सालीं बावन्न रुपये हरिपंतांस देऊन बोवांनीं कर्ज फेडा, म्हणून सांगितलें. हरिपंतांस पुष्कळ कर्ज होतें, तरी सावकारांनीं तितकेच रुपये घेऊन हरिपंतांस कर्ज मुक्त केलें !

अनगांवचे केशवराव गोडबोले यांस संसारांत विरागिता

उत्पन्न झाली. ह्यांची **बोवांचे** ठायीं फार निष्ठा असे. ते **बोवां**पासून शिवदीक्षा व अध्यात्मज्ञान संपादून कृतार्थ झाले !

पुण्याचे बळवंतराव लोखंडे **बोवांस** अनन्यभावें शरण गेले. त्यांनीं बारा वर्षं सहवासास राहून **बोवांची** पूर्ण कृपा संपादिली होती. योगाभ्यासांत तर ते अत्यंत प्रवीण झाले, व गुरुकृपेनें सर्वोपाधींचा त्याग करून निर्विण्ण झाले !

शहापूरचे सदाशिवपंत हे **बोवांचे** ठायीं एकनिष्ठ होऊन पावन झाले ! पुणें येथें राहणारे गोविंद दीक्षित खरे हे परम मुमुक्षुत्वेंकरून **बोवांस** (कपिलाषष्ठीच्या दिवशीं असें ह्मणतात) शरण आले, आणि गुरुकृपा संपादन करून, बारावर्षं त्रिकाल स्नानसंध्या, शिवपूजा, निर्विकल्पसमाधि, योगाभ्यास इत्यादिकांत घालवून पूर्ण तत्वनिष्ठ झाले !

किहीम येथें राहणारे बाबाजीभट अग्निहोत्री, यांणीं **ब्रह्मानंद महाराजां**जवळून योगमार्ग समजावून घेतला होता. परंतु पुढें त्यांस **ब्रह्मानंद महाराजांचें** वियोगामुळें, योगमार्गाचा विसर पडल्यावरून, ते संशयनिवृत्तीस्तव कवाडास **बोवां**कडे आले, व योगमार्ग समजून घेऊन कृतार्थ झाले !

अह्लीबाग प्रांतीं एक कानडा ब्राह्मण राहत असे. तो पांडुरंगोपासक होता. एकदां तो **बोवांचे** दर्शनास आला असतां, त्याची वृत्ति सर्वत्र पांडुरंगमय होऊन गेली ! " मन रामीं रंगलें ॥ अवघें मनचि राम झालें ॥ " अशी वृत्ति झाल्यावर, मग आणखी काय पाहिजे !

द्वारकेकडे राहणारा जानकीदास ह्मणून एक गौड ब्रा-

ह्मण बोवांचे दर्शनास आला होता. त्यानें तुळशीदास, सुर-
दास, मीराबाई यांचीं सुरस पदें ह्मणून ( ब्रीज भाषेंत )
भजनास सुरुवात केली. त्या प्रसंगीं तो ब्राह्मण आणि
बोवा, दोघेही प्रहरभर भजनांत इतके रंगून गेले कीं, त्यांस
देहभानही राहिलें नाहीं ! "ब्रह्मानंदीं टाळी लागल्यावर
देहाला कोण सांभाळी"!
अशा परमानंदांत सुमारें एक प्रहर गेल्यावर भजन समाप्त
झालें. नंतर जानकीदास कृतार्थ होऊन व बोवांचा आशी-
र्वाद घेऊन स्वस्थानीं गेला !

गोविंदराव चांदवडकर ( हे कल्याणास नानासा-
हेब दप्तरदार या नांवानें सुप्रसिद्ध आहेत. ) हे गृहस्थ
स्नानसंध्याशील, सत्ववृत्ति, सदाचारसंपन्न, सूर्योपासक
आहेत. हे ठाणें येथें दप्तरदारीचे हुद्यावर होते. शंकरराव
महाजनांचे सहवासानें बोवांचे ठायीं यांची अत्यंत निष्ठा
जडली. हे नेहमीं बोवांचे दर्शनास येत असत. हल्लीं हे
पेनशन घेऊन कल्याणास राहतात. बोवांचे कृपेनें संतति,
संपत्ति, शारीलबल इत्यादि सर्व कांहीं ह्यांस यथास्थित
आहे. !

रामकृष्ण बोवा माटे ह्यांचें नांव ऐकून सुद्धां ठाऊक
नाहीं, असा मनुष्य महाराष्ट्रांत बहुतकरून सांपडणार नाहीं.
हे भाद्रपद शुद्ध त्रयोदशी शके १७६२ सन(१८४०) रोजीं
जन्मले. ह्यांचे तीर्थरूप सखारामबोवा माटे. आईचें नांव जानकी.
गोत्र शांडिल्य. सहा[illegible]र्षीं ह्यांचें उपनयन झालें. तेव्हां

पासून वडिलांनीं त्यांस वेदाध्ययन, श्रीमद्भागवत, अध्यात्म-रामायण इत्यादिक पठनाची गोडी लाविली, व रामोपासना दिली. ह्यांचे वडील कोंकणांत आंजरलें येथें, भागवताचा सप्ताहसमाप्त करून, शके १७७४ सन (१८५३) पौष कृष्ण तृतीयेस श्रीरामचरणीं लीन झाले! पुढें उपासनागुरु हरभट ह्यांनीं चतुर्थाश्रम घेतला, व दोन वर्षांनीं शके १७७७ (सन १८५६) फाल्गुन कृष्ण अमावास्या रोजीं तेही समाधिस्थ झाले!! ह्यामुळें रामकृष्ण बोवांचें समाधान करण्यास कोणीच नाहींसें झालें. तथापि ह्यांचें मन भक्तिमार्गाकडे विशेष लागून राहिलें असल्यामुळें, शके १७८० ( सन १८५८ ) सालीं, परळीजवळ सज्जनगडावर जाऊन, त्यांनीं श्रीसमर्थ **रामदासस्वामी** ह्यांचे समाधिपुढें, सत्समागमार्थ अठरा दिवस अनुष्ठान केलें. तेथें त्यांस कांहीं दृष्टांत होऊन आश्वासन मिळालें. पुढें, त्यांचे मामा नारायण भट बर्वे ह्यांचे तोंडून त्यांनीं **सखारामबोवांचा** महिमा ऐकल्यापासून, त्यांसच शरण जाऊन कृतार्थ व्हावें, असें रामकृष्णबोवांस वाटूं लागलें. शके १७८२ (सन १८६०) सालीं सिंहस्थ पर्वणीचे निमित्तानें, ते नाशिक व त्र्यंबक येथें जाऊन, परत येते वेळीं कवाडास दर्शनास गेले. त्यावेळीं त्यांचे चुलते त्र्यंबकनाना हेही बरोबर होते, यामुळें त्यांस त्यावेळीं कांहीं अडचणीमुळें तेथें राहतां आलें नाहीं. तथापि दर्शनानेंच त्यांस परमानंद होऊन तेथेंच शरण जाण्याचा त्यांचा निश्चय ठरला. खेरीज त्यांचे चुलते ह्मणाले, **राघवेंद्रस्वामी** समाधिस्थ झाल्यापासून असा

नापै.

सत्पुरुष आजवर पहाण्यांत आला नाहीं ! यामुळें तर तो निश्चय अधिकच दृढ झाला. असो. ह्या खेपेस, ह्मणजे मार्गशीर्ष कृष्ण चतुर्दशी गुरुवारीं, माटे फक्त दर्शनच घेऊन साताऱ्यास परत गेले. नंतर शके १७८४ (सन १८६२) मार्गशीर्ष कृष्ण चतुर्दशीस पुन्हा दर्शनास गेले, व **बोवांस** शरण जाऊन आत्मज्ञान संपादनार्थ तेथें राहिले. नंतर शंकरराव महाजन ह्यांची तेथें भेट होऊन, **बोवांनीं** माट्यांस शंकररावांचे सहवासास कांहीं दिवस राहण्याविषयीं आज्ञा केली, ह्मणून माटे ठाण्यास गेले. तेथें काशीनाथपंत करमरकर यांसही शंकररावांनीं बोलाविलें होतें. त्रिवर्गांनीं वेदांताविषयीं शंकासमाधान करून कांहीं काळ घालविल्यावर, त्रिवर्ग कवाडास आले. तेथें **बोवांनीं** महावाक्यश्रवणाविधि त्रिवर्गांस संप्रदायपूर्वक करविला. पुढें शके १७८६ (सन १८६४) सालीं, **बोवांनीं** माट्यांस, नाशिकास जातांना पायांत घातलेला पादुकांचा जोड प्रसाद दिला रामकृष्णबोवा माटे हे वेदांतांत परम निपुण होते, तसेच हे मोठे ना[illegible]ंकित वक्ते होते. हे वेदांतपर कीर्तन करीत असत. ह्यांची व [illegible] अक्कलकोटचे **स्वामीमहाराजांची** ग्रंथि पडली [illegible]. त्यांनीं ह्यांची वेदांतांत कोठवर गति आहे. हें पा[illegible] करितां, ह्यांची अनेक तऱ्हेनें परीक्षा पाहिली होती. [illegible] त्यांचे खात्रीस उतरले होते ! ह्यावरून ह्यांची किती योग्यता होती, ह्याचें वाचकांस सहज अनुमान होईल. **बोवांचे** मागें त्यांचे समाधीचें व मठाचें काम करण्याचे कामांत [illegible]प्रकारें

ह्यांनींच पुढाकार घेतला होता. ह्यांजवर बोवांची अत्यंत कृपा असे. हे संन्यास घेऊन नागांव ( अष्टागरांत ,) येथें समाधिस्थ झाले.

**चंडीरामबोवांचे** शिष्य रामभटजी ह्मणून फार योग्य गृहस्थ आहेत. ते शके १७८५ त **बोवांचे** दर्शनास येऊन कृतार्थ होऊन गेले ! हे खेडास असतात.

परम वैराग्यसंपन्न असे रामदीक्षित माणके ह्मणून एक गृहस्थ नृसिंहक्षेत्रीं राहत असत. ते पूर्वीं दोन वेळां दर्शनास आले होते. तिसरे वेळीं अनन्यभावें **बोवांस** शरण गेल्यावरून **बोवांनीं** त्यांस नृसिंहदीक्षा देऊन ब्रह्मनिष्ठ केलें ! नंतर ते बार्शीस किंवा पानगांवास कुटुंब व मातुश्री ह्यांसह राहूं लागले.

विष्णुपंत काथवटे ह्मणून कोणी एक वैष्णव वांईस रहात असत. हे फार विद्वान् असून, योगद्वारा ध्यानयोगीं चित्त एकाग्र व्हावें ह्मणून पुष्कळ खटपट करीत असत. पण तें न साधल्यामुळें त्यांस समाधान होईना. ह्मणून ते शके १७८७ (सन १८६५) सालीं कार्तिक मासीं **बोवांस** अनन्य भावें शरण गेले. तीव्र वैराग्येच्छेनें हे आठ आठ दहा दहा दिवस नुसरा कडुलिंबाचा पालाच खाऊन रहात असत. **बोवांनीं** त्यांची सर्व स्थिति पाहून त्यांस ह्मटलें तुह्मी इच्छितां तसा योग या काळांत असाध्य आहे. तथापि ध्यानापुरती एकाग्रता होण्यास हरकत नाहीं. दुसरे दिवशीं स्नान झाल्यावर **बोवा** त्यांस खोलींत घेऊन गेले. आणि आप-

ले पुढें बसवून त्यांस भूचरीमुद्राधारणा देऊन मस्तकीं हस्तस्पर्श केला. त्यावेळीं त्यांस दोन घटिका एकाग्रता होऊन देहभान नाहींसें झालें. मग **बोवांनीं** त्यांस सावध केलें. त्यावेळीं त्यांस परमानंद झाला ! नंतर **बोवा** विष्णुपंतांस ह्मणाले, आतां हा अभ्यास एकांतवास करून वाढवा. व्यर्थ क्लेश करून घेऊं नका, व उपोषणें ही करूं नका. त्या आज्ञेप्रमाणें विष्णुपंत कृष्णा, भीमा, इत्यादि नद्यांचे कांठीं एकांतवास स्वीकारून सुखसंपन्न झाले !

शके १७८७सन१८६५सालीं, पुणें येथील शिवराम शास्त्री रानडे यांची बुद्धि द्वैतविषयश्रवणानें भ्रष्ट झाली. ह्मणून ते **बोवांस** अनन्यभावें शरण गेले. तेव्हां **बोवांनीं** त्यांस ब्रह्मविद्येचा उपदेश करून एका दर्शनानेंच सर्व द्वैतबुद्धीचा नाश केला, व त्यांस श्रीरामत्रयोदशाक्षरीमंत्रदीक्षा देऊन पूर्णाद्वैतनिष्ठ केलें !

पुण्याचे सखारामबापु गोगटे व विष्णुपंत जोशी हे उभयतां गृहस्थ **बोवांजवळून** रामोपासना व ब्रह्मज्ञान संपादून कृतार्थ झाले !

पेणप्रांतीं राहणारा हरभट काळे ह्मणून एक उत्तम वैदिक ब्राह्मण विरक्त होऊन उद्वेगानें इतःस्ततः फिरत असतां, शके १७८७(सन १८६५)सालीं **बोवांस** शरण आला. त्यास **बोवांनीं** अवधूतमंत्रदीक्षा देऊन कृतार्थ केलें !

रत्नागिरीचे हरिपंत फाटक व पुण्याचे आपा गोडसे ह्यांस

परमार्थाविषयीं इच्छा होऊन, ते शके १७८८(सन १८६६)त बोवांस शरण आले. बोवांनीं हरिपंतांस रामत्रयोदशाक्षरी व आप्पांस शिवषडाक्षरी मंत्रदीक्षा देऊन कृतार्थ केलें!

संकर्षणबोवा माटे व कल्याणचे दामोदर बाम ह्या उभयतांस श्रीराम दीक्षा देऊन कृतार्थ केलें! बाम ह्यांजवर बोवांचें फार प्रेम असे.

अनगांवचे गोविंदराव लेले, ह्यांचे वडील लहानपणींच वारले होते. हे बोवांजवळ अभ्यासास होते. त्यांनीं बोवांजवळून शिवदीक्षा व निर्विकल्पसमाधि हीं संपादन केलीं होतीं. बोवांचे कृपेनें ह्यांचें सर्व दारिद्र्य नाहींसें होऊन ह्यांस सर्व ऐहिकसुखें ही मिळालीं. बोवांच्या अत्यंत प्रिय शिष्यत्रयांपैकीं हे एक होते. दुसरे मोरोबा जोशी व तिसरे विष्णुतात्या घांगुरडे हे होत.

मोरोबा जोशी ह्यांजविषयीं मागें एक दोनदां उल्लेख केलाच आहे. वसईकर काशीबाई गोडबोले ह्यांस, कोणी विश्वासू कारकून इस्टेटीची व्यवस्था पाहण्यास पाहिजे होता. त्यांची बोवाचे ठायीं फार निष्ठा असे. त्या एकदां दर्शनास आल्या असतां, त्यांनीं बोवांजवळ ही गोष्ट काढिली त्यावरून मोरोबा जोशी ह्यांस कारकून ठेवण्याविषयीं बाईस सांगितलें. बाईनें ती गोष्ट पतकरली. व मोरोबाही फार विश्वासूपणानें वागले. पुढें बाईनें मोरोबांस बहुतक मिळकत बक्षिस करून दिली. अशा रीतीनें बोवांचे कृपनें मोरोबा सुखी झाले. ह्या बाईनें मोरोबांकडून बोवांचे आज्ञेनें भिव-

डोंचे नदीस धरण बांधविलें. हल्लीं ह्या धरणाचा फार उपयोग होत आहे !

भिवडी येथें एक वैश्यवाणी होता. त्याची **बोवांचे** ठायीं फार निष्ठा असे. तो दारिद्र्यानें फार गांजला होता. त्याचें दारिद्र्य पाहून **बोवांस** फार दया येई **बोवांनीं** एके दिवशीं त्यांस आज्ञा केली कीं, "आजपासून तूं व्यापारांत लबाडी ह्मणून करूं नको; सत्याचरणानें रहा, ह्मणजे तुझें इच्छित सफल होईल." तो वैश्य ह्या आज्ञेप्रमाणें वागत असतां चार पांच वर्षांतच पंचवीस हजारांचा धनी झाला !

कवाडाजवळच एक खेडें आहे. तेथला राघू पाटील ह्या नांवाचा एक शूद्र, **बोवांचे** ठायीं एकनिष्ठपणें वागत असे. **बोवांचे** आज्ञेवरूनच त्यानें मांसाहार वर्ज्य केला होता. नित्य दर्शन घेतल्याखेरीज तो अन्न घेत नसे. त्याजवर **बोवांची** कृपा होतांच, एक वर्षाचे आंतच त्याचें सर्व दारिद्र्य जाऊन तो चांगला सुखी झाला हे पाटिलबुवा हल्लीं बरेच वृद्ध झाले आहेत.

**बोवांचे** दर्शनास येणाऱ्यांत कित्येक संस्थानिक सुद्धां असत ! यास्तव तत्संबंधानें थोडीशी हकीकत लिहून हें प्रकरण समाप्त करूं.

**गायकवाड** सरकारचे माजी दिवाण गणेशपंत ओझे ह्यांची माहिती बहुतकरून सर्वत्रांस आहेच. ह्यांस पनवेल तालुक्यांत तीन गांव ( शिरढोण—प्रसिद्ध **वासुदेव बळवंत फडके** ह्यांचें गांव,—कुशीवली व नांदगांव. ) इनाम असून

पळस्पें, मुंबई व बडोदें येथें ह्यांचे मोठाले वाडे आहेत, व ह्या तीन ठिकाणीं ह्यांचे तीन मुलगे राहत आहेत. असो. गणेशपंत ओझे यांची पत्नी गंगाबाई, ( माहेरचें नांव आवडुबाई, ) ह्यांचें कवाडास खांडेकरांकडे माहेर असल्यामुळें, त्यांस दोन तीनदां साहजिकच **बोवांचें** दर्शन घडलें ! त्यावर पुन्हा एकदां त्या दर्शनास गेल्या असतां, कांहीं तरी परोपकाराचें कृत्य करावें, अशी त्यांस इच्छा होऊन त्यांनीं **बोवांस** "कांहीं तरी आज्ञा व्हावी," ह्मणून प्रार्थना केली. तेव्हां **बोवांचे** आज्ञेवरून तिनें तीन कामें केलीं. **राममंदिराचा** सभामंडप दग्ध झाला होता त्याची दुरुस्ती केली. गांवांत एक विहीर पडली होती ती बांधिली, व तळ्यांतील गाळ काढून त्याची बंदिस्त केली आणि तेथें एक राममंदिर बांधिलें.

**धार** संस्थानाधिपति शके १७८४ ( सन १८६२ सालीं मुंबईस आले असतां, त्यांस कवाडास दर्शनास जाण्याची प्रेरणा झाली. त्यावरून ते सड्या स्वारीनिशीं फाल्गुन शुद्ध द्वादशी रोजीं **बोवांचे** दर्शनास आले होते. राजेसाहेबांस **बोवांचें** दर्शन झालें, तेव्हां **बोवा** खोलींत ध्यानस्थ होते. दर्शन होण्याबरोबर राजेसाहेबांची चित्तवृत्ति तल्लीन होऊन गेली, व घटकाभर तेही परमानंद पावून ध्यानस्थाप्रमाणें **बोवांकडे** पाहत राहिले ! राजेसाहेबांनीं स्वकल्याणाविषयीं **बोवांची** प्रार्थना केल्यावरून, त्यांस "सद्धर्मप्रजापालन, सदाचरण, साधुसंतदेवगोब्राह्मणसेवा हीं भक्ति-

पूर्वक करीत असावीं, ह्मणजे त्यांतच कल्याण आहे," अशी आज्ञा झाली ! नंतर राजेसाहेब ग्रामस्थ ब्राह्मणांस व गोरगरिबांस द्रव्य देऊन व त्यांचा सत्कार करून, **बोवांची** आज्ञा घेऊन परत गेले.

वाचकहो, आतां एकच गोष्ट सांगून हें प्रकरण आटोपतें घेतों. शके १७८९ ( सन १८६९ ) सालीं मार्गशीर्ष कृष्णपक्षांत, वडोद्याचे **गायकवाडसरकार श्रीमंत खंडेराव महाराज**, कवाडास मुद्दाम **बोवांचे** दर्शनास आले होते ! सरकारस्वारी लव्याजम्यासह आली असल्यामुळें, कवाडासारख्या लहानच पण मोठ्या टुमदार गांवास दोन दिवस कशी अप्रातिम शोभा आली असेल, ह्याची कल्पना प्रत्यक्ष दर्शनाशिवाय होणें कठिण. असा आनंदाचा व अशा बहारीचा दिवस कवाडास यामागें कधीं आला नाहींच, व पुढें ही येणें दुरापस्तच ! **श्रीमंतांनीं** पुत्रलाभ व्हावा, ह्मणून बहुत प्रार्थना केली. त्यावर "पुत्रलाभ होईल," असा आशीर्वाद कांहीं मिळाला नाहीं ! "स्वधर्मानें वागून न्यायशुद्ध प्रजापालन केलें ह्मणजे सर्व मनोदय परमेश्वर कृपेनें पूर्ण होतील." असा **श्रीमंतांस** आशीर्वाद
मिळाला ! **श्रीमंतांकडून बोवांस** १२०० रुपये रोख,
तीन शाली व आणखीही कित्येक मूल्यवान पदार्थ देण्यांत
आले. ह्या खेरीज बरोबरच्या मंडळीकडूनही **बोवांस** पुष्क-
ळ द्रव्य मिळालें. **श्रीमंतस्वारी** दोन दिवस राहून, **बोवां-
ची** आज्ञा घेऊन परत गेली. जातेवेळीं, आणखी कांहीं से-

वेविषयीं आज्ञा व्हावी, ह्मणून **श्रीमंतांनीं** प्रार्थना केल्यावरून "तळें बांधा" ह्मणून सांगितलें होतें. परंतु ह्या आज्ञेप्रमाणें **श्रीमंत महाराज खंडेराव गायकवाड** यांजकडून विस्मरणानें घडलें नाहीं ! वर जे १२०० रुपये मिळाले ह्मणून सांगितलें, ते **बोवांस** वडिलांचे वेळचें तेवढेंच कर्ज होतें, तें फेडण्याकडे लाविले. व बाकीचें सर्व द्रव्य शिष्यमंडळीस व गोरगरिबांस वांटून टाकिलें. हें द्रव्य घेऊन कित्येकांनीं लग्नें केलीं, कित्येकांनीं कर्ज फेडिलें, सारांश, हें सर्व द्रव्य सदुपयोगांतच खर्चिलें गेलें !

गुरुवार, एकादशी, पौर्णिमा इत्यादि पर्वणीस तर कवाडास **बोवांचे** दर्शनास यात्राच जमत असे ! हजारों लोक दर्शनास येत, व त्यांच्या इच्छे प्रमाणें ( चांगली असेल तरच, दुष्ट नव्हेहो ! ) त्यांस ऐहिक व पारमार्थिक सुख **महाराज सखारामबोवा** ह्यांचे कृपेनें मिळत असे ! त्या सर्वांचें वर्णन करणें अशक्य होय. ज्या गोष्टी **बोवांच्या** कृपेनें आह्मास अवगत झाल्या, त्या आह्मी यथामति येथवर लिहिल्याच आहेत. आतां पुढील प्रकरणांत **बोवांच्या** समाधिकालाचें वगैरे वर्णन येईल, इतकें मागून हें प्रकरण वाचकांची परवानगी घेऊन येथेंच संपवितों

# प्रकरण सातवें.

जातस्यहि ध्रुवो मृत्युः ।

भगवद्गीता २–२७.

मागील प्रकरणाचे शेवटीं सांगितल्याप्रमाणें, शके १७८९ (सन १८६७) सालापर्यंत हजारों भाविकांस **बोवांनीं** कृतार्थ केलें! परंतु 'मरणं प्रकृतिः शरीरिणाम्' या नियमाप्रमाणें **बोवांसही** या जडदेहाचा केव्हांतरी त्याग करणेंच होता; तो समय जवळ आला! शके १७८९ सालीं वैशाखमासीं **बोवांचे** शिष्यवर्गानें **महाभारताचा** ग्रंथ त्यांस अर्पण केला. तो ग्रंथ **बोवा** वाचूं लागून सुमारें पंधरा दिवस झाले असतील किंवा नसतील, तोंच **बोवांची** प्रकृति फार बिघडली. वायुस्तंभ होऊन कफवाताचा विकार उत्पन्न झाल्यामुळें हिंडणें फिरणें सुद्धां बंद झालें! शिष्यमंडळीनें औषध घेण्याविषयीं विनंती करीत असावें, पण **बोवांचा** एकच नियम. "औषध घ्यावयाचें नाहीं." हा विकार पांच सहा महिने होता. केव्हां कमी होई, फिरून पूर्वपदावर येई, असा प्रकार चालतां चालतां, भाद्रपद शुद्ध द्वादशीस विकार फारच वाढला व सर्व व्यवसाय बंद पडले. विद्यार्थ्यांनीं विनंती केल्यावरून **बोवांनीं** आपले वडील बंधूंचे चिरंजीव वासुदेव शास्त्री केतकर पुण्यास असत, त्यांस आणण्याविषयीं आज्ञा दिली. त्याप्रमाणें मंडळीनें त्यांस दोन दिवसांनीं आणविलें. **बोवांची** प्रकृति फार अस्वस्थ अ-

सल्याचें समजतांच, हरिभाऊ दुगल, शंकरराव महाजन, नानासाहेब दप्तरदार वगैरे मंडळी कवाडास आली. ह्या मंडळीनें पुन्हा औषधोपचार करण्याविषयीं प्रार्थना केली. तेव्हां बोवांनीं मंडळीस 'इच्छेप्रमाणें करा,' अशी आज्ञा दिली. तेव्हां मंडळीनें मुंबईहून एक वैद्य आणविला, त्यानें विजेच्या नळ्या लावून वातविकार दूर केला. नंतर हरिभाऊ दुगल यांनीं सामान्य उपचार चालविले होते, तथापि एकंदरींत प्रकृतिमान पूर्वींप्रमाणेंच होतें. ह्मणून मंडळीनें चतुर्थाश्रम स्वीकारण्याविषयीं प्रार्थना केली. तेव्हां बोवा ह्मणाले, "तुमची इच्छा वेळ आली ह्मणजे पूर्ण होईल." भाद्रपद वद्य ५ पासून प्रकृति सुधारली असें वाटूं लागलें, व दुसरे दिवशीं तर प्रकृतीस पुष्कळच आराम पडला. वद्य ६ रोजीं पूर्वी प्रकृति बिघडल्याचीं पत्रें गेल्यावरून, दामोदर बाम, शिवराम शास्त्री रानडे, शंकरराव माटे व रामकृष्ण बोवा माटे वगैरे मंडळी आली. त्या सर्वांस, प्रकृतीस आराम पडलेला पाहून आनंद झाला ! पण काय ? तो आनंद कायमचा का होता ? छेः ! पुरते आठ दहा तास सुद्धां लोटले नाहींत, तो सर्वच प्रकार उलट झाला ! वद्य ६ रोजीं मध्यरात्रीनंतर, बोवांजवळ दामोदर बाम बसला असतां, त्यास बोवा हालवून कांहीं ह्मणाले. परंतु तें बरेंच अस्पष्ट असल्यामुळें त्यास कांहींच समजलें नाहीं. ह्मणून त्यानें कुशाभाऊभट यांस हाक मारिली. ते येऊन पहातात, तों प्रकृतींत चलबिचल दिसली ! ह्मणून त्यांनीं प्रार्थना केली

कीं, चतुर्थाश्रमाविषयीं पूर्वी प्रार्थना केली असतां, 'वेळ आली ह्मणजे इच्छेप्रमाणें होईल' अशी आज्ञा झाली होती, यास्तव आतां आज्ञा होईल तर तयारी करितों. तेव्हां **बोवांनीं** 'हूं' ह्मणून तयारी करण्यास सांगितलें. नंतर सर्व मंडळी जवळ आली. **बोवांनीं** स्वतां **'अतुरसंन्याससंकल्प'** केला, व रामकृष्णशास्त्री माटे यांजकडून सर्व शास्त्रप्रणित प्रैश उच्चारवून व आपण स्वतां उच्चारून शिखासूत्रांस विसर्जनार्थ स्पर्श केला. मग वासुदेव शास्त्री केतकर यांनीं आश्रमोत्तर पूजा केली. सर्व ग्रामस्थांस प्रसाद व दक्षिणा वांटिली. **बोवांस** सर्वांनीं साष्टांग नमस्कार घातले व **बोवांनीं** सर्वांस हस्तस्पर्श करून आशीर्वाद आणि अंगारा दिला. नंतर शंकरराव महाजनांनीं, आश्रमाचें नांव **"चिद्घन"** असावें, अशी विनंती केल्यावरून, "बरें" ह्मणून **बोवांनीं** तें नांव स्वीकारिलें ! ह्याच वेळीं विष्णु तात्या घांगुरडे यांची प्रकृति फार बिघडली होती, ह्यास्तव ग्रामस्थांनीं त्यांस **बोवांचे** चरणांवर घालून, आपले मागें आह्मांस एवढा आधार असावा, ह्मणून प्रार्थना केली. तेव्हां **बोवांनीं** त्यांजकडे कृपावलोकन करून व त्यांचे मस्तकीं वरदहस्त ठेवून 'तुमची इच्छा पूर्ण होईल' असा आशीर्वाद दिला. त्याचप्रमाणें गोविंदराव लेले ह्यांसही आशीर्वाद मिळाला. पहांट होत आली; दादा जोग, रामभाऊ पेटे, केसू आपा गोडबोले, गोविंदराव लेले इत्यादि बहुतेक मंडळी स्नानें करून आली. समाधिस्थान कोठें करावयाचें ? ह्मणून मंडळीनें प्रश्न केला

असतां, 'स्नानाचे शिळेजवळ करावी,' अशी आज्ञा झाली. सुमारें एक घटिका रात्र अवशिष्ट राहतांच, **बोवा** खाडकन् उठून बसले राहिले, ( हा वेळ पर्यंत **बोवांस** उठवत नव्हतें. ) व स्वस्तिकासन करून, गोविंदराव लेले यांचे अंगावर मान सांवरून धरून त्यांनीं नासाग्र दृष्टि लाविली, आणि दोन्ही हात दोहों मांड्यांवर ठेवून श्वास उपरम करूं लागले ! हा प्रकार पाहतांच त्यांस मंडळीनें तसेंच उचलून समाधीचे जागीं नेऊन आसनावर उत्तराभिमुख बसविलें ! ! इतक्यांत **बोवांनीं** लोकदृष्टच्या प्रतीतीचा उपसंहार करून **अखंड** व **अक्षय्य** समाधि लाविली ! ! ! त्या बरोबर सर्वत्र शिष्यमंडळीनें व ग्रामस्थ आबालवृद्ध मंडळीनें उच्चस्वरें जयजयकार केला ! झालें, वाचकहो, आमचे **चरित्रनायक श्रीमत्परमहंस चिद्घनस्वामी महाराज सखारामबोवा** यांचें हें **परम पवित्र चरित्र** येथें संपलें !

असो. नंतर सर्व मंडळींनीं मिळून वासुदेवशास्त्री यांजकडून समाधिप्रसंगीं पूजामहाभिषेकादि करवून पुढील विधि मोठ्या समारंभानें पूर्ण केला.

**बोवांस** आसनावर ठेविल्यानंतर, पूर्वीचे पादुकांचे जोडांस चरणस्पर्श करविला होता, त्यांपैकीं एकाची, **बोवा** ज्या ओटीवरच्या ( वांगुरडे यांचेवरीं ) खोलींत बसत असत, त्या खोलींत स्थापना केली आहे. हरिभाऊ दुगल, गोविंदराव लेले, काशिनाथपंत करमरकर व शंकरराव महाजन ह्यांस एकेक जोड दिला. रामकृष्णबोवा माटे यांस **बोवांनीं** पूर्वींच

जोड दिला होता. उपरणीं व कौपिनादिक वस्त्रें हीं इतर भाविकांस दिलीं. ही सर्व व्यवस्था विष्णुतात्या घांगुरडे यांनीं केली.

**बोवांचे** समाधीचें देऊळ व पुढील सभामंडप हीं कामें **बोवांचे** प्रियशिष्य **रामकृष्ण बोवा माटे** यांनीं व इतर शिष्य मंडळीनें फार श्रम करून व वर्गणी गोळा करून मोठीं उत्कृष्ट करविलीं आहेत. मुख्य गाभाऱ्यांत **लक्ष्मीकेशवाच्या** सुंदर मूर्ती स्थापन केल्या असून त्यांचे पुढें **बोवांची** समाधि आहे. **माटेबोवांनीं** बरीच जमिन विकत घेऊन देवस्थानाचा खर्च यथास्थित चालावा अशी व्यवस्था करून ठेविली आहे. तिची सर्व व्यवस्था सांप्रत नानासाहेब चांदवडकर यांजकडेस आहे **बोवांची** पुण्यातिथी भाद्रपदकृष्ण सप्तमीरोजीं असल्यामुळें, भाविक मंडळीस पावसाळ्यामुळें येण्यास अडचण पडते. ह्मणून, एकदां पुण्यतिथीस, व एकदां दत्तजयंतीचे निमित्तानें मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमारोजीं, असा वर्षांतून दोनदां मोठा उत्सव होत असतो. हे दोन्हा उत्साह मोठे प्रेक्षणीय होत असतात. मार्गशीर्षांत '**बोवांचे यात्रेस**' हजारों लोक जातात, व मोठा बाजार भरतो. सदरहु यात्रेचें वर्णन येथें केल्यास फार विस्तार होईल, यास्तव तसें न करितां, **बोवांची**, त्यांचे सच्छिष्यांची, तशीच आमच्या प्रिय वाचकांची, प्रस्तुत चरित्रलेखांत जे कांहीं दोष घडले असतील त्यां बद्दल, सविनय क्षमा मागून, लेखणी खालीं ठेवितों.

**समाप्त.**

## परिशिष्ट पहिलें.

# श्रीसमर्थ रघुनाथ भटजी
## यांचें संक्षिप्त चरित्र.

जो ब्रह्मज्ञान उपदेशी ॥ अज्ञान अंधार निरशी ॥
जीवात्मया शिवात्मयाशी ॥ ऐक्यता करी ॥
विघडे देव आणि भक्त ॥ जीवशिवपणें द्वैत ॥
तयां देवभक्तां एकांत ॥ करी तो सद्गुरु ॥

रामदास–दासबोध.

ब्रह्माहूनि अधिकत्व गुरूसी आलें ॥ ब्रह्मासि ब्रह्मत्व ज्याचेनि बोलें ॥ यालागिं भजन पाहिलें ॥ सायुज्य माथा ॥

एकनाथ–स्वात्मसुख.

प्राणिमात्रांत मनुष्य श्रेष्ठ होय. कारण जगत्कर्त्याचें स्वरूप ओळखून तद्रूप होण्याची शक्ति ही फक्त मनुष्यांतच आहे. " पशुदेहीं नाहीं गती ॥ ऐसें सर्वत्र बोलती ॥ ह्मणोनि नरदेहींच प्राप्ती ॥ परलोकाची ॥ " ही **समर्थांची** उक्तीच वरील ह्मणण्याची साक्ष देत आहे. आणि खरेंच, " परमेश्वरानें इतर प्राण्यांहून जो कांहीं विशेष मनुष्यांमध्यें ठेविला आहे, तो कांहीं मनुष्यानें आहारनिद्रादि व्यवसाय

करावे, झणून ठेविलेला नाहीं. तर, त्यानें ज्ञान–ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेऊन मोक्षप्राप्ति करावी, इतक्याकरितांच ठेविला आहे. ह्या परमेश्वराचे उद्देशानुरूप जे वागतात, तेच खरे धन्य होत ! त्यांतही, जे स्वतां मोक्ष मिळवून इतरांसही मोक्षमार्ग सुलभ करून देतात, असे जे जीवशिवांचें ऐक्य करणारे सद्गुरु, त्यांची योग्यता तर, एकनाथ झणतात, ब्रह्माहूनही जास्त होय ! ! अशा सद्गुरूंपैकींच **श्रीसमर्थ रघुनाथ भटजी** हे एक आहेत ! ! ! त्यांचें थोडेंसें चरित्र येथें देतों.

**रघुनाथभटजी** हे जातीचे कऱ्हाडे ब्राह्मण होते. ह्यांचें उपनांव मोवे. वेदाध्ययनाकरितां हे नाशिकास आले. हे प्रथम फडके यांचे घरीं राहिले होते. अगदीं लहानपणापासून हे मोठे भाविक असून ह्यांस एकांतीं बसून विचार करण्याचा सहज संस्कार असे. त्याचप्रमाणें ह्यांना क्षेत्रें पाहण्याची मोठी आवड असे. एकदां हे सप्तशृंगास गेले असतां, तेथें ह्यांचे अंतःकरणाची अपूर्व योग्यता होऊन त्यांस **श्रीदत्तात्रेयांनीं** साक्षाद्दर्शन दिलें ! व त्यांचे मस्तकीं हस्त ठेवून अवधूतदीक्षा, मंत्रयोग, लययोग, हठयोग, राजयोग भक्ति, तप, वैराग्य, सहजस्थिति, हीं पूर्ण बोधित केलीं. नंतर " तूं आतां जगदुद्धार कर; तुझ्या कृपाकटाक्षानें बहुत प्राणी कृतार्थ होतील, " असा आशीर्वाद देऊन **श्रीस्वामीदत्तात्रेय** अंतर्धान पावले !

**रघुनाथभटजींची** वेदाध्ययनाची जागा माडीवर अगदीं एकीकडे एक तीन वहिवाटीची खोली होती तेथें असे.

त्याच खोलींत हे सप्तशृंगाहून आल्यापासून योगाभ्यास करीत असत. मधून मधून सप्तशृंगासही जात. तेथें गेले असतां, बाजरीच्या लाह्यांच्या पायली दोन पायली पिठावर, दोन अडीच महिने काढीत! घरचे यजमानाची आई वाटेकरितां ह्मणून हें पीठ देत असे. व हे तर त्याजवरच दोन अडीच महिने राहत असत!

**रघुनाथभटजी** नाशिकास फडके यांचे घरीं पांच वर्षे होते. ह्यांचा नित्यक्रम ह्मटला ह्मणजे, त्रिकालसंध्या, एक प्रहर निर्विकल्पसमाधीचा अभ्यास, आणि मग राहिल्या वेळांत वेदाध्ययन असा असे. यांचा स्वर फार मधुर होता, परंतु ह्यांस मत्सरानें कोणी शेंदूर चातल्यामुळें स्वरभंग झाला! ह्यांस फडके यांचे घरून निघण्यास मोठें चमत्कारिक कारण घडलें, तें असें.

**भटजी** योगाभ्यास करीत असतात, अशी कुणकुण यजमानांस समजल्यावरून एके दिवशीं ते सहज माडीवर भटजींचे खोलीशीं गेले. दरवाजा बंद होता, ह्मणून फटींतून पाहूं लागले. तों **भटजी** स्वस्तिकासनीं समाधि लावून बसले आहेत, व त्यांचें आसन जमिनीपासून वीतभर अंतरावर अधांतरीं आहे! असें दृष्टीस पडलें. तसेंच त्यांचें तेज इतकें अपूर्व होतें कीं, पाहतांच डोळे दिपत होते! हा सर्व प्रकार पाहून यजमानाची चित्तवृत्ति बावरल्यासारखी झाली. कंठ सद्गदित झाला, अंगावर रोमांच उठले, व नेत्रांत अश्रू येऊन त्यांच्यानें तेथें उभेंच राहवेना! ह्मणून त्यांनीं बाहे-

रूनच त्यांस पांच साष्टांग नमस्कार घातले, व आपणास ह्यांची योग्यता माहीत नसल्यामुळें, आपण ह्यांचा योग्य मान राखिला नाहीं, ह्मणून त्यांस फार पश्चात्ताप होऊन ते तसेच खालीं आले !

मध्यान्हकालीं समाधि विसर्जन करून **भटजी** नित्याप्रमाणें भोजनास खालीं आले. त्यांचें पान पंक्तींत अगदीं खालीं असे. तेथें ते नित्याप्रमाणें जाऊन बसूं लागले, तों यजमानांनीं त्यांस हात धरून आपल्या पानावर बसविलें, व आपण त्यांचे पानावर बसले. ह्या गोष्टीचें कारण यजमान व **भटजी** ह्यांवांचून इतर कोणासच ठाऊक नव्हतें. ह्मणून सर्व मंडळीस मोठा चमत्कार वाटला ! **भटजी** अंतर्ज्ञानानें सर्व जाणतच होते; तथापि तेही त्यावेळीं कांहींच बोलले नाहींत !

भोजन झाल्यावर **भटजी** आचमनाकरितां ह्मणून जे गंगेवर गेले, ते आचमन करून एका शिवालयांत जाऊन बसले. इकडे **भटजींस** जाऊन बराच वेळ झाला, तरी ते परत येत नाहींत, ह्मणून यजमान लागलेच शोध करीत तेथें आले. व **भटजींचे** पाय धरून परत घरीं येण्याविषयीं त्यांनीं पुष्कळ प्रार्थना केली. तरी **भटजी** परत येतना. ते ह्मणाले, मी कोठेंही असलों तरी सारखाच, आश्रय आपलाच आहे. तथापि, आतां येथेंच राहणें बरें वाटतें. तेव्हां यजमानाचा निरुपाय झाला. तथापि ते **भटजींची** योग्यता आतां पुरी जाणत असल्यामुळें, त्यांनीं त्यांची चांगली व्य-

वस्था केली. त्यांनीं **भटजींस** एक सुंदर दुमजला मठ बांधून दिला, व नित्य मधुकरी पोंचविल्याखेरीज ते अन्न घेत नसत. त्याचप्रमाणें त्यांची वृद्ध मातुश्री नित्य एका गाईची धार काढून, तें दुध तापवून स्वतां "**रघुनाथास**" नेऊन देत असे. मातुश्रींचे आग्रहास्तव **भटजींस** तें दुध घ्यावेंच लागे. पण जर एखादे दिवशीं **भटजींनीं** तें आपण न घेतां दुसऱ्यास दिलें, तर तें मातुश्रींस लागलेंच कळत असे! ज्या दिवशीं भटजी दुध घेत नसत, त्याचे दुसरे दिवशीं गाईनें लाथ मारलीच ह्मणून समजावी ! भक्तीचा महिमा ! !

ह्यावेळीं पेंढाऱ्यांचा फार उपद्रव असे, ह्मणून बंदोबस्ताकरितां गंगेवर दोन मुसलमान हत्यारबंद शिपाई असत. एके दिवशीं पहांटेस **भटजी** परतीरास जातांना शिपायांस दिसले नाहींत. येते वेळीं रीतिप्रमाणें "कौन है" असा शिपायांनीं **भटजींस** प्रश्न केला. पण हे शौचाहून आले असल्यामुळें, हातपाय धुतल्या खेरीज ह्यांस बोलावयाचें नव्हतें. शिपायांनीं तीन वेळ विचारून जवाब येईना, ह्मणून लागलेच चार पांच पट्याचे वार केले ! तथापि त्यांपासून **भटजींस** कांहींच झालें नाहीं, किंवा रक्ताचा एक बिंदुही गळला नाहीं ! ! ते आपले स्वस्थपणें अलीकडे आले, व हात पाय धुवून व स्नान करून मठांत गेले. इतके सडकून वार केले असतांही, ह्यास कांहींच होत नाहीं, हें पाहून शिपाई फार घाबरले. हा जातो कोठें ? तें पाहावें, ह्मणून ते त्यांच्या मागून मठापर्यंत आले. व पुढें सात आठ दिवस ते मुदाम

**भटजींच्या** जाण्यायेण्याच्या वाटेवर त्यांस नीटपणें पहावें ह्मणून दबून बसत असत. परंतु चमत्कार असा झाला कीं, त्यांचा हेतु नसतांही अनेकवार दर्शन घडून त्यांचीं सर्व पातकें नाश पावलीं. व तेणेंकरून त्यांची पहिली भिती आणि दुष्ट भावना जागचे जागींच जिरून जाऊन त्यांस **भटजीं**विषयीं अत्यंत पूज्यबुद्धि उत्पन्न झाली ! पुढें तर त्यांनीं नोकरीही सोडिली व "आमचा अल्ला तो हाच" अशी दृढभावना होऊन ते दोघे मुसलमान शिपाई **भटजींस** अनन्यभावें शरण गेले ! तेव्हां त्यांस **भटजींनीं** सन्मार्गास लावून कृतार्थ केलें ! !

**रघुनाथ भटजी** हे कांहीं मोठे उत्तम वैदिक किंवा काव्यव्युत्पन्न अशांपैकीं नव्हते. तरी त्यांस अत्यंत थोर विद्वानही भारी मान देत असत. हें पाहून एक ब्राह्मण त्यांचा फार मत्सर करी. तो ब्राह्मण चांगला विद्वान् असून मोठा गर्विष्ठ असे. ह्यांस कांहीं तरी प्रश्न विचारून ह्यांची अप्रतिष्ठा करावी ह्या उद्देशानें तो सात आठ दिवस नित्य **भटजींचे** मठांत येत असे. पण तो मठांत आला कीं, त्यास कांहीं सुचेनासेंच होई ! तथापि त्यानें यत्न सोडिला नाहीं. ह्याप्रमाणें आठ दहा दिवस झाल्यावर **भटजीच** त्यास ह्मणाले, महाराज, आपण थोर विद्वान् गृहस्थ असून नित्य आह्मांस दर्शन देतां, यास्तव आह्मांस फार आनंद होतो ! आपणांस कांहीं अपेक्षा असल्यास आज्ञा करावी, अनुकूल झाल्यास यथाशक्ति सेवा करीन. हे **भटजींचे** शब्द

ऐकतांच ब्राह्मणाचा गर्व परिहार होऊन त्याची छळक बु-द्धीही जागचे जागींच विरून गेली ! व तो कंठ भरून ये-ऊन ह्मणाला, सद्गुरुराज, आपणांस छळावें, ह्या दुष्ट हेतू-स्तव मी येथें रोज येत असतों ! पण आपल्या नुसत्या द-र्शनानेंच तो हेतु समूळ नाश पावला. आतां या मंदभाग्याची एवढीच प्रार्थना आहे कीं, मला कृतार्थ करून आपल्या पूर्ण ब्रम्हानंद सुखाचा भागीदार करावा. मी अनन्यभावें शरण आलों आहे. नंतर **भटजींनीं** त्यास सद्बोध करून परमार्थ मार्गास लाविलें !

बापुमोघे यांस **भटजींनीं** पत्नींसह योगमार्गास लावून कृतार्थ केलें ! पुढें हीं उभयतां उज्जनी येथें जाऊन राहिलीं.

निरंजनबावा हे **भटजींचे** कृपेनें ज्ञानयोगनिष्ठ होऊन अबूचे पहाडावर योगाभ्यास करीत असतां, त्यांस **श्रीदत्ता-त्रेयांचें** साक्षात् दर्शन घडलें ! पुढें हे मिरजेस राहत असत.

अच्युतरावजी मोडक हे अलंकारशास्त्रांत अत्यंत प्रवीण होते. यांनीं शृंगारादि नवरस शांतिपर लावून अलंकार ग्रंथांवर वेदांतपर टीका केल्या आहेत असें ह्मणतात ! हे सर्वसंगपरित्याग करून व **सद्गुरू रघुनाथ भटजी** यांचे चरणीं एकनिष्ठ होऊन, पंचवटींत श्रीकपालेश्वरीं राहत असत.

नारायणबावा ह्या नांवाचे कोणी एक गृहस्थ **भटजीं-कडे** योगाभ्यासाचे इच्छेनें आले होते. ते योगाविषयीं परमाधिकारी असल्यामुळें **भटजींनीं** त्यांजकडून दोन म-हिन्यांत संपूर्ण योग साध्य करविला ! तो असा कीं, त्यांनीं

मराठी ... ग्रंथालय, ठाणे.

नऊ दिवसपर्यंत अखंड समाधिवास केला!! ह्यावरून तर **भटजींची** हठयोगाविषयीं फारच प्रसिद्धी झाली.

मौनीस्वामी हे गृहस्थाश्रमी असतां, **भटजींस** अनन्य-भावें शरण गेले. ह्यांनीं **भटजींपासून** उपनिषद्रहस्य समजून घेतलें होतें. यांनीं कांहीं दिवस उभें राहून, कांहीं दिवस मौन स्वीकारून, या प्रमाणें अनेक साधनांनीं तपश्चर्या केली. व नंतर चतुर्थाश्रम घेऊन ते मुंबईस राहिले.

नरसिंगपुरकरांचे चिरंजीव वासुदेव भाऊ महाराज ह्यांचे चित्तास परमार्थाविषयीं फार उद्वेग उत्पन्न होऊन ते नाशिकास **भटजींकडे** आले, व त्यांस शरण जाऊन कृतार्थ झाले! माझे हातून कांहीं तरी सेवा घडावी, अशी भाऊंनीं फार इच्छा दर्शविली. तेव्हां फडके यांचा काळ फार प्रतिकूल येऊन त्यांचें घर बेंरच खालावलें होतें. ह्मणून **भटजींनीं** त्यांस, फडके यांस १०० रुपयांची नेमणूक करून देण्याविषयीं सांगितलें. त्यावरून ती नेमणूक चालू झाली.

प्रसिद्ध साधु **सखारामबोवा** व त्यांचे बंधु **पांडोबा** हे **रघुनाथ भटजींचेच** शिष्य होत. ह्यांविषयींची हकीकत त्यांचे चरित्रांत दिलेली आहेच.

**रघुनाथ भटजींचे** पुतण्ये केशवभटजी ह्मणून होते. त्यांनीं **भटजींची** एकनिष्ठपणें सेवा केली. हे कर्म, ज्ञान, उपासना, विवेक यांहीं संपन्न होऊन, **भटजींचे** मागें मठांत राहत असत.

**श्रीरघुनाथभटजी** यांनीं हजारों लोक सन्मार्गास लावून

कृतार्थ केले अहित. त्यांपैकीं कांहींची माहिती वर दिली आहे.

**भटजींनीं** शके १७४२ माघ शुद्ध पौर्णिमा रोजीं कृष्णेंद्रस्वामी यांजपासून संन्यादीक्षा घेऊन चतुर्थाश्रमाचा स्वीकार केला, व भिक्षा घेऊन माघ कृष्ण चतुर्दशी रोजीं सकाळीं प्रहर दिवसास त्यांहीं देह ठेविला ! त्या वेळीं ह्यांचें वय ७६ वर्षांचें होतें. **भटजी** ज्या मठांत राहत असत त्याच्याच जवळ त्यांची सुंदर समाधि बांविली आहे. व मठांत हल्लीं संस्कृतपाठशाला आहे.

======

## परिशिष्ट दुसरें.

—:*:—

# पांडोबा केतकर यांचें संक्षिप्त चरित्र.

——:०*०:——

**योगयुक्तो विशुद्धात्मा विजितात्मा जितेंद्रियः**
**सर्वभूतात्मभूतात्मा कुर्वन्नपि न लिप्यते***

भगवद्गीता. ५–७.

एका प्राकृत कवीनें ह्मटलें आहे, 'प्रपंच साधुनि परमार्थाचा लाभ ज्याणें केला, तो भला भला'. खरें आहे, पर-

* शुचि—बुद्धि कर्म—योगें मन—इंद्रिय—संघ जिंकिला ज्याणें ॥
करितांहि अलिप्ताचि तो कीं झाला देह जीव—भूतात्मा ॥

मोरोपंत–भगवद्गीता. ५–७.

मार्थ साधण्यास सर्वसंगपरित्याग करून रानावनांतच हिंडलें पाहिजे, असें कांहीं नाहीं. प्रपचांत राहूनही परमार्थ साधन करितां येतें. नाहीं असें नाहीं. आपल्या महाराष्ट्राच्या अगदीं अलीकडच्या इतिहासाकडे सहज नजर फेंकली, तरी सुद्धां ही गोष्ट सहज लक्षांत येणार आहे. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम हे कांहीं सर्व संग त्याग करून खचीत गेले नव्हते ! एकनाथ, तुकाराम, हे तर कुटुंबवत्सलही होते. नुकतेच होऊन गेलेले यशवंतराव महाराज उर्फ देवमामलेदार, हे सुद्धां प्रपंचांत राहूनच परमार्थ साधन करीत होते. सारांश, प्रपंचांत राहणें अयोग्य आहे, असें नाहीं. मात्र प्रपंचांत राहून परमार्थही साधिला पाहिजे. तरच त्यानें जन्मास आल्याचें सार्थक्य केलें, असें समजावयाचें. आणि अशा जन्म· सार्थक्य करणाऱ्या धन्य पुरुषांतच प्रस्तुत चरित्रनायक **पांडोबा केतकर** ह्यांची गणना आहे. त्यांचें थोडेंसें चरित्र पुढें देतों.

**पांडोबा** हे **सखाराम बोवांचे** वडील बंधु. हे **बोवांपे**-क्षां सुमारें तेरा वर्षांनीं मोठे होते. ह्मणजे हे शके १७१० त जन्मले असावे. **बोवांचे** चरित्रांत ह्यांचे संबंधाची बरीच माहिती आलेली असल्यामुळें ती येथें पुन्हा देण्याची अवश्यकता नाहीं. **बोवांप्रमाणें** ह्यांचीही लहानपणापासून भक्तिवै-राग्याकडेस विशेष प्रवृत्ति असे. हे पहिल्यापासून मोठे धर्मनिष्ठ आणि कर्मठ होते. ह्यांचें लग्न लहानपणींच झालें होतें. पुढें कांहीं तरी निर्वाहाची सोय पहावी ह्मणून हे प्रथम ता-

रापुरास बर्व्यांकडे आले. तेथें त्यांस जकातीचे मक्तेदाराकडे लहानशी नोकरी मिळाली. हें काम बातांबेतांचेंच असल्यामुळें, त्यांचे स्नानसंध्येस व्यत्यय येत नसे.

पुढें एके दिवशीं यजमानास कांहीं जरूरीचें काम लागल्यावरून, त्यानें **पांडोबांस** बोलावण्याकरितां शिपाई पाठविला. त्यावेळीं, **पांडोबा** नुकतेच स्नान करून येऊन संध्येस बसण्याचे विचारांत होते. ह्मणून त्यांनीं "स्नानसंध्या आटोपून येतों," असा निरोप पाठविला. तथापि, यजमानास विशेष जरूर असल्यामुळें त्याजकडून "आतांच या," असा दुसरा निरोप आला ! हा निरोप येतांच, **पांडोबांनीं** स्नानसंध्या तशीच टाकिली, आणि अगोदर यजमानाकडे गेले ! काय करशील ? **रौप्यशृंखलाबद्ध** होतेना ? "सेवाधर्मः परमगहनो योगिनामप्यगम्यः" हें ह्मणणें येथें किती तरी उत्कृष्ट लागू पडतें ! ज्या **पांडोबांनीं** पुढें "योग" सुद्धां साध्य केला, त्यांस हा परमदुर्धर "सेवाधर्म" कांहीं साध्य करवला नाहीं ! ! तथापि, हल्लींच्या 'खाविंदचरणारविंदींमिलिंदायमान' होऊन, क्षुल्लक बाबतींत सुद्धां 'सत्तमलत्ताप्रहार' किंवा 'गालिप्रदान' सहनकरणाऱ्या नेभळ्यां प्रमाणें, **पांडोबा** नव्हते ! त्यांस स्नानसंध्येस व्यत्यय आणणारी देखील परतंत्रता अगदीं असह्य होऊन गेली ! आणि ह्मणून, यजमानाचें जें काय जरूरीचें काम होतें, तें होतांच, त्यांनीं तेथल्या तेथेंच सर्व दप्तर यजमानाचे स्वाधीन करून, "असली पराधीन नोकरी मला नको," ह्मणून

खाडकन् जबाब दिला, व उदरनिर्वाहाची सोय नसतांही, स्नान-संध्येंत व्यत्यय आणणाऱ्या नोकरीवर लाथ मारून, रौप्य-शृंखलेंतून मुक्त झाले ! ! शाबास, याला ह्मणावा खरा तेजस्वी पुरुष ! ! ! *

ईश्वरानें आपणास नरदेह आणि त्यांतही ब्राह्मणजन्म दिलेलें आहे, त्याचें सार्थक्य जेणें करून होईल, अशा रीतीनें आपणास वागलें पाहिजे, असा **पांडोबांचा** पूर्वींपासूनच संकल्प होता. वरील कारणामुळें, आतां तर तो पक्का दृढ झाला. व देहसार्थक्य होण्याकरितां **सद्गुरूस** शरण जाण्याचा त्यांनीं पूर्ण निश्चय केला. आतां असा सद्गुरु कोण भेटेल? ही **पांडोबांस** मोठी काळजी लागली. पुढें लवकरच त्यांस नाशिकक्षेत्रीं **रघुनाथ भटजी** ह्मणून कोणी सत्पुरूष आहेत, असें समजलें. तेव्हां त्यांसच शरण जाण्याचा त्यांनीं निश्चय केला, व ते एके दिवशीं नाशिकास गेले. चार पांच दिवस नित्य दर्शनास जात, व मी शरण आलों आहें, मजवर अनुग्रह व्हावा, अशी प्रार्थना करीत. परंतु त्यांस उलट उत्तर **भटजींकडून** मिळत नसे ! **पांडोबांचा** तर निश्चयच कीं, आपल्यावर **सद्गुरू** महाराजांची कृपा झाल्या वांचून नाशिक कांहीं सोडावयाचें नाहीं ! चार पांच दिवस झाल्यावर मग **भटजींनीं**

---

* सांप्रतही आमच्यांत अशा प्रकारचीं कांहीं अमूल्य तेजस्वी नर-चमकत आहेत, ह्याबद्दल आम्हांस मोठा अभिमान वाटतो ! तथापि, एकंदर समाजाची दिवसें दिवस फार शोचनीय स्थिति होऊं लागली आहे. याचा प्रत्येक स्वदेशभक्तानें अवश्य विचार करावा.

**पांडोबांस** त्यांची सर्व हकीकत विचारिली, व त्यांस ह्मणाले, **पांडोबा,** तुह्मीं आतां घरीं जा, व आईबापांची सेवा आणि कुटुंबपालन करून सदाचरणानें रहा. यांतच तुमचें कल्याण आहे. परंतु एवढ्यानें **पांडोबांचें** समाधान होईना. ह्मणून त्यांनीं आपला नित्य दर्शन घेऊन 'अनुग्रह व्हावा.' ह्मणून प्रार्थना करण्याचा क्रम तसाच चालू ठेविला होता, व त्यांस एकदोन दिवशीं घरीं जाण्याविषयीं **भटजी** सांगतच असत. असें होतां होतां, एके दिवशीं **पांडोबांनीं भटजींकडे** जाऊन त्यांचे घट्ट पाय धरिले, व अनुग्रह व्हावा ह्मणून प्रार्थना केली. तेव्हां **भटजींकडून** ठरीव जबाब मिळाला! त्यावर **पांडोबा** ह्मणाले, **सद्गुरु महाराज,** मला प्रवृत्तिरूप कल्याण सर्वथा नको आहे, निवृत्तिरूप कल्याणाची मी इच्छा करितों, व तें आपणा जवळ मिळेल ह्या आशेनें मी ह्या चरणांजवळ आलों आहें. आतां आपण जर माझी इच्छा पूर्ण न कराल तर मी देहत्याग करीन. असें केल्यानें मला आणखी एकवार जन्म घ्यावें लागेल, इतकेंच ! आपण ब्रम्हनिष्ठ असल्यामुळें आपणांस पुनर्जन्म नाहीं, हें खरें. पण मी आपणापाशीं ब्रम्हविद्या शिकण्याचा हेतु ठेवून देहत्याग केल्यावर, **श्रीविष्णूस** जसे अनेक अवतार घ्यावे लागले, तसे आपणासही मजकरितां आणखी एकवार खचीत जन्म घ्यावें लागेल ! ह्यावेळची **पांडोबांची** एकंदर चर्याच त्यांची वैराग्यावर असलेली निष्ठा व गुरुचरणीं असलेलें निःसीम प्रेम, हीं व्यक्त करीत होती. शिवाय, **भटजींस** सर्व

प्रकार ज्ञातच होता ! म्हणून **भटजींनीं** प्रसन्न होऊन **पांडोबांचें** समाधान केलें. व त्यांस सद्बोध करून अवधूतमंत्र-दीक्षा दिली. पुढें **भटजींचेच** सांगण्यावरून अच्युतरावजी मोडकांजवळ **पांडोबा** कांहीं दिवस काव्यव्युत्पत्ति शिकत असत. नंतर **पांडोबांनीं** पुन्हा एके दिवशीं बोधाविषयीं प्रार्थना केल्यावरून समर्थ म्हणाले, " निरंजनापाशीं पंचीकरणझाडा समजून घे, मग पुढचा मार्ग मी स्वतां सांगेन. " ह्या आज्ञे प्रमाणें **पांडोबा** निरंजनबोवांजवळ तत्वविवेक शिकूं लागले. नंतर **श्रीसमर्थ रघुनाथ भटजींनीं** एके दिवशीं त्यांस वेधदीक्षेनें शक्तिपात पूर्वक अन्वयव्यतिरेक, लक्ष्यमहावाक्यार्थ, भूतशुद्धप्रत्येकब्रम्हैक्यत्व, इत्यादींविषयीं अनुभवात्मक उपदेश केला ! व त्यांस कृतार्थ केलें !!

नंतर सद्गुरूंचे आज्ञेनें, रजोगुण जिंकण्याकरितां **पांडोबा**, बापु मोघे यांजवळ हठयोग शिकत असत. त्यांत ते पुढें चांगले प्रवीण झाले होते. एके दिवशीं **पांडोबा** कुंभकाचा अभ्यास करीत असतां वायु चलित होऊन त्यांस पोटशूळ उत्पन्न झाला. **पांडोबा** तेथें मधुकरी मागून असत. दुसरी कोठें ओळख नाहीं व निस्पृहता फार, असें असून त्यांस पोटशुळामुळें भिक्षेस तर जाववेना ! अशा हालांत असतां, दोन तीन दिवस गेल्यावर, एके दिवशीं रात्रीं एक वृद्ध ब्राह्मण स्त्री **पांडोबांचे** बिऱ्हाडीं आली. तिनें नरटींत तेल आणिलें होतेंच. तें त्यांचे पोटास लावून तिनें जरासें पोट चोळितांच **पांडोबाचा** शूळ बरा झाला ! **पांडो-**

बानीं बाईस कोण, कोठच्या? वगैरे प्रश्न केले. पण **बाई** उत्तर न देतां तशीच निघून गेली!! दुसरे दिवशीं **पांडोबा गुरुदर्शनास** गेले असतां, कां? आतां बरें आहेना? असा सद्गुरूंनीं प्रश्न केला! **पांडोबाची** प्रकृति बिघडल्याचें त्यांस पूर्वीं माहित नसून जेव्हां असा प्रश्न आला, तेव्हां **पांडोबाची,** गेल्या रात्रीं आलेली वृद्धा कोण असावी? याविषयीं लागलीच खात्री झाली!!! त्याच दिवशीं **समर्थ रघुनाथभटजींनीं पांडोबास** आज्ञा केली,"**पांडोबा,** तुह्मी आतां घरीं जा, गृहस्थाश्रमानें राहून सामान्य योगोपासना शरीरावर राखून वागा, आणि पूर्ण समाधानसंपन्न व्हा. ह्या आज्ञेप्रमाणें **पांडोबा** नाशिकाहून आंबवड्यास आले. आणि तेथें कांहीं दिवस योगाभ्यास करून नंतर तारापुरास परत आले. तेथें त्यांचे आतेबंधु कृष्णाजीपंत बवें यांनीं त्यांची सहकुटुंब राहण्याची योग्य व्यवस्था करून दिली.

पुढें **पांडोबा** शेवटपर्यंत तारापुरासच राहत व तेथेंच त्यांचा काल झाला! ही हकीकत **बोवांचे** चरित्रांत आलीच आहे. यास्तव ती येथें पुन्हा न देतां हें **पांडोबाचें** अल्प चरित्र पुरें करितों.